# महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मादिगा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सद्यस्थिती व जात प्रमाणपत्र व जात पडताळणी संदर्भातील अडचणी - कारणे - परिणाम - उपाय.

**(महाराष्ट्र राज्य)**

---

# संशोधन अहवाल - २०१९


## प्रमुख मार्गदर्शक

श्री कैलास कणसे (भापोसे), महासंचालक

## संशोधक

श्री. भीमराव पारखे, प्रकल्प संचालक

श्रीमती आरती जाधव, संशोधन अधिकारी

श्री. श्रीशैल बिराजदार, संशोधन अधिकारी

श्रीमती शुभांगी सुतार, प्रकल्प अधिकारी

श्री. अस्लम शेख, संशोधन सहाय्यक


--------------------------------------------------------------------------------


डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# प्रास्ताविक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे प्रशिक्षण व संशोधन क्षेत्रामध्ये काम करणारी संस्था असून विशेषतः अनुसूचित जातीच्या विकासासाठी संशोधन करून शासनास धोरणात्मक शिफारशी करणे हे संस्थेचे कार्य आहे. या अनुषंगाने बार्टी, पुणे या संस्थेचा महासंचालक या नात्याने मादिगा समाजाच्या संदर्भातील "महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मादिगा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सद्यस्थिती व जात प्रमाणपत्र व जात पडताळणी संदर्भातील अडचणी - कारणे - परिणाम - उपाय" महाराष्ट्र राज्य शासनास सादर करण्यास मला अत्यंत आनंद होत आहे.

श्री आदी जांबमुनी सेवा समाज, पुणे (मादगी, मादरू व मोची समाज, पुणे) यांनी मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना जातीचे दाखले या विषयांतर्गत निवेदन दिले असून यामध्ये मादिगा या जातीचे दाखले मिळावे व जात पडताळणी करून मिळावी. शैक्षणिक सवलत, महसूल पुरावा न मागता आई वडिलांचे जन्म दाखले किंवा नातेवाईकांचे शाळा सोडल्याचे दाखले पाहून किंवा आई-वडील सरकारी अथवा खासगी क्षेत्रात काम करीत असताना अपघाताने मृत्यू झाल्यास अथवा अपंगत्व इ. गंभीर दुखापत झाल्याचे हॉस्पिटलचे पुरावे ग्राह्य धरावे, समाजाचे अध्यक्ष आणि कमिटीचे दोन सदस्यांच्या शिफारशीनुसार दाखले मिळावे. अशा मागण्यांचा समावेश आहे. यानुसार बार्टी, पुणे यांनी जातीबाबत व त्यांना येणाऱ्या अडचणीबाबत सर्वेक्षण करून शासनास अहवाल सादर करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशानुसार; सर्वेक्षण आणि लक्षगट चर्चेद्वारा मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून मादिगा समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीविषयक माहिती संकलित करण्यात आली असून संदर्भ साहित्याच्या अवलोकनातून प्राप्त झालेल्या सहसंबंध तपासून त्याप्रमाणे अहवालाची मांडणी करण्यात आलेली आहे.

मादिगा समाजाचा समावेश महाराष्ट्रासोबतच इतर राज्यांच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्येच दिसून येतो, कोणत्याही राज्यामध्ये मादिगा समाजाच्या प्रवार्गाबाबत भिन्नता दिसून येत नाही. मादिगा समाज स्थलांतरित समाज असल्याने त्यांच्याकडे मूळ जातीची कागदपत्रे उपलब्ध नाहीत तसेच त्यांच्या जातीच्या संदर्भात चुकीच्या नोंदी झाल्याचेही दिसते. सदर संशोधन अभ्यासादरम्यान पूर्वाभ्यास करण्यात आला असून त्यानुसार, समाजाची स्थिती अत्यंत खालावलेली असून जातीच्या संदर्भात झालेला चुकीच्या नोंदी आणि जातीचे दाखले नसणे याचा परिणाम या

समजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासावर झालेला आहे. सदर बाबीची सत्यता पाहणीसाठी सर्वेक्षणाअंतर्गत एकूण ५५६ कुटुंबातून २८५६ लोकांचा अभ्यास करण्यात आला असून त्याद्वारे प्राप्त निष्कर्षांच्या आधारे मादिगा समाजाची परिस्थिती एकंदरीत अत्यंत मागास असल्याने समजते. त्याकरिता महाराष्ट्राच्या विविध भागातील मादिगा समाजाच्या संघटनाच्या एकत्र कामे करत आहेत, परंतु जातीच्या चुकीच्या नोंदीमुळे, जातीचे दाखले उपलब्ध नसल्याने तसेच १९५० पूर्वीचे पुरावा नसल्याने, विकास साधण्यामध्ये त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

सदर माहिती मादिगांच्या जीवन पद्धतीवर प्रकाश टाकणारी आहे, असे मला अत्यंत प्रामाणिक पणे वाटते. त्यामुळे अशा प्रकारची माहिती लोकांसमोर आणताना मला अत्यंत आनंद होत आहे. या संशोधन अहवालाचा उपयोग शासन, मादिगा समाज व भावी संशोधकांना नक्की होईल, याचा मला विश्वास आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता या समाजाला विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी आवश्यक सर्व प्रश्नांवर शासनास अहवालाद्वारे धोरणात्मक शिफारशी करण्यात आल्या आहेत. या शिफारशींच्या अनुषंगाने मादिगा समाजाच्या हितासाठी सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभाग सकारात्मक निर्णय घेईल, अशी मला पूर्ण खात्री आहे.

**श्री. कैलास कणसे (भापोसे)**
**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृ.क्र. |
|---|---|---|
| **१.** | प्रस्तावना | १ |
| **२.** | संशोधन पद्धती | ५ |
| **३.** | संदर्भ साहित्य | ११ |
| **४.** | मानववंशशास्त्रीय माहिती | २५ |
| **५.** | सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थिती | ३७ |
| **६.** | निष्कर्ष व शिफारशी | १३५ |
| | परिशिष्ट | |
| १. | संदर्भ सूची | १५६ |
| २. | लक्षगट चर्चा प्रश्नसुची | १५७ |
| ३. | मुलाखत - प्रश्नावली | १६१ |

# सारणी अनुक्रमणिका


| अ. क्र. | सारणी विषय |
|---|---|
| १) | उत्तरदात्यांची लोकसंख्या दर्शविणारी सारणी |
| २) | उत्तरदात्यांचे वय व त्यांची आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ३) | मादिगा समाजाचे महाराष्ट्रातील वास्तव्याचा कालावधी दर्शविणारी सारणी |
| ४) | मादिगा समाजाचे इतर राज्यांमधून महाराष्ट्र राज्यात स्थलांतर झाले असल्याची आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ५) | महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या राज्यातून स्थलांतर झाले आहे त्यांबाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ६) | मादिगा समाजाच्या स्थलांतराची कारणे दर्शविणारी सारणी |
| ७) | मादिगा समाजातील एकूण लोकसंख्येची वैवाहिक स्थिती दर्शविणारी सारणी |
| ८) | मादिगा समाजातील लग्नाचे वय दर्शविणारी सारणी |
| ९) | रहिवास व नागरिकत्वासंबंधी आवश्यक पुरावे उपलब्ध असलेबाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| १०) | शिधापत्रिका उपलब्ध असणे बाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ११) | मादिगा समाजाचे शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| १२) | मादिगा समाजाची शैक्षणिक स्थिती दर्शविणारी सारणी |
| १३) | शिक्षणाचे माध्यम दर्शविणारी सारणी |
| १४) | शाळेत दाखल न करण्याची, शाळा गळतीची कारणे व प्रमाण दर्शविणारी सारणी |
| १५) | मादिगा समाजाचे अर्थार्जनाची साधने किंवा व्यवसाय आणि उत्पन्न दर्शविणारी सारणी |
| १६) | मादिगा कुटुंबांचे मासिक उत्पन्न दर्शविणारी सारणी |
| १७) | घरातील आवश्यक सोयी सुविधा, साधन सामग्री व मनोरंजनाची साधनांची उपलब्धता दर्शविणारी सारणी |
| १८) | बचतीचे माध्यम व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| १९) | आर्थिक गुंतवणुकीसाठी निवडलेले पर्याय व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |

२०) कर्ज घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

२१) कर्जाचे स्त्रोत व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

२२) घेतलेले कर्ज फेडण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

२३) मादिगा समाजाच्या घराच्या मालकीबाबत माहिती दर्शविणारी सारणी

२४) घराच्या बांधणीचा प्रकार त्यांच्या आकडेवारीसह दर्शविणारी सारणी

२५) मादिगा समाजाच्या लोकांच्या घरातील खोल्यांची संख्या व त्यांची आकडेवारी दर्शविणारी सारणी

२६) शेती असणाऱ्या उत्तरदात्यांची शेतीच्या प्रकारासह आकडेवारी दर्शविणारी सारणी

२७) शेतजमिनीचा असणाऱ्या उत्तरदात्यांकडे शेती उपयोगी पाण्याच्या स्त्रोतांची उपलब्धतता दर्शविणारी सारणी

२८) घरातील पाण्याची सुविधा दर्शविणारी सारणी

२९) पिण्याच्या पाण्याची ठिकाणांचे घरापासूनचे अंतर दर्शविणारी सारणी

३०) विजेची मालकी दर्शविणारी सारणी

३१) तासानुसार विजेची उपलब्धता दर्शविणारी सारणी

३२) इंधनाचा वापर दर्शविणारी सारणी

३३) शौचालयाची सुविधा दर्शविणारी सारणी

३४) शौचालयामधील पाण्याची व्यवस्था दर्शविणारी सारणी

३५) सांडपाणी व्यवस्था दर्शविणारी सारणी

३६) कचरा व्यवस्थापन दर्शविणारी सारणी

३७) शासकीय योजनांची जनजागृती असणेबाबत माहिती दर्शविणारी सारणी

३८) योजनांची माहिती नसण्याची कारणे दर्शविणारी सारणी

३९) शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याबाबतचे आकडेवारी दर्शविणारी सारणी

४०) लाभ घेण्यात आलेल्या योजनेचे स्वरूप दर्शविणारी सारणी

४१) योजनेचा लाभ घेण्यामध्ये येणाऱ्या अडचणी दर्शविणारी सारणी

४२) समाजाचा धर्म उत्तरदात्यांचा धर्म दर्शविणारी सारणी

| | |
|---|---|
| ४३) | मादिगा समाजातील उत्तरदात्यांच्या कागदपत्रावर नोंद असलेली जात दर्शविणारी आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ४४) | मादिगा कुटुंबातील सदस्यांकडे मूळ जातीची नोंद असणारी प्रमाणपत्रे दर्शविणारी सारणी |
| ४५) | जातीचे दाखले उपलब्ध असल्याबाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ४६) | मादिगा कुटुंबामध्ये प्रमाणपत्रांवर इतर जातीच्या झालेल्या (चुकीच्या) नोंदी दर्शविणारी सारणी |
| ४७) | मादिगा समाजाच्या जातीच्या संदर्भात झालेल्या चुकीच्या नोंदी ची कारणे दर्शविणारी सारणी |
| ४८) | नातेवाईकांकडे असणारे प्रमाणपत्रे दर्शविणारी सारणी |
| ४९) | मादिगा समाजाच्या जातीच्या संदर्भातील चुकीच्या नोंदीमुळे या समजास येणाऱ्या अडचणी दर्शविणारी सारणी |
| ५०) | १९५० पूर्वीचा पुरावा असण्याबाबतची आकडेवारी दर्शविणारी सारणी |
| ५१) | १९५० सालापुर्वीचे जातीचे दाखले उपलब्धता व त्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५२) | १९५० पूर्वीचा पुरावा उपलब्ध नसल्याची कारणे दर्शविणारी सारणी |
| ५३) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा – १९८९ बाबत माहिती असणाऱ्यांचे मादिगा समाजातील कुटुंबाचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५४) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा – १९८९ या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५५) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा – १९८९ या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करण्याची कारणे व प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५६) | आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाज यांच्यातील समानतेबाबत मत व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५७) | महाराष्ट्र राज्यातील मादिगा समाजाचे आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यामध्ये असणारे नातेवाईक व रक्त संबंधीय दर्शविणारी सारणी |
| ५८) | रोटी बेटी व्यवहार होत असल्याबाबत मते व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| ५९) | जातपंचायत संबंधी माहिती दर्शविणारी सारणी |
| ६०) | जातपंचायती अंतर्गत न्यायनिवाडा करण्यास घेतले जाणारे विषय दर्शविणारी सारणी |
| ६१) | जातपंचायतीची अपराधी बाबत घेतल्या जाणाऱ्या भूमिकांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |

**६२)** महिलांचे अर्थार्जन करण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

**६३)** महिलांच्या अर्थार्जना मागील कारणे व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

**६४)** महिलांच्या नावावर असलेल्या संपत्तीचे प्रकार व प्रमाण दर्शविणारी सारणी

**६५)** महिलांचे बाळंत होण्याचे ठिकाण त्यांचे प्रमाणासह दर्शविणारी सारणी

**६६)** कुटुंबातील निर्णयप्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग दर्शविणारी सारणी

**६७)** महिलांना कुटुंबामध्ये मिळणारी वागणूक दर्शविणारी सारणी

**६८)** मादिगा समाजातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा दर्शविणारी सारणी

**६९)** उपवास करण्यामागील कारणे आणि त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

**७०)** कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यांनातर करण्यात येणारे उपाय दर्शविणारी सारणी

# आलेख अनुक्रमणिका


| अ. क्र. | आलेख विषय |
|---|---|
| १. | उत्तरदात्यांची लोकसंख्या दर्शविणारा आलेख |
| २. | मादिगा समाजाचे महाराष्ट्रातील वास्तव्याचा कालावधी दर्शविणारा आलेख |
| ३. | स्थलांतर व त्यांचे प्रमाण दर्शविणारा आलेख |
| ४. | मादिगा समाजाच्या स्थलांतराची कारणे दर्शविणारा आलेख |
| ५. | मादिगा समाजातील लग्नाचे वय दर्शविणारा आलेख |
| ६. | शिधापत्रिका उपलब्ध असणे बाबत आकडेवारी दर्शविणारा आलेख |
| ७. | मादिगा समाजाचे शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारा आलेख |
| ८. | शाळेत दाखल न करण्याची शाळा गळतीची कारणे दर्शविणारी आलेख |
| ९. | अर्थार्जनाची साधने किंवा व्यवसाय आणि उत्पन्न दर्शविणारा आलेख |
| १०. | मादिगा कुटुंबांचे मासिक उत्पन्न दर्शविणारा आलेख |
| ११. | घरातील आवश्यक सोयी सुविधा, साधन सामग्री व मनोरंजनाची साधनांची उपलब्धता दर्शविणारा आलेख |
| १२. | कर्ज घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी |
| १३. | मादिगा समाजाच्या घराच्या मालकीबाबत माहिती दर्शविणारा आलेख |
| १४. | घरातील पाण्याची सुविधा दर्शविणारा आलेख |
| १५. | योजनांची माहिती नसण्याची कारणे दर्शविणारा आलेख |
| १६. | मादिगा समाजातील उत्तरदात्यांच्या कागदपत्रावर नोंद असलेली जात दर्शविणारी आकडेवारी दर्शविणारा आलेख |
| १७. | मादिगा समाजाच्या जातीच्या संदर्भातील चुकीच्या नोंदीमुळे या समाजास येणाऱ्या अडचणी दर्शविणारा आलेख |
| १८. | जातपंचायती अंतर्गत न्यायनिवाडा करण्यास घेतले जाणारे विषय दर्शविणारी सारणी |
| १९. | महिलांच्या नावावर असलेल्या संपत्तीचे प्रकार व प्रमाण दर्शविणारी सारणी |
| २०. | मादिगा समाजातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा दर्शविणारी सारणी |

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# प्रस्तावना

---

## अनुसूचित जाती

भारतीय घटनेतील कलम ३४१ व ३४२ नुसार केंद्रशासनाने अनुसूचित जाती व जमातींची यादी घोषित केली आहे. राज्यनिहाय घोषित केलेल्या यादीप्रमाणे एखाद्या व्यक्तीची जात असेल आणि ती त्या विशिष्ठ राज्याची रहिवासी असेल तर ती व्यक्ती त्या राज्यासाठी अनुसूचित जाती किंवा जमातीची सदस्य म्हणून गणली जाते. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातींच्या यादीमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश आहेत. जातीसमुहास अनुसूचित जातीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी शासनाचे निर्देशांक तयार करण्यात आले असून खालीलप्रमाणे दिलेले निर्देशांक लागू होत असलेल्या जातीना अनुसूचित जातींच्या यादीमध्ये समाविष्ठ केले जाते.

१. अस्पृश्यता

२. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण

३. अस्वच्छ काम

भारतीय समाजव्यवस्थेमधील सर्वात खालच्या स्तरातील समाज म्हणून दलित समाजाकडे पाहिले जाते. पूर्वीपासून दलित समाजातील जातींना अस्पृश्य मानले जाते. समाजामध्ये उच्चवर्णीय व दलित असा भेद निर्माण होता. उच्च वर्णीयांकडून शुद्र समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांना अत्यंत हिनतेची वागणूक दिली जात असे. शूद्रांना शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या संधी नाकारल्यामुळे ते आजही अनेक सोयी-सुविधांपासून आणि विकासापासून वंचित असल्याचे चित्र दिसते. दलित समजल्या जाणाऱ्या जातीचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने मागासलेल्या अनेक जातींना अनुसूचित जाती म्हणून घोषित केले आहे. समान वैशिष्ठे, समस्या, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती व अस्पृश जातींचा एक समूह तयार करण्यात आला, यालाच अनुसूचित जाती म्हटले जाते. या गटामध्ये समाविष्ठ जातींच्या समस्या समान असून त्यावरील उपाय देखील समान आहेत. आरक्षणासाठी आणि विशिष्ट अशा काही कायदेशीर बाबींसाठी अनुसूचित जाती हे नाव देण्यात आले.

अनुसूचित जाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशनने वापरली, पुढे १९३५च्या कायद्यात अंतर्भूत करण्यात आली. सामान्यतः सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास तसेच अस्वच्छतेचे काम

करणाऱ्या आणि अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीचा समावेश अनुसूचित जातीत होतो. १९३५ च्या कायद्याच्या परिशिष्टामध्ये अनुसूचित जातीची अधिकृत यादी प्रकाशित करण्यात आली होती.

१९६१ सालच्या जनगणनेप्रमाणे अनुसूचित जातींची संख्या अंदाजे १००० होती आणि त्यांची लोकसंख्या ६,४५,११,३१३ असून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या १४.६४ टक्के होती. महाराष्ट्रातील लोकसंख्या ६०,७२,५३६ होती, त्यापैकी जवळपास १६ लाख, म्हणजेच १८ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातींमधील, महार, मांग, चांभार अशा सुमारे ५९ अनुसूचित जातींची होती. यापैकीच मादिगा हि देखील अनुसूचित जातीच्या यादीमध्ये असणारी जात आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना श्री. आदी जांबमुनी सेवा समाज, पुणे ( मादगी, मादरू व मोची समाज, पुणे) यांचेकडून देण्यात आलेल्या निवेदनामध्ये मादिगा समाजाच्या विकासामध्ये अडचणी निर्माण करणाऱ्या अनेक घटक दूर करून समाजाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करण्याबाबत अनेक विनंत्या करण्यात आल्या होत्या.

पहिली मागणी अशी आहे कि, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या यादीमधील अ. क्र. ११, ३५, ३६ व ४५ मध्ये मादर, मादिगा, मोची, तेलगु मोची, कामाठी मोची, मादागी, मादिगा अशा विविध जातींचा समावेश आहे, त्यानुसार मादिगा जातीचे दाखले व जात पडताळणी करून मिळावी.

दुसरी मागणी, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षात मादिगा समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात सवलत मिळावी. तिसरी मागणी म्हणजे महसूल पुरावा न मागता आई वडिलांचे जन्म दाखले किंवा नातेवाईकांचे शाळा सोडल्याचे दाखले किंवा आई-वडील सरकारी अथवा खासगी क्षेत्रात काम करीत असताना अपघाताने मृत्यू झाल्यास अथवा अपंगत्व इ. गंभीर दुखापतीच्या समयी रुग्णालयात केलेल्या जातीच्या नोंदी पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात यावे. चौथी विनंती म्हणजे राष्ट्रीयत्वाचा दाखला, घरकुल योजना आणि झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता जे पुरावे ग्राह्य धरले जातात त्याचप्रमाणे जातीचे दाखले देण्यात यावेत. पाचवी विनंती होती कि, शाळेत प्रवेश घेताना आई-वडिलांच्या अशिक्षितपणामुळे जातीच्या नोंदणी करताना तेलगु, हरिजन, कोंगाडी, कानडी, महार इतर विविध चुकीच्या नोंदी झालेले आहेत. पुरावे पाहून त्या ठिकाणी मादिगा या जातीचे नोंद होणे बाबत आदेश काढावे.

मादिगा समाजाच्या लोकांना दाखले समाजाचे अध्यक्ष आणि कमिटीचे दोन सदस्यांच्या शिफारशीनुसार मिळण्यासाठीची तरतूद करावी अशी विनंती करण्यात आली आहे.

वरील निवेदनाच्या अनुषंगाने मा. मंत्री सामाजिक न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ जून २०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे संस्थेस निर्देश देण्यात आले आहेत कि, बार्टी संस्थेने मादिगा समाजाचे महाराष्ट्र राज्यातील मादिगा समाजाच्या प्रतिनिधीची सहाय्याने त्यांच्या वास्त्यव्याचा अभ्यास करून विविध भागातील मादिगा समाजाला जातीबाबत येणाऱ्या अडचणी आणि त्यांची एकंदरीत परिस्थितीचे सर्व्हेक्षण करून संबधित अहवाल शासनास सादर करावा.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्देशानुसार मादिगा समाजाचा संशोधन अभ्यास करण्यात आला असून अभ्यासादरम्यान विविध संशोधन कार्यपद्धती व संशोधन टप्प्यांचा शास्त्रशुध्द पद्धतीने अवलंब केला आहे. संशोधन अभ्यासाच्या पहिल्या टप्प्यामध्ये मादिगा समाजाची माहिती मिळविणेकरिता विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, वेबसाईटस व संशोधन लेख यांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधन पद्धतीप्रमाणे पुणे, मुंबई व सोलापूर शहरातील ठिकठिकाणी मादिगा समाजाच्या लोकांसोबत लक्षगट चर्चा आयोजित करण्यात आल्या. आयोजित लक्षगट चर्चेमधून मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून मादिगा जातीसंबंधी माहिती संकलित करण्यात आली. तसेच मादिगा जातींच्या लोकांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण या शास्त्रीय पद्धतीचा वापर करून पुणे, मुंबई आणि सोलापूर जिल्ह्यामधील विविध भागांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या मादिगा समाजाची माहिती संकलित करण्यात आली . संदर्भ साहित्याच्या अवलोकनातून प्राप्त झालेली माहिती व प्रत्यक्ष लक्ष गट चर्चा, सर्व्हे व निरीक्षणातून प्राप्त झालेली माहिती याचा trangular method ने माहितीचा एकमेकांशी सहसंबंध तपासून त्याप्रमाणे अहवालाची मांडणी करण्यात आलेली आहे.

तसेच मादिगा समाजाचा समावेश महाराष्ट्रासोबतच इतर राज्यांमध्ये हा अनुसूचित जातीमध्ये दिसून येतो, या अनुषंगाने अनुसूचित जाती म्हणजे काय आणि अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी शासनाचे निर्देशक कोणते आहेत याची मांडणी करण्यात आली आहे.

# प्रकरण दुसरे

# संशोधन पद्धती

# संशोधन अभ्यास पद्धती

---

**संशोधन विषय** :

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मादिगा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सद्यस्थिती व जात प्रमाणपत्र व जात पडताळणी संदर्भातील अडचणी - कारणे - परिणाम - उपाय.

**समस्या सूत्रण:**

महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये क्रमांक ३६ वर मादिगा जातीचा उल्लेख आहे. मादिगा समाज मुळचा महाराष्ट्रातील नसून पूर्वेकडील आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यांमधून स्थलांतरीत होऊन महाराष्ट्रामध्ये स्थायिक झालेला आहे. उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित झालेल्या या समाजाची आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती दयनीय असून अत्यंत मागासलेल्या अवस्थेमध्ये जीवन व्यतीत करीत आहे. शैक्षणिक, रोजगार किंवा इतर शासकीय योजना उपलब्ध असूनही जातीचे दाखले उपलब्ध नसल्याने त्यांचा लाभ घेऊ शकत नाही, परिणामी त्यांचा विकास होत नाही. तसेच बहुतांश लोकांची कागदपत्री जातीची चुकीची नोंद झाली असून त्याबाबतचे पुरावे त्यांचेकडे उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांचा वापर करूनही योजनांचा लाभ घेता येत नाही. जातीचे दाखले प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक असणारे पुरावे मुख्यतः १९५० पूर्वीचा पुरावा या समाजाकडे नाही. यामुळे कोणत्याही शासकीय आरक्षण धोरणांचा, योजनांचा लाभ हा समाज घेऊ शकला नाही. या सर्वाचा परिणाम समाजाच्या विकासावर होत आहे. या अनुषंगाने मादिगा समजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी तसेच जातीचे दाखले व जात पडताळणी संदर्भात त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या संदर्भात वास्तविकता जाणून घेऊन शासनास धोरणात्मक शिफारशी करण्याकरिता सदर संशोधन अभ्यास पूर्ण केला आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट:**

१. मादिगा समाजाची सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थिती अभ्यासणे.

२. मादिगा समाजाचे मूळ वास्तव्य व रूढी परंपरेचा अभ्यास करणे.

३. मादिगा जातींच्या समाजातील लोकांच्या कागदोपत्री जातींची चुकीच्या नोंदी झाल्या आहेत किंवा नाहीत याबाबत पडताळणी करणे.

४. मादिगा समाजास जात प्रमाणपत्र व जात पडताळणी मिळणेकरिता येणाऱ्या अडचणींचा अभ्यास पाहणे.

५. मादिगा समजास शासकीय आरक्षण धोरणे व उपायांचा लाभ होतो किंवा नाही याचे वास्तव पाहणे व त्याचा परिणाम अभ्यासणे.

६. मादिगा समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता शासन स्तरावर अंमलबजावणी करण्यायोग्य उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:**

१. आंध्रप्रदेश, कर्नाटक व तेलंगणा राज्यातील मादिगा समाज महाराष्ट्रामध्ये १९५० पूर्वी पासून स्थलांतरित असून केवळ त्याबाबतचे पुरावे उपलब्ध नसल्याने जात प्रमाणपत्र व पडताळणी करताना मिळत नाही.

२. मादिगा समाज स्थलांतरित असल्याने बहुतांश समाजाची कागदोपत्री जातीची नोंद चुकीची लागली असल्याने त्यासंदर्भातील मूळ पुरावे सादर न करू शकल्याने आरक्षणाचा फायदा मिळत नाही.

३. मादिगा समाजास जात प्रमाणपत्र व जात पडताळणी मिळत नसल्याकारणाने महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक, रोजगार संबधी, आर्थिक सहाय्य, कर्ज योजना इत्यादी योजनांचा लाभ घेता येत नाही.

४. शासकीय योजनांचा मिळत नसल्याने मादिगा समाजाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला नसून दारिद्य, बेरोजगारी, व्यसनाधीनता अशा प्रकारचे निकृष्ठ जीवनमान जगत आहे.


**नमुना निवड:**

**मादिगा:- जनगणना अहवाल- २०११ (एकूण लोकसंख्या - १५,३१८)**

मादिगा जातीचे सर्वेक्षणासाठी नमुना निवड करताना बहुस्तरीय नमुना निवड (Multistage Sampling) पद्धतीचा अवलंब केला असून निवडीचे टप्पे पुढीलप्रमाणे मांडण्यात आले आहे.

- महाराष्ट्र राज्यातील पुणे, मुंबई व सोलापूर या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार जरी त्यांचे वास्तव्य पुणे सारख्या शहरांमध्ये कमी दिसत असले तरी मादिगा समाज संस्था आणि संघटनानी दिलेल्या माहितीनुसार मादिगा समाजाची

लोकसंख्या अधिक असल्याचे दिसते. त्यामुळे लोक प्रतीनिधीसोबत चर्चा करून मादिगा लोकवस्ती अधिक असणाऱ्या पुणे, मुंबई व सोलापूर या तीन जिल्ह्यांची निवड करण्यात आली.




**महाराष्ट्र राज्यामधील निवडलेल्या जिल्ह्यांचा नकाशा**

- स्नो बॉल टेक्निकचा वापर करून नमुना निवड करण्यात आली आहे.
- सर्व्हेक्षणाद्वारे एकूण ५५६ कुटुंबांतर्गत २८६३ लोकांची माहिती संकलित करण्यात आली असून विविध स्थरावर त्यांची पडताळणी करण्यात आली आहे.
- जनगणना २०११ अध्ये नमूद मादिगा समाजाच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे मादिगा समाजाचे प्रत्यक्ष वास्तव्य असलेल्या ठिकाणांचा शोध घेणे कठीण असल्याने समाजाचे वास्तव्य आणि लोकसंख्येबाबात वास्तविक माहिती जाणून घेण्यासाठी मादिगा समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संस्था, संघटना, प्रतिनिधी, अभ्यासक व मंडळे यांच्याकडून माहिती घेऊन नमुना निवड पद्धती निच्छित करून त्याचा अवलंब करण्यात आला आहे.
- तीन जिल्ह्याच्या ठिकाणी एकूण प्रत्येकी तीन याप्रमाणे एकूण नऊ लक्ष गट चर्चा घेऊन इथनोवेन यांनी मांडलेल्या निर्देशाकांच्या आधारे व सद्यस्थिती चा विचार करता या

निर्देशांकामध्ये भर घालून मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

- माहिती संकलन करण्याकरिता प्राथमिक स्त्रोत (मुलाखत अनुसूची, लक्ष गट चर्चा, प्रत्यक्ष निरीक्षण) व दुय्यम स्त्रोतांच्या (संदर्भ, साहित्य, शासन निर्णय, इ) आधारे माहिती संकलन करण्यात आली आहे.
- सदर अभ्यासादरम्यान मादिगा समाजाबद्दलची माहिती विविध पद्धतीने संकलन करण्यात आली असून त्यामध्ये माहितीचे दुय्यम स्त्रोत, क्षेत्र-सर्वेक्षण आणि लक्ष गट चर्चा या तीन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. सदर अभ्यास पद्धतीमुळे विविध स्त्रोताद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीची (Triangulation of data) तथ्यांची पडताळणी करण्याकरिता उपयोगात आणली असून यामुळे अहवालास वैधता/ सत्यता प्राप्त होण्यास सहाय्य झाले आहे.
- माहितीचे संकलन करण्यासाठी बंदिस्त आणि खुल्या प्रश्नांचा समावेश असणारी प्रश्नावली तयार करण्यात आली होती.
- माहितीचे संकलन संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही पद्धतीने करण्यात आले आहे. तथ्यांचे सारणीकरण व विश्लेषण करून त्याआधारे अभ्यासाची निष्कर्ष नमूद करण्यात आली आहेत.

**संशोधनाची व्याप्ती**

सदर संशोधन अहवालामध्ये मादिगा समाजाचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थितीचे निर्देशांक समाविष्ट केले आहेत. मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून माहिती संकलित करण्यात आली आहे. प्रातिनिधिक नमुना निवड पद्धतीने अभ्यास केला असल्यामुळे हा अभ्यास संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी लागू होतो.

# प्रकरण तिसरे
# संदर्भ साहित्य

# संदर्भ साहित्य

---

**मादिगा समाजाच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती संदर्भ साहित्यामधून संकलित करण्यात आलेली आहे.**

**१. मांग आणि त्यांचे मागते, प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.**

**मांग आणि त्यांचे मागते,** या संदर्भातील मांग , मांगेला आणि मादिग या प्रकरणामध्ये प्रभाकर मंडेला असे म्हणतात कि, महाराष्ट्रातील मांग अथवा मातंग याप्रमाणेच कर्नाटकात मादिग आणि गुजरातेत मांगेला अशा पूर्वास्पृश्यांचा जाती आहेत असे काहींचे मत, तर एक जातीच्या प्रदेशविशिष्ट पोटजाती आहेत असे दुसरे मत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी देखील या संदर्भात दिलेली माहिती लेखकाला अधिक विश्वासार्ह वाटते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मते 'मांगेल' हि स्वतंत्र जात असून त्यांच्या मांग आणि मादिग यांच्याशी काहीही संबंध नाहि. ते कोळ्यांचे वंशज आहेत. मच्छीमारी हा जो कोळ्यांचा व्यवसाय आहे तोच मांगेला व्यवसाय आहे. कोळ्यांना ज्याप्रमाणे अस्पृश्य मानले जात नाही त्याप्रमाणे मादिगांनाही अस्पृश्य मानले जात नव्हते. नंतर त्यांना केव्हा आणि का अस्पृश्य मानले गेले यासंबंधी स्पष्ट माहिती देता येत नाही. माटे यांनी त्यांच्या 'अस्पृश्यांचा प्रश्न' या ग्रंथात मांगांच्या उपजातीसंबंधी उल्लेख केला आहे. त्यात त्यांनी मांगांच्या तीन भेदांचा उल्लेख केला आहे. मांग, मांगेल आणि मादिग या स्वतंत्र परंतु एकमेकांशी सर्व दृष्टीने सारख्या असलेल्या जाती आहेत असे प्रतिपादन केले आहे. प्रदेशपरत्वे त्यांचे भिन्न व्यवसाय असल्याचे त्यांनी दाखविले आहे. मांग, मांगेल आणि मादिग या एकाच जातीच्या उपजाती नसून स्वतंत्र जाती आहेत. असे यावरून स्पष्ट होते. या तीनही जातींचे त्या त्या प्रदेशातील सामाजिक स्थान आणि व्यवसाय यांत मुलभूत अंतर असल्याचे स्पष्ट दिसते. म्हणूनच भारतीय संस्कृती कोशात मांग, मादिग, आणि मांगेल यांविषयी स्वतंत्रपणे नोंदी घेतल्या आहेत. **लेखकाने असे म्हंटले आहे कि मांग मातंग आणि मादिग या जाती एकसारख्या दिसत असल्या , त्यांच्या चालीरीती देवदेवता यामध्ये समानता दिसून येत असली तरी त्या स्वतंत्र जाती आहेत.**

**लेखकाने खालील महत्वपूर्ण बाबी देखील नमूद केलेल्या आहेत.**

मादिग ही म्हैसूर राज्यातील जात असून त्यांची जांबव, पद्मजाती, यावरु, मातंग, चांभार अशी नावे आहेत. ते जांबऋषींना आपला मूळ पुरुष मानतात. त्यावरूनच त्यांना जांबव हे नाव मिळाले अशी नोंद आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हैसूर राज्याचा अंतर्भाव कर्नाटक मध्ये आहे. कर्नाटकात पूर्वी मातंग नावाचा वंश राज्य करीत होता. मातंग हे त्या वंशातीलच असावेत असेही एक मत असल्याचे नोंदविण्यात आले आहे. तेच हे मादिग होय. **थर्स्टनच्या मताप्रमाणे मातंग किंवा मातंगी हे मादिगांचे पर्यायी शब्द आहेत. मादिग लोक स्वतःला "मातंगी" वक्कलू म्हणजेच मातंगीचेपुत्र असे मानतात.**

**मादिगा ही महाराष्ट्रातील मातंगासारखीच पूर्वास्पृश्य जात असून या जातीचे लोक चामड्याचा व्यवसाय करतात. ते स्वतःला "जांबवतुलू" आणि "मातंगलू" असे म्हणतात.** सृष्टीच्या निर्मितीच्या आधी सहा महिने शक्तीने जांबवंत निर्माण केला अशी मादिगांची श्रद्धा आहे. म्हणजे भूमी निर्माण होण्याच्या आधीच जांबवंताची निर्मिती झाली आणि त्यांचे आपण वंशज आहोत अशी त्यांची समजूत आहे. म्हणूनच मादिग स्वतःला आदिपुरुष मानतात.

मादिगा, बैदल, डक्कल आणि डक्कलू अशा मादिगांच्या उपजाती आहेत. या उपजातींना परंपरेने चालत आलेले स्वतंत्र काम आणि स्थान असते. चींडूल हे मादिगांचे मागते असून त्यांचे परंपरेने चालत आलेले काम पुराण सांगण्याचे आहे. मादिगांचे हे जातीपुराण ते अत्यंत पवित्र मानतात.

**२. श्री प्रभाकर मांडे यांचा १९७३ सालचा तरुण भारत मधील लेख**

श्री प्रभाकर मांडे यांनी त्यांच्या या संदर्भामध्ये पुढील उल्लेख देखील केला आहे. श्री भोंडे यांनी १९७३ साली एक लेख पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या तरुण भारत या अंकात लिहिला. **"मांगानाच कर्नाटकात मादिग म्हणतात आणि गुजरातेत मांगेल म्हणतात असे म्हंटले आहे. डॉ. ताराबाई परांजपे यांनी मराठवाड्याच्या पूर्व सरहद्दीवरील लोक साहित्याचा अभ्यास या शोध पदवीसाठी लिहिलेल्या प्रबंधात आंध्रात मांगाना मादिग असे म्हणतात आणि हे मांगांचे प्रदेशविशिष्ट नाव आहे" असे म्हंटले आहे.**

थोडक्यात असे कि मांग, मादिग आणि मांगेल या स्वतंत्र जाती असल्याचे दिसून येत असले तरी त्यांचे समाजातील स्थान, इतर जातींशी यांचे असलेले संबंध, उपासनापद्धती पूर्वपरंपरा यावरून या तीनही जाती एकाच जातीची प्रदेश विशिष्ट नाव आहे असे म्हंटले आहे. तीनही जातीचे लोक मरीआईचे उपासक आहेत. जांबऋषीला आपला मूळ पुरुष मानतात. त्यांचे मागते त्यांना जातीपुराण ऐकवतात. या तीनही जातींचे लोक प्राचीन काळात साक्षिन भारतात होऊन गेलेल्या मातंग या राजवंशाचे आपण वंशज आहोत असे मानतात. **या माहितीवरून कर्नाटक, गुजरात तसेच आंध्रप्रदेशमध्ये देखील मांगाना मादिग संबोधले जाते हे स्पष्ट होते.**

## ३. मुंबई इलाख्यातील जाती, गोविंद मंगेश कालेलकर

गोविंद मंगेश कालेलकर, मुंबई इलाख्यातील जाती या पुस्तकामध्ये लेखकाने असे नमूद केले आहे कि, मांग हे महाराष्ट्र, कर्नाटक व दक्षिणगुजराथ येथे आढळतात. यास कानडीत मादिग व गुजराथीत मांगेला असे म्हणतात. संस्कृतात मातंग ह्या नावाच्या जातींचे वर्णन आहे. तेच हे मांग होत. ते आपली उत्पत्ती जांब ऋषीपासून झाली आहे असे सांगतात.महारांप्रमाने यांस अस्पृश्य गणण्यात येते. यावरून ते येथील मूळ रहिवाशांपैकी असावे. असे दिसते.

दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक येथील मांग चामड्याचे दोर, चाबूक वैगेरे जिन्नस करतात. तसेच ते तागाचे दोर, शिंदीच्या केरसुण्या आणि बांबूच्या टोपल्या, पडदे इत्यादी जिन्नस करतात. ते झाडू वाल्याचे काम करतात, शेती करतात, मजुरी करतात. व एका गावातून दुसऱ्या गावास निरोप पोचविण्याचे कामा करतात. काही वाजंत्री आहेत. गुजराथेतील मांगेला टोपल्या व सुपे करतात. मांग, मादिग आणि मांगेला ह्या तीन प्रातींक स्वरूपाच्या स्वतंत्र जाती असून त्यांचा परस्पर रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत.

मादिगात तेरा पोटभेद आहेत; 1. असादरू, 2. चन्न होलीया  3. डकलेरू 4. डबके मादिग, 5 दळ्या 6. ढोर 7. मांग गड्डेरु 8. मांग गडीगेर 9. मिनी मादिग, 10. मोचीगर किंवा मोची 11. पेड किंवा फेड 12. मांग राउत 13. सनादी किंवा वाजंत्री , ह्यातील बहुतेक पोटभेद मराठा मांगातही आढळतात. ह्यावरून मराठा मांग व कानडी मुलाचे एकाच असावे असे अनुमान होते. मोची, फेड आणि सनादि यांचा परस्पर रोटी व्यवहार होतो, परंतु एकमेकांशी विवाह जुळत नाहीत

किंवा बेटी व्यवहार होत नाही. मादिगांच्या चालीरीती व धर्मसमजुती मांगाप्रमाणेच आहेत. मात्र ते डुकराचे मांस खात नाहीत.



४. **"पिपल ऑफ इंडिया नॅशनल सेरीस Vol - II, द शेड्यूल्ड कास्ट , के. एस** सिंग, 1993

या संदर्भानुसार मादगी लोक हे आंध्रप्रदेश मधून स्थलांतरित झाले असून यांची बोलीभाषा तेलगु आहे. 1981 भारतीय जनगणना अहवालानुसार मादगी समाजाची एकूण लोकसंख्या 34,544 एवढी असून त्यात 17,366 पुरुष आहेत तर 17,178 इतकी स्त्रियाची संख्या आहे. हा समाज मुख्यत्वे ग्रामीण भागात आढळतो.

या समाजातील लोक मुख्यत: मांसाहारी आहेत. ह्या समाजातील लोक डुकराचे मास खातात. तसेच ज्वारी व भात हे या ह्या समाजातील लोकांचे मूळ अन्न आहे. मादगी समाजाची व कुटुंबाची कुलदेवता 'जाकीदी अन्जम्मा' हि आहे. गावपातळीवरती मादगी लोक 'पोचम्मा' व

क्षेत्रीय पातळीवरती ‘आदि शक्ती’ या देवतांची पूजा करतात. मार्कंड ऋषी मंदिर व विठ्ठलाचे पंढरपूर हि मादगी समाजाची श्रद्धास्थाने आहेत. मादगी समाजातील लोकांचे धर्मगुरु हे मगर समाजातील असतात.

मादगी समाजातील जुन्या पिठीतील लोक मातृभाषेतून बोलतात तर नवीन पिठी ही मराठी ह्या क्षेत्रीय भाषेचा वापर करते. मादगी समाजातील लोक हि हिंदू समाजाचा विरोध करतात. तसेच ह्या समाजातील बऱ्याच लोकांनी ख्रिस्त धर्म स्वीकारला आहे. मादगी समाज खाली नमूद केलेल्या उपजाती मध्ये विभागाला आहे.

१-मार मादगी, २- सिंधी मादगी, ३- दक्लेडू मादगी ४- मोची किवा चांभार मादगी, ५- मुत्तुडू मादगी. मादगी समाजात चुलत भावा बहिणीच्या विवाहाला परवानगी आहे. विवाह हे कुटुंबाच्या संमतीने व वाटाघाटी करून पार पाडले जातात. प्रामुख्याने विवाहाच्या वेळी वराचे वय २० वर्ष व वधूचे वय १२ वर्ष असते. ह्या समाजात एकविवाह पद्धत आहे. परंतु दुसरा विवाह सुद्धा पहिल्या पत्नीच्या संमतीने केला जातो. विवाहाची व्यवस्था जात पंचायत करते तसेच या विधीत रुपये ५१, सुपारीचे पान व सुपारी दिले जातात. घटस्पोटाची प्रक्रिया (सोडचिठ्ठी) हि मुख्यत्वे जात पंचायत कडून पार पडली जाते. घटस्पोटीत महिलेचा दुसरा विवाह यास ‘पट’ म्हटले जाते. बौद्ध समाजातील भिक्खूकडून विवाहाचा विधी पार पडला जातो. विवाह समारंभाच्या सुरवातीला ‘पोचम्मा’ देवीची आराधना केली जाते. विवाह समारंभ प्रामुख्याने मराठी भाषिक यांच्या धार्मीक पद्धतीने केला जातो. काही आंतरजातीय विवाह सुद्धा नोंदविल्या गेल्या आहेत. मादगी समाजात बाळ जन्माला आल्याच्या १० व्या दिवशी नामकरण समारंभ आयोजित केला जातो त्यास ‘बारस’ असे म्हणतात.

मादगी लोक हिंदू तसेच मुस्लीम समाजातील सण व उस्तवातही सहभाग घेतात. मादगी समाजातील लोकांचा पारंपारिक व्यवसाय, मेलेल्या जनावरांची हाडे व त्वचा काढून त्यांची विल्हेवाट लावणे हा आहे. ह्या समाजातील काही लोक त्यापासून चप्पल व बूट बनवण्याचा व्यवसाय करतात. तर काही लोक त्यापासून चामडीची दोरी व विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणारे चामडीचे भांडे (मोट) बनविण्याचा व्यवसाय करतात त्या भांड्यास मंथनवाडा किवा माशक म्हणतात. त्याबरोबर काही लोक गावात लग्न व मृतुच्या विधी कार्यात हलगी वाजविण्याचे काम करतात. तसेच काही लोक दैनिक भत्त्यावर व शेतातही मजूर (सालगडी)

म्हणून काम करतात. काही लोक सरकारी नोकरीवर असून शिक्षक , रेवेन्यु इन्स्पेक्टर, पटवारी आणि फोरेस्ट गार्ड या पदावर काम करत आहेत.

अंत्यसंस्काराच्या विधीत, पुरुषाचे मृतशरीर (ईशम्भर) हे नवीन पांढऱ्या कपड्यामध्ये गुंडाळले जाते व बांबूच्या शिडी वरती उचलवून अंत्यसंस्काराच्या ठिकाणी आणले जाते. तसेच विधवेकडून विवाहित असल्याचे सर्व चिन्ह, अलंकार नष्ट करेपर्यत मृतशरीर ठेवले जाते व नंतर अंत्यसंस्कार विधी पार पडला जातो.



**५. भारतातील मध्य प्रांतामधील आदिवासी व जाती (खंड - I आणि II) रॉबर्ट वॅन रसेल**

भारतातील मध्य प्रांतामधील आदिवासी व जाती (खंड - I आणि II) रॉबर्ट वॅन रसेल यांच्या या संदर्भानुसार चामड्याच्या कामाशी संबंधित कामगारांचा तेलगू जाती, मद्रास, मैसूर आणि हैद्राबादमधील जवळपास १ कोटी ७० लाखांची संख्या आहे. १९११ मध्ये सेंट्रल प्रोव्हिन्सेसमध्ये सुमारे ६००० व बेरारमध्ये ३ हजार मादगी समाजाचे लोक होते.




BUFFALO SACRIFICE. HEAD WITH FOOT IN THE MOUTH.

चंदामध्ये मादगीच्या सहा उपजाती आढळून आल्या आहेत. नळका चंद्रिया किंवा पुजारी, अनापा किंवा कातडी व्यावसायिक; सिंधी जे लोक नाटकांमध्ये अभिनयाचे काम करतात, मस्ती किंवा नर्तक; कोम्मू किंवा कथा कथन करणारे; आणि वंशावळीतज्ञ. असे म्हटले जाते की कोम्मू म्हणजे खरोखर शिंग व डेक्का म्हणजे खूर, या दोन्हीही संज्ञा सर्वात खालच्या उपविभागात आहेत, त्याचसोबत सर्वात हीन स्थान व्यापत प्राप्त आहे. त्यांना पलंगावर झोपायला मनाई असे त्याच सोबत झाडांची पाने तोडणे, गाढव वगळून इतर कोणत्याही जनावरांवर भार वाहणे. स्वत: साठी अन्नही शिजवू नये, परंतु इतर मादगी जातींच्या किंवा इतर कोणत्याही जातींच्या सदस्यांनी खाऊन उर्वरित राहिलेले अन्न खाऊन निर्वाह करावे.

नल्का चंद्राय्या किंवा पुजारी हे सर्वोच्च उपजाती असून आहेत आणि ते इतर कोणत्याही अन्नातून अन्न किंवा पाणी घेत नाहीत याव्यतिरिक्त उर्वरित चार उपजाती एकमेकांसोबत अन्न व पाणी घेतात, परंतु परस्पर विवाह करत नाहीत. असे अनेक सामाजिक गट आहेत जे त्यांच्या समाजांतर्गत विवाह करत नाहीत. यापैकी बहुतांश नावे प्रादेशिक नावे आहेत. याव्यतिरिक्त काही नावे काल्पनिक किंवा सर्वसमान अशी आहेत. मुक्किडी, नाक नसलेली; कुमारा, कुंभार; नागरवार, नागरिक; डब्बुलवार, ज्याच्याकडे डब्बुलु किंवा तांबे नाणे आहेत; म्हाहु वृक्षापासून इप्पावर; इटकलवार पासून इटकल, इत्यादी. मादगी जात अपवित्र

जात असून ते सर्व इतर जातींच्या समाजाने शिल्लक ठेवलेले, शिळे अन्न खातात.त्यांचा त्यांच्या स्पर्शाने विटाळ पसरत असल्याने त्यांना गावाबाहेर राहावे लागत असे.

**मादिगा समाजाची विविध राज्यातील यादी व अनुक्रमांक व लोकसंख्या**




Source :- https://joshuaproject.net/assets/media/profiles/maps/m16625.pdf

| **राज्य** | **अनुसूचित जातीच्या यादीतील क्रमांक** |
|---|---|
| आंध्रप्रदेश | ३२ क्रमांक - मादिगा (Madiga) |
| आंध्रप्रदेश | ३३ क्रमांक - मादिगा, दासू, मश्तीन (Madiga, Dasu, Mashteen) |
| कर्नाटक | ६१ क्रमांक - मादिगा (Madiga) |
| महाराष्ट्र | ३६ क्रमांक- मादिगा (Madiga) |
| ओडिशा | ५४ क्रमांक मादिगा (Madiga) |
| तामिळनाडू | ३८ क्रमांक — मादिगा (Madiga) |

**मादिगा :-जनगणना अहवाल- २०११**

| क्र. | जिल्हा | लोकसंख्या | क्र. | जिल्हा | लोकसंख्या | क्र | जिल्हा | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | ० | १३ | कोल्हापूर | १७ | २५ | रायगड | १०५ |
| २ | अमरावती | १६८ | १४ | सातारा | १० | २६ | रत्नागिरी | २ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बुलढाणा | ० | १५ | सांगली | ५३ | २७ | सिंधुदुर्ग | १०३ |
| ४ | यवतमाळ | २२ | १६ | नागपूर | ६८१ | २८ | औरंगाबाद | ६३ |
| ५ | वाशीम | ० | १७ | वर्धा | ११ | २९ | जालना | १८ |
| ६ | नाशिक | ९४ | १८ | भंडारा | २ | ३० | परभणी | १८ |
| ७ | अहमदनगर | १५ | १९ | गोंदिया | ३ | ३१ | हिंगोली | ० |
| ८ | धुळे | १ | २० | गडचिरोली | १७४ | ३२ | बीड | १ |
| ९ | जळगाव | २३ | २१ | चंद्रपूर | १९३९ | ३३ | | |
| १० | नंदुरबार | ९ | २२ | मुंबई विभाग -१९६१ ) | ३२७८ | ३४ | उस्मानाबाद | ० |
| ११ | पुणे | ९३० | २३ | मुंबई | ३४४० | ३५ | लातूर | १५ |
| १२ | सोलापूर | ११० | २४ | ठाणे | ३८५२ | | एकूण | १५३१८ |
| | | | | नांदेड | १६१ | | | |

**प्रस्तुत संशोधन अभ्यास हा मादिगा समाजाच्या जातीच्या झालेल्या चुकीच्या नोंदींच्या संदर्भात असून त्यांच्या नोंदी या प्रामुख्याने मोची, चांभार, चमार, महार, भंगी अशा झालेल्या आहेत, मादिगा समाजाची मानववंश शास्त्रीय माहिती सोबतच सामाजिक आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी तपासत असताना या समाजाच्या महार, मांग,मातंग, मोची या नोंदी होण्याचे काही कारण किंवा सह संबंध तपासण्यासाठी या जातीसंदर्भात माहिती नमूद होणे आवश्यक आहे.**

**६. मुंबई इलाख्यातील जाती; गोविंद कालेलकर**

अ. **चांभार समाज:**

गुजरातमध्ये या जातीसामान जी जात आहे, तिला मोची किंवा चमार म्हणतात. चांभारास कानडा जिल्ह्यात चमगार आणि कर्नाटकात समगार असेही मानतात. चांभार हा शब्द जातीदर्शक असून शिवाय त्याचा अर्थ चामड्याचे काम करणारा असाही असल्यामुळे हे काम करणाऱ्या इतर जातीसहि तो लावण्यात येतो.चांभारांची अस्पृश्यता गणना होते व महारांप्रमाणे त्यांनाही गावाच्या सीमेबाहेर राहावे लागते. वैदिक काळी आणि बुधाच्या पूर्व काळी चामड्याचे काम करण्याचा धंदा हलका मानला जात नसे. यजुर्वेदाच्या वाजसनेय संहितेच्या पुरुश्मेध नावाच्या भागात चार्मान्न (चांभार) योग्य बळी आहे असे सांगितले आहे. पाली जातकात ज्याच्याशी राजे संबंध ठेवीत असत असा अठरा व्यापाऱ्यांच्या संचांचा उल्लेख आहे. ह्यापैकी एक संघ चम्मकारांचा (चांभारांचा) होता.

साधारणतः चांभार सुरेख असतात, आणि त्यांच्या स्त्रियांची ( विशेषतः) कानडा जिल्ह्यातील स्त्रियांची) सौंदर्यविषयी ख्याती आहे, ह्या गोष्टीवरून त्यांच्यात आर्यांचे थोडे तरी रक्त असावे असे जे कित्येकांचे म्हणणे आहे त्यास बळकटी येते. उलट पक्षी त्यांच्यात आढळून येणारे देवकांचे अवशेष व त्यांनी पत्करलेला नीच धंदा यावरून ते येथील मुळचे रहिवासी असावे असे दिसते. निदान इतके तरी दिसते कि, आर्य लोक पूर्वी चामड्याचे काम करीत असत. पुढे चामड्याच्या स्पर्शाने विटाळ होतो हे मत जेव्हा स्वीकारण्यात आले आणि चामड्याच्या धंद्यास हीन स्वरूप प्राप्त झाले तेव्हा जे आर्य हा धंदा करीत असत त्यास समाज बहिष्कृत करण्यात येऊन ते मुळच्या राहिवाशात सामील झाले असावे.

चांभारात भाषा भिन्नत्वेमुळे झालेले मराठा आणि कानडी असे दोन पोटभेद आहेत. मराठा चांभारात चेवली, दाभोली, घाटी, कोकणी इत्यादी प्रांतिक स्वरूपाचे पोटभेद आहेत. खान्देशात आहिर नावाचा एक पोटभेद असून बाकीच्यास हरली चांभार असे म्हणतात. कोल्हापुरात चामड्याच्या कामच्या दोन प्रकारांवरून दोन पोटभेद झालेले आढळतात. त्यांच्यात आडनावाने दर्शवली जाणारी अनेक कुळे आहेत. त्यांच्यात देवकेही आहेत, त्यापैकी खालीलप्रमाणे आहेत.

**चांभार जातीतील कुल व गोत्र**

| **कुळाचे नाव** | **गोत्राचे नाव** |
|---|---|
| अहिरराव | निम |
| अरखे | हरियाळी |
| बमने | पाचपालवी |
| भोसले | राजहंसाचा पंख |
| डोईफोडे | पाचपालवी |
| करंडे | पाचपालवी |
| पवार | पाचपालवी |
| शेळके | वड |
| शिंदे | मर्यादवेल |
| वसाईत | वासनवेल |

रत्नागिरी जिल्ह्यातील चांभारांची देवके उंबर, कळंब, मोराचे पीस, गरुडाचा पंख, आणि कोया (एक पक्षी) ही आहेत. मराठा चांभार मुख्यत्वेकरून बहिरोबा, जनी, जोखाई, आणि जाखाई यांस भाजतात. त्यांचे उपाध्ये ब्राम्हण असतात. ठाणे आणि अहमदनगर जिल्ह्यात त्यांचे अंत्यविधी

अनुक्रमे कुंभार आणि जंगम चालवितात. मृतास जाळण्यात अगर पुण्यातही येते. ते मांस खातात व दारू पितात.

कानडी चांभार संप्रदायी आहेत. त्यांचे उपाध्ये कऱ्हाडे किंवा हविक ब्राम्हण असतात. कर्नाटकात अंत्यविधी जंगमांकडून चालविला जातो. मृतास पुरतात. ते महालय करतात, शार्ध करीत नाहीत ते मांस खातात व दारू पितात.

आ. **भंगी समाज**:

इलाख्यात सर्वत्र आढळतात. गुजराथेत त्यांना हलालखोर, ओळवाना, बारवाशिया, मेत्तरिया, जंफोडा आणि मेला अशीही नावे आहेत. ह्यापैकी हलालखोर हे नाव महाराष्ट्रातही प्रचलित आहे.भंगी हि हिंदू समाजातील सर्वात हलकी जात असून त्यांच्यात दुसर्या जातींनी जातीबाहेर टाकलेल्या अनेक लोकांचे संमिश्रण झालेले आहे. ह्याप्रमाणे त्यांच्यात एकसारखी भेसळ आहे. गुजराथेत त्यांना जरी धेंडापेक्षा अमंगल व हलके मानण्यात येते, तरी धेंडापेक्षा त्यांच्याकडे लोक अधिक दयार्दतेने पाहतात. धेंडाप्रमाणे त्यांना कधीही अपमानकारक निर्बंध घालण्यात आले नव्हते. उलट टोपली घेऊन चाललेला भंगी समोर आल्यास तो शुभ शकून मानतात व भांग्यांचा आशीर्वादही शुभदायक समजतात. महाराष्ट्रात त्यांचा दर्जा महार मांगाप्रमाणे आहे.

भंगी पुरुष व बायका मल वाहून नेतात व रस्ते झाडतात. ते वेळूच्या टोपल्या करतात आणि गुरांशिवाय इतर मेलेल्या जनावरास पुरतात. गुजराथेत प्रवाशास वाट दाखविण्याचे काम भंग्यांचे आहे.

महाराष्ट्रातील भंग्यात १) भसोड, २) चनगडी, ३) हेला, ४) लालबेटी, ५) मखियार आणि ६) शेख असे सहा पोटभेद आहेत. त्यापैकी लालबेगी आणि शेख यांचा परस्पर रोटी व्यवहार होतो. व फक्त पुण्यात बेटी व्यवहार होतो. बाकीच्या चार पोटभेदांपेक्षा त्यांना श्रेष्ठ मानण्यात येते. ह्या चारी पोटभेदांचा परस्पर रोटी बेटी व्यवहार होत नाही.

सहा-सात पिढ्यांच्या आत लग्न करीत नाहीत. विधवा विवाह आणि सोडचिठ्ठी यांस मोकळीक आहे. शेख भंगी आपणास मुसलमान म्हणवितात. लाल बेगी अर्धवट हिंदू अर्धवट मुसलमान आहेत. शेख शिवाय करून बाकीचे सर्व हिंदूंचे बहुतेक देव व मुसलमानांचे पीर यांस भाजतात. ते देवळापर्यंत काही अंतरावर उभे राहून देवास नमस्कार करतात. गुजराथेत भंग्यांची

लागणे गारुड चालवितात. महाराष्ट्रात त्यांची लागणे हुसेनी ब्राम्हण चालवितात. फक्त शेखांची लागणे मात्र काजी लावतात. मृतास जाळण्यात अगर पुरण्यात येते. ते श्राद्ध करीत नाहीत.

भंगी गोमांसासुद्धा सर्व प्रकारचे मांस खातात व दारू पितात. महाराष्ट्र आणि सुरत शिवाय करून इतर ठिकाणी ते मृत जनावरांचेही मांस खातात. महाराष्ट्रातील भंगी इतर मांस खाणाऱ्या जातीप्रमाणे श्रावण महिन्यात मांस खात नाहीत आणि खेद जिल्ह्यातील भंगी सनाच्या दिवशी मास खात नाहीत. गुजराथेतील भंगी बाजानिया आणि वाघ्री शिवाय इतर सर्व जातींच्या हाताचे अन्न खातात. महाराष्ट्रात ते महार मांगांच्या हाताचे अन्न खात नाहीत व महार मांग त्यांच्या हाताचे अन्न खात नाहीत.

**सारांश**

**रसेल हिरालाल आणि के. एस. सिंग यांच्या संदर्भातील माहितीचा पडताळा प्रत्यक्ष लक्ष गट चर्चेद्वारे घेण्यात आला परंतु बदलत्या काळानुसार या माहितीला पृष्टी करणारी माहिती उपलब्ध झाली नाही.**

**मादिगा समाजाची पुढे प्रस्तुत करण्यात आलेली मानव वंश शास्त्रीय माहिती आणि वरील संदर्भ साहित्यामधून संकलित करण्यात आलेली भंगी आणि चांभार समाजाची माहिती यामध्ये कोणत्याही प्रकारचे साम्य दिसून येत नाही, त्यांची आडनावे रूढी परंपरा, कुळ गोत्रे यामध्ये भिन्नता असून यावरून मादिगा चांभार आणि भंगी, महार या जाती एका वर्गामध्ये येत असल्या तरी जातीच्या असणाऱ्या वैशिष्ट्यानुसार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे साम्य नाही.**

## प्रकरण चौथे

# मानववंशशास्त्रीय माहिती

# मानववंशशास्त्रीय माहिती

---

मादिगा समाजाचे प्रतिनिधी, अभ्यासक यांच्या सोबत झालेल्या लक्षगट चर्चा व संदर्भ ग्रंथ, संशोधन साहित्य, लेख, संकेतस्थळ अशा विविध स्त्रोताद्वारे उपलब्ध संदर्भ साहित्यांमधून प्राप्त माहितीच्या आधारे मादिगा समाजाची मानववंशशास्त्रीय दृष्ट्या प्राप्त माहिती खालीलप्रमाणे मांडण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या १९५० साली प्रसिद्ध झालेल्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये मादिगा समाजाचा उल्लेख आहे. महाराष्ट्र राज्याच्या यादीमध्ये केवळ मादिगा म्हणून समाजाचे नाव असले तरी हा समाज मादिगा, मादरा, आदि जांबावा, मातंगी, मोक्कलू आणि मादरू या नावाने देखील ओळखला जातो. पूर्वी कातडी कमावणे, हलगी वाजवीने या व्यवसायामुळे हा समाज "मोची" म्हणून देखील ओळखला जातो. या समाजातील अनेक व्यक्तींच्या जातीच्या दाखल्यावर "मोची" जातीचा उल्लेख असल्याबाबतचे प्रत्यक्ष या समाजातील व्यक्तींनी सांगितले आहे.

**व्यवसाय :**

हा समाज हलगी वाजविणे, चप्पल शिवणे, कातडी काम करणे, मेलेल्या जनावराची कातडी काढणे अशा पद्धतीची कामे देखील करत असत. त्यामुळेच अनेक ठिकाणी या समाजाला मोची म्हणून देखील ओळखले जाते. यांचे मुळ आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यांमध्ये असून व्यवसाय, नोकरीच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये स्थलांतर झालेले आहे.

**आडनावे :**

मुख्यतः पुंद्री, इटकल, पल्ले, कानडी, जगले, देवनोळ, डोल, मुड्मल, कोनांटी, म्हेत्रे, एलसणती, गुरजाल, गोपरेड्डी, तलवार तर सोलापूर व महाराष्ट्राच्या सिमालगत जिल्ह्यांमध्ये अशी आडनावे यांच्यामध्ये दिसून येतात. तर या समाजाची बोलीभाषा तेलगु व कन्नड आहे.

**लोकसंख्या :**

२०११ च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ५६४८१ इतकी आहे. मुंबई-उपनगर, मुंबई, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, पुणे, सोलापूर, नांदेड, यवतमाळ व नागपूर या ठिकाणी अधिक प्रमाणात लोकसंख्या दिसून येते.

**कुळ**

मादिगा समाजामध्ये नारीपोगु, वेसापोगु, लक्केपोगु, बिरापोगु, परीसिपोगु,पल्लेपोगु, कोलीकापोगु, कोनिकापोगु, कोदेपोगु, गंगेपोगु, कात्तेपोगु, राम्पोगु, केसापोगु, बेसुपोगु, मेसापोगु, कन्नेपोगु, मल्लेपोगु अशा प्रकाची गोत्र अस्तित्वात असून याव्यतिरिक्त गोत्रे असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कुलदैवत :**

मादिगा समाज रामायणातील जांबमुनी ऋषीच्या नावाने म्हणजेच आदि-जांबूमुनी या नावाने देखील ओळखला जातो. डिसेंबर महिन्यातील २२ तारखेला जांबमुनी ऋषींच्या नावाने जयंती साजरी केली जात असल्याचे समाजातील धार्मिक विधी पार पडणाऱ्या प्रतिनिधींनीकडून सांगण्यात आले. याबाबत लिखित उल्लेख संदर्भ साहित्यामध्ये आढळून आला नाही. यल्लमा, जमलम्मा, रेणुका माता, पंढरपूरचा विठ्ठल, नरसिंह, खंडोबा, पोषम्मा, अंजनेय, हनुमान, मारुती, बालाजी, कुरुमुर्ती या देवदेवतांना मादिगा समाजामध्ये मानले जाते.

**मादगी समाजातील रूढी परंपरा:**

मादिगा लोक आपल्या अडचणी, परिस्थिती, जगण्यातल्या समस्या दूर करण्यासाठी किंवा इच्छित



मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवीला नवस बोलतात. त्यातही यामध्ये महिलाकडून नवस करण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्या महिला नवस करतात, इच्छापूर्ती झाल्यास त्यांना तो पूर्ण करावा लागतो, अन्यथा अघटीत घटना घडतात,

संकट येतात अशी भावना मादिगा लोकांच्या मनात असते. नवस पूर्ण करण्याकरिता विशिष्ट प्रकारचा विधी केला जातो. घरासमोरील अंगणामध्ये जमिनीवर शेणाने सारवले जाते. त्यावर हळदी व कुंकुचा चौरंग बनवतात (चौकट) त्यावर ज्वारीचे पीठ टाकले जाते. चारी बाजूने खारीक खोबरे सुपारी व ब्लावुज पीस ठेवले जातात.

चौरंगाच्या मधोमध गव्हाची रास टाकून त्यावर कणकेचा दिवा ठेवला जातो. नैवेद्य म्हणून ताडीचे दोन माठ समोर ठेवले जातात. घरामध्ये पुरण पोळीचा स्वयंपाक करून नैवेद्य दिला जातो. तेथे जागेवर नारळ फोडला जातो. नवस फेडणाऱ्या महिलेला चौरंगाच्या समोर आणले जाते. नातेवाईक आणि शेजारची मंडळी मिळून तिच्या अंगाला हळदी- कुंकू लावतात. परडी घेऊन जोगवा मागणाऱ्या मातंग समाजाच्या महिलांना किंवा ज्यांच्या अंगात येते अशा महिलांना हळद लावण्याचा मान दिला जातो.

हळद लावल्यानंतर नवस फेडणाऱ्या महिलेला घरात नेले जाते. तिच्या अंगावरील वस्त्र काढून टाकले जातात आणि कपड्यांऐवजी संपूर्ण अंगाला लिंबाचा पाला बांधून अंगणात आणले जाते. महिलेला चौरंगाभोवती फेऱ्या मारण्यास सांगितले जाते आणि तिच्या मागेमागे घरातील इतर सर्व मंडळीदेखील फेऱ्या मारतात. ढोल ताशा (हलगी) च्या साथीने मातंग समाजातील महिला यल्लमा देवीची गाणी म्हणतात. काहीवेळा मातंग समाजातील तसेच मादगी समाजातील महिलांच्या अंगात येते. अंगात आलेल्या देवीचे भंडारा वैगेरे लावून , तिला नैवैद्य देवून शांत केले जाते. त्यानंतर सर्वजण वाजत गाजत देवीच्या मंदिरामध्ये जातात. मंदिरामध्ये जाताना नवस फेडणारी महिलेच्या  तोंडामध्ये लिंबाचे पान धरायला दिले जाते आणि डोक्यावर कणकेचा दिवा ठेवला जातो. सोबत देवीला बळी देण्यासाठी बकरं नेले जाते. डोक्यावरील दिवा देवीसमोर ठेवून देवीची पूजा केली जाते. हि पूजा फार मोठी असते. पूजेदरम्यान देवीला बकऱ्याचा बळी अर्पण केला जातो, त्यासाठी मुस्लीम समाजातील व्यक्तीला बोलावले जाते. यानंतर महिलेचे नातेवाईक तिला चोळी-बांगडी , साडी चा आहेर करतात आणि पूजा आटोपली जाते. हि पूजा साधारणः सकाळी सात वाजता सुरु होते आणि मध्यरात्री पर्यंत चालू असते.

बळी दिल्यानंतर बकऱ्याच्या मटणाचा मंदिराच्या आवारातच स्वयंपाक तयार केले जाते आणि सर्वांना जेवण दिले जाते. उरलेले अन्न प्रसाद म्हणून वाटतात. नवस फेडण्यासाठी सलग तीन वर्ष अशा पद्धतीने पूजा केली जाते. आर्थिक परिस्थिती चांगली असणारे मादिगा समाजाचे लोक यापेक्षा जास्त वर्षासाठी देखील नवस बोलतात.

**पुरुषास नामम ओढणे:-**

मादिगा समाजात ज्या प्रमाणे महिलांना देवी बांधली जाते, त्याचप्रमाणे घरातील ज्येष्ठपुरुषांना किंवा सर्वात लहान मुलास नामम टाकला जातो. हनुमान व नरसिंह देवाचे आराधना करण्यासाठी पुरुषांना नामम दिला जातो. ज्यांना नामम दिला आहे त्यांनी दर शनिवारी व सोमवारी  हनुमान व नरसिंह देवाच्या नावाने उपवास करायचा असतो. उपवासाच्या दिवशी घरातील सर्व लोक नामम धारित पुरुषांचा उपवास सोडून झाल्यानंतरच भोजन करतात.

**विशिष्ट प्रकारचे दागदागिने - अलंकार :**

प्रत्येक महिला रेणुका देवीची माळ परिधान करते. यावर लहान लहान टिकल्या (धातूची गोल-चपटी नाणी प्रमाणे) असतात यावर रेणुका देवीची प्रतिमा असते.

**जन्मविधी:**

बाळंतपण करणाऱ्या महिलेला "सुलगीती" (सुईन) म्हणतात. जन्मानंतर तिसऱ्या दिवशी "फुरुड" नावाचा कार्यक्रम / विधी केला जातो. बाळाची नाळ कापून  छोट्या मडक्यात  ठेवले जाते. त्यानंतर ते मडके अंगणात खड्डा करून पुरतात. मडके पुरलेल्या जागी फरशी बसवून फरशीवर लिंबाचा पाला, हळद,कुंकू टाकून पूजा करतात. घरातील वयस्कर महिलेला पूजेचा मान दिला जातो. सुलगीती बाई बाळाला कमीत कमी पाच दिवस सकाळ - संध्याकाळ त्या ठिकाणी आंघोळ घालते.

**बारसे:**

बाळ सव्वा महिन्याचे झाल्यानंतर किंवा आपल्या सोयीनुसार बाळाच्या नामकरणाचा कार्यक्रम केला जातो. बाळंत महिलेचे आई - वडील बाळासाठी पाळणा आणतात. नामकरण करतेवेळी बाळाला पाळण्यात टाकण्याच्या अगोदर मुरमुरे कपड्यात बांधून  पाळण्यात  ठेवतात. कार्यक्रमादरम्यान हरभरा, चवळीच्या घुगऱ्या व मुरमुरे लोकांना वाटले जाते. काही ठिकाणी हुलगे वाटले जातात. पाळण्याखाली तांदूळ ठेऊन त्यावर तांब्या ठेऊन त्याची पूजा केली जाते. बाळाची आत्या किंवा आजी बाळाचे नाव ठेवते.

## मुलगी वयात आल्यानंतर करण्यात येणारे विधी

"पदमंशी" किंवा "येडताळा" नावाचा विधी केला जातो. मुलगी वयात आली की, मुलीला सात किंवा नऊ दिवस बाजूला बसविले जाते. घरामध्ये एका बाजूला मखराप्रमाणे सजवले जाते, त्यामध्ये रोज संध्याकाळी मुलीला बसवले जाते. त्यानंतर घरातली मंडळी, नातेवाईक आणि शेजारी सर्वजन मुलीच्या वयात येण्याबद्दलची गाणी म्हणतात. त्यामधून तिला पुढील आयुष्याबद्दल दिशा देतात. या संपूर्ण काळामध्ये शिवाताशिवत पाळली जाते. या नऊ दिवसांमध्ये मुलीची आत्या (सुवासीन) मुलीला हळद लावून आंघोळ घालण्याचे काम करते. मुलीच्या आहारामध्ये हलका आणि पौष्टिक आहार दिला जातो, तेलकट तिखट दिले जात नाही. तसेच डिंकाचे लाडू, गुळ- खोबरे खाण्यासाठी दिले जाते. शेवटच्या दिवशी पुरणपोळीचा स्वयंपाक करून सर्वांना गोडधोडाचे जेवण दिले जाते. नऊ दिवस मुलीची सेवा केल्याबद्दल आत्याला कपड्याचा आहेर केला जातो, मानपान केला जातो.

## लग्न जमविण्याची पद्धत:

पूर्वी विवाह ठरविताना मुलामुलींचे मत विचारात घेतले जात नसत. त्यांच्या घरातली जेष्ठ मंडळी मुलामुलींची लग्न जुळवत असत. विवाहापूर्वी मुलगा व मुलगी समोरासमोर येत नसत, लग्न ठरविण्याचा संपूर्ण अधिकार घरातील मंडळ बजावत. लग्नायोग्य वय झाल्यानंतर नात्यामध्ये किंवा इतर ठिकाणी विवाहयोग्य मुलगी बघायला सुरुवात केली जात. ज्या घरी लग्नायोग्य मुलगी आहे अशा ठिकाणी घरातले तीन चार मंडळी मुलगी पाहायला जात. मुलगी पाहिल्यानंतर, ती मुलगी पसंत असेल तरच त्या घरचे पाणी घेतले जात. मुलगी पसंत नसेल तर मुलाकडील मंडळी पाणीही न घेता घरातून निघून जातात. यावरून वधूकडील मंडळी मुलगी पसंत आहे किंवा नाही हे समजून जातात. मुलाकडील मंडळींनी मुलगी पसंद असल्याचे सुचवल्यानंतर मुलाकडील आणि मुलीकडील पुरुष मंडळी ताडी प्यायला जात, म्हणजेच विवाह पक्का झाले समजले जात. वधू व वराच्या जन्मपत्रिका पाहून मुहूर्त पाहून साखरपुडा ठरविला जातो. साखरपुड्याचा खर्च नवरीकडे असे.

## देवाण-घेवाण

देवाण-घेवाण म्हणून मुलाकडील मंडळी मुलीकडच्या कुटुंबियांना "होली" देत, म्हणजेच ऐपतीप्रमाणे रोख रक्कम देत. तुमच्या घराची लक्ष्मीरुपी मुलगी आमच्या घरी व आमच्या घरातील लक्ष्मीरुपी रक्कम तुमचे घरी ही भावना मुलाकडील मंडळींमध्ये असते.

**साखरपुडा:**

पंचवीस एक किलो तांदूळ आणि नऊ खोबऱ्याच्या वाट्या, खारीक, हजार एक खाण्याचे पानं, अर्धा किलो सुपारी अस सर्व साहित्य नवऱ्या मुलाकडील मंडळी मुलीकडच्यांना देतात. मुलीला साडी दिली जाते. पाच महिलांकडून मुलीची ओटी भरली जाते. मुलगी मुलाला चांदीची अंगठी घालते. त्यानंतर नवऱ्या मुलाला कपड्यांचा आहेर केला जातो. आणि साखरपुडा कार्यक्रम संपन्न होतो. साखरपुड्यानंतर उपस्थित सर्वांना पान, सुपारी व साखर दिली जाते आणि जेवणाचा कार्यक्रम केला जातो.

**विवाह पद्धत** (वर-वधु पाहण्यापासून ते विवाहानंतरच्या सर्व विधी)

विवाहाचा कार्यक्रम पाच पाच दिवस चालतो. प्रत्यक्ष विवाहाच्या दोन दिवस आधी विवाहाच्या कार्यास सुरुवात होते आणि विवाहानंतर दोन दिवसांनी विहाचा एकंदरीत कार्यक्रम संपतो त्यामध्ये परंपरेनुसार विविध विधी व प्रथा पार पडल्या जातात. विवाह मुलाकडे असते, त्यामुळे मुलाच्या दारात आंब्याच्या डहाळीचा मांडव टाकला जातो, याला **"पंद्री"** म्हणतात. विवाहाचा खर्च सर्व नवरदेवाकडे असतो.

पहिल्या दिवशी, म्हणजेच प्रत्यक्ष विवाहाच्या तीन दिवस अगोदर नवऱ्याकडील मंडळी वधूला आणण्यासाठी तिच्या घरी जातात. त्यावेळी ते नवरीच्या आईला, आजीला साड्या भेट म्हणून देतात, तसेच नवरीला वरातीसाठी **"मिरवणुकीची साडी"** भेट म्हणून देतात. या साडीला "पतनाम" म्हणतात. यावेळी धान्य देखील दिले जाते. त्या दिवशी नवऱ्याकडील लोक नवरीच्या घरीच राहतात.

दुसऱ्या दिवशी निघण्यापूर्वी नवरी मुलगी तिच्या घराचा उंबरा धुवून पूजा करते. घरातील मोठ्या व्यक्तींच्या पाया पडते. त्यानंतर मुलाकडील मंडळी मुलीला घेऊन नवऱ्याच्या घरी जाण्यासाठी निघतात. विवाहाच्या गावी किंवा ठिकाणाजवळ आल्यानंतर नवऱ्याच्या घरी आणण्यापूर्वी नवऱ्या मुलीला गावातील मारुतीच्या देवळाबाहेर बसविली जाते. तिथे त्यांची सोय केली जाते. मुलीसोबत आलेली करवली आणि मुलाकडील करवली एक कळस (कळशी) घेऊन येतात. मंदिराजवळ गाणी म्हंटली जातात, ओवाळनीच्या ताटाची आणि कळसाची अदला-बदल केली जाते. नवऱ्या मुलीला हलगी वाजवत मुलाच्या घरी आणले जाते. त्यानंतर आलेली सर्व पाहुणे मंडळी जेवण करतात.

यानंतर **"साका" विधी** होतो. हळदी कुंकवाचा चौकोन करून त्यामध्ये लग्नाचे कपडे, ताडीचा तांब्या( माठ), एकरुपयाची नाणी, दोन नारळ लिंबाचा पाला ठेवले जाते. चौकोनाच्या भोवती नाऊ कणकेचे दिवे लावतात. याच चौकोनात नैवेद्य म्हणून पोळ्या, भात, भाजी, घुगऱ्या ठेवतात. "साका" तयार करण्यासाठी परडी घेऊन फिरणारे मातंग समाजाच्या लोकांना बोलाविले जाते. नवऱ्या मुलाला त्य साका भोवती फेऱ्या मारायला लावल्या जातात, त्यामागे नवरी मुलगी आणि कुटुंबातील इतर सदस्य साका भोवती फेऱ्या मारतात. फेऱ्या मारताना सर्वांना तोंडामध्ये धरण्यासाठी पाला दिला जातो, अशा वेळी बोलायला मनाई केली जाते.

तिसऱ्या दिवशी शेणाने सारवलेल्या अंगणात तांदूळ सडल्यावर निघणाऱ्या भुसाने चौकोनाकृती आखली जातो. पूर्वी भुसा वापरायला जायचा आता तांदूळ वापरले जातात. चौकोनाभोवती पाच पाण्याने भरलेली छोटी मडकी ठेवली जातात. चार कोपऱ्यामध्ये चार व समोरील बाजूस मध्ये एक याप्रमाणे ठेवले जातात. दोरा माठा भोवती गुंडाळून चौकोनाभोवती पाच फेऱ्या मारायच्या असतात. सर्वात प्रथम नवरा व करवली साका भोवती पाच फेऱ्या मारतात. फिरताना नवरा हातामध्ये तांदूळ घेऊन प्रत्येक मडक्यात टाकतो. मागे असणारी करवली त्या मडक्याला ओवाळते. नंतर करवली आणि नवरदेवाला "दासाऱ्या" (भटजी) भस्म व हळद कुंकू लावतात. **"सुकसम"** (फुलाच्या मुंडोळ्या) करवलीला बांधतात. मुलाला बाशिंग बांधले जाते. घरातील पाच मोठ्या व्यक्ती नवरा व करवली यांच्या अंगावर अक्षदा टाकतात, दोघांना या चौकोनातच अंघोळ घालून नवीन वस्त्रे परिधान करण्यासाठी देतात. याला **" तोडगुकुनर"** असे म्हणतात. त्यांनतर दोघांनाही देवाच्या पाया पडायला नेले जाते. आणि अशाच पद्धतीने नवरी व करवली यांना या चौकोनात आणले जाते. त्यांना आंघोळ घालून नवीन कपडे परिधान करण्यासाठी दिले जातात.

विवाह विधीसाठी नवरा आणि नवरीला "पंद्रीमध्ये" म्हणजेच मांडवामध्ये आणले जाते. मांडवात दोन टोपलीमध्ये ज्वारी आणि तांदूळ हळदीत कालवून ठेवली जाते आणि त्यातल्या एका टोपलीत नवऱ्या मुलाला आणि दुसऱ्यामध्ये नवऱ्या नवऱ्या मुलीला उभं केले जाते. त्यानंतर दोघांमध्ये अंतरपाट धरला जातो. अंतरपाट काढतेवेळी अक्षदा टाकल्या जातात. यावेळी " व्यंकट रमण्णा गोविंदा.......... गोविंदा" असे लग्न लावणारा दासऱ्या म्हणतो. त्यानंतर नवरा मुलगा नवरीच्या पायावर पाय ठेऊन उभा राहतो आणि नवरीला मंगलसूत्र बांधतो. आणि विवाह संपतो. आलेले सर्व पाहुणे नवरा व नवरीला आहेर देतात, जेवण करतात आणि दिवस कार्यक्रम आटोपला जातो.



MĀDIGA BRIDAL PAIR.

चौथ्या दिवशी नवरा व नवरीची मिरवणूक काढली जाते. मिरवणूक काढण्यापूर्वी नवऱ्यामुलाने मुलीकडच्या मंडळीना बकरे आणि तांदूळ देण्याची रीत आहे. मुलीकडच्यांनी बकऱ्याचे मटण आणि तांदूळ यांचे स्वयंपाक तयार करायचे. मिरवणुकीला तयारी करण्याच्या अगोदर नवरीकडचे लोक नवरीला लपवून ठेवण्याची गमतीशीर प्रथा आहे. यामध्ये नवरीसारखा शरीराने असणाऱ्या मुलाला

नवऱ्या मुलीसारखे नटवले जाते आणि नवऱ्या मुलीला आणि सजवलेल्या मुलाला शेजारच्याच्या घरामध्ये लपवून ठेवले जाते. नवऱ्या मुलाला तयार झाल्यानंतर त्याला मुलगी शोधायला लावतात.

मुलगी सापडली तरी चेहरा पाहायला मनाई असते, सापडलेल्या नवरी मुलीला मुलाने उचलून न्यायाची असते. मिरवणुकीच्या जागी आल्यानंतर चेहरा पाहायचा, जर मुलीच्या जागी नटवलेला मुलगा असेल तर मुलगी मिळण्यासाठी मुलीकडच्यांना दक्षिणा द्यावी लागते अन्यथा पुन्हा जावून नवरी मुलगी शोधावी लागते. मिरवणुकीच्या वेळी नवरा-नवरी दोघांना घोड्यावर बसवायचे, घोडेवाल्यांना शिधा म्हणून दाल, गुळ, तांदूळ, पान सुपारी खोबरे व दक्षिणा दिली जाते. हलगी वाजवून मिरवणूक गावातल्या मारुतीच्या देवळापर्यंत नेली जाते. मारुतीच्या देवळामध्ये घोंगडी टाकून त्यावर तांदुळाचा चौकोन काढला जातो. त्यामध्ये नवरा व नवरी यांना त्यावर बसवून दोघांच्या डोक्यावर अक्षता टाकल्या जातात.

दोघांना समोरासमोर यावेळी बसवून **"पान सुपारीचा"** कार्यक्रम होतो. यामध्ये नवऱ्याच्या तोंडामध्ये पान देतात, त्यानंतर त्यांनी चावलेले पान नवरीला भरवले जातो. त्यानंतर ते पान नवऱ्या मुलाने आपल्या तोंडाने नवरीच्या तोंडातून काढून घ्यायचे असते. तसेच नवरीच्या बाबतीत केले जाते. यावेळी नवरीने नवर्याच्या तोंडातील पान आपल्या तोंडाने काढून घ्यायचे असते. तोंडातून पान काढताना जमलेली मंडळी नवरा - नवरीला तोंडातून पान काढता येऊ नये म्हणून मागे ओढतात व चेष्टा –मस्करी करतात. यानंतर मुलगा मुलीला उचलून घेतो आणि मांडवाबाहेर घेऊन येतो. कार्यक्रम झाल्यानंतर घोड्यावर बसवून दोघांना  घरी आणले जाते.

संपूर्ण कार्यक्रम झाल्यानंतर सायंकाळी मुलाच्या शेजारीपाजारील प्रत्येक मोहल्ल्यातील (आळीतील) किमान एका व्यक्तीला जेवणाचे आमंत्रण दिले जाते. यामध्ये निरनिराळ्या कुळातील प्रत्येक एक अशा रीतीने  किमान नऊ कुळातील लोक तरी बोलाविले जाते यांना मुलीच्या कुटुंबाकडून जेवण दिले जाते. या खास आमंत्रितांच्या जेवणानंतर इतर सर्व जन जेवतात, जेवणामध्ये बकऱ्याचे मटन, भात आणि ताडी दिली जाते. मुलीकडून एक माठ व मुलाकडून दोन माठ अशा पद्धतीने ताडी एकत्र केली जाते व ती  सर्वांना वाटली जाते.

रात्री "नागोल" कार्यक्रम होतो. रात्रीच्या वेळी नवरा व नवरीला आंघोळ घातली जाते. आवरून पुन्हा खेळ खेळले जातात. यामध्ये नवरा व नवरीला पाटील करायचे आणि पाहुन्यातील एखादा नातेवाईक

त्यांचा नोकर म्हणून काम करत. पाटील-पाटलीन नोकरांना कि, शेतातील ही कामे करा किंवा घरातील अमुक काम करा, असे आदेश देतात. सर्व जन त्यांचा संस्कार असाच सुखाचा आणि समृद्धीचा होण्यासाठी आशीर्वाद देतात.

पाचवा दिवशी संध्याकाळी अनोखा कार्यक्रम केला जातो. यामध्ये मुलीकडील लोक मुलाच्या घरातील व आजूबाजूच्या घरातील सर्व जुन्या, तुटक्या - फुटक्या वस्तू जमा करतात आणि देवळात घेऊन जातात. नवरा व नवरीला देखील देवळामध्ये आणले जाते. सर्वांना प्रेक्षक म्हणून बसवतात आणि नवरा-नवरीला सर्वांसमोर उभं करून जमा करून आणलेल्या सर्व जुन्या पुराण्या वस्तू नवऱ्या मुलाला आहेर म्हणून दिला जातात. हा सर्व प्रकार गमतीदार असला तरी, मुलीच्या संसारात जे जे हवे आहे आणि मुलाच्या घरी जे जे नाही ते सर्व आपल्या ऐपतीप्रमाणे आम्ही तुम्हाला भेट म्हणून देत आहोत, त्याचा स्वीकार करा, तुमचा संसार सुखाचा होवो अशी भावना मुलीकडील लोकांच्या मनात असते.

यानंतर नवऱ्याकडील लोक नवरीला घेऊन नवरीच्या घरी जातात. तिथे रात्री एकत्र आंघोळ घातली जाते. हा कार्यक्रम **"साबासाशा"** म्हणून ओळखला जातो. यामध्ये नवऱ्या मुलाला साडी व नवरीला नवऱ्या मुलाचे कपडे घालायला देतात. कपड्यांची अदलाबदल करतात. विवाह केल्याप्रमाणेच सर्व कार्यक्रम केला जातो. सहावी दिवशी सकाळी नवरा आपल्या नवरीला घेऊन आपल्या घरी परततो.

**मृत्यू विधी** (मरणापासून तेरावा/वर्ष श्राद्ध पर्यंत)

मादिगा समाजामध्ये एखाद्या व्यक्तीची मयत झाल्यास त्याचा मृतदेह पुरण्याची प्रथा रूढ आहे. कालांतराने यामध्ये बदल झाला असला तरी आजही अनेक ठिकाणी मृतदेह पुरला जातो. केवळ मयत व्यक्तीचा मृत्यू एखाद्या अपघाताने, फाशी घेतल्यामुळे, आगीत जाळल्यामुळे किंवा पाण्यात बुडून अकाली मृत्यू आल्यास मृतदेह जाळला जातो.

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास प्रथमतः सर्वांना दुखाचा निरोप दिला जातो. गावातील – बाहेरगावातून येणारे नातेवाईक येताना मिळून मिसळून हलगी वाजवीत येतात.

मृतदेहास आंघोळ घातली जाते. मृतास नवीन वस्त्र घातली जातात. स्त्री वारली असेल तर तिला माहेरची साडी नेसविली जाते. नंतर अंगणामध्ये घराबाहेर दाराशेजारी, कट्ट्यावर मयतास बसविले जाते. दूरवरून येणाऱ्या नातेवाईकांची वाट पाहत असल्याची भावना यामागे असते. दरम्यान

झाडाच्या फांद्यांची तिरडी बांधली जाते. त्यावर ज्वारीची पेंड (कडबा) टाकून एक पांढरा कपडा अंथरला जातो. तिरडीला **"पाड्या कट्या"** म्हणतात. अंतयात्रा हलगी वाजवत निघते. मयत झोपवून किंवा बसवून नेली जाते.

मयत नेताना, एका मडकं घेवून त्याच्या झाकणावर भात ठेवून सोबत नेला जातो. गावाच्या बाहेर, विसाव्याच्या ठिकाणी पोहचल्यानंतर मयत विसाव्याच्या ठिकाणी ठेवतात. त्यानंतर मडके घेऊन मुलगा किंवा भाऊबंध किंवा घरातील मोठी व्यक्ती मयताच्या भोवती तीन चकरा मारतात आणि मयताच्या डोक्याजवळ मडकं फोडल जातो. मयत करून आल्यानंतर संध्याकाळी घरातील सर्वांना बसवून त्यांच्या हातावर गुळ व साधे पाणी टाकून सर्वांचे दुख दूर केले जाते. सर्व व्यक्ती अंघोळ करतात. यानंतर सर्वांना ताडी दिली जाते. तिसऱ्या दिवशी सावडण्याचा कार्यक्रम होतो. मृत व्यक्तीला आवडणारे पदार्थ बनवून सावडण्यासाठी जातात. यावेळी पिंड तयार करून ठेवले जाते. कावळा पिंडाला शिवाल्यानंतर लोक घरी निघून येतात. घरातील सर्व वस्तू धुवून स्वच्छ केल्या जातात, घराला रंग दिला जातो. पंचागानुसार दहावा, बारावा, करण्याचे ठरविले जाते.

## प्रकरण पाचवे

# सांख्यिकीय विश्लेषण

## (सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थिती)

# सांख्यिकीय विश्लेषण
## (सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्यस्थिती) अभ्यास पद्धती

---

प्रतुत अभ्यासाकरिता सर्वेक्षण पद्धतीच्या वापर करण्यात आला असून मादिगा समुदायाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती अभ्यासण्यात आला आहे. अभ्यासामध्ये वापरण्यात आलेल्या मानववंशशास्त्रीय पद्धतीच्या माध्यमातून आपणास समुदायाचे जीवन विश्व समजून घेण्यास मदत होते. प्रख्यात मानववंशशास्त्रीय एन्थोवेन यांनी या अभ्यासाकरिता निच्छित केलेल्या निर्देशकांचा तसेच प्लेटो अँड प्लेटो १९७८ यांच्या पद्धतीचा अभ्यास करून सामिश्रीत अशी निर्देशक तयार करून मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातू माहिती संकलित करण्यात आली आहे.

प्रस्तुत अभ्यासाकरिता संख्यात्मक आणि गुणात्मक माहितीचा वापर करण्यात आला असून त्याच्या आधारावर प्राथमिक आणि दुय्यम साधने संकलित केली आहे. माहिती संकलन करताना प्राथमिक स्त्रोत म्हणून मादिगा जातीचे लोक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, संघटना, संस्था, लक्षगट चर्चा, अभ्यासक इत्यादींशी संपर्क साधून माहिती संकलित केली आहे, तर माहितीच्या दुय्यम स्त्रोत म्हणून जनगणना अहवाल, विविध शासकीय दादस्तऐवज, कागदपत्रे, संशोधन लेख आणि विविध अहवालामधून माहिती संकलित केली आहे.

# सांख्यिकीय विश्लेषण


---

## १. उत्तरदात्यांची लोकसंख्या दर्शविणारी सारणी

सारणी क्र. १

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकूण लोकसंख्या -महिला | १४२२ | ४९.६७ |
| २ | एकूण लोकसंख्या - पुरुष | १४४१ | ५०.३३ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |

आलेख क्र. १




सदर संशोधन अभ्यासामध्ये एकूण ५५६ कुटुंबांची माहिती घेतली असून ५५६ कुटुंबांमध्ये एकूण २८६३ इतकी लोकसंख्या असून त्यापैकी १४२२ ( ४९.६७%) महिला आहेत तर पुरुषांची १४४१ (५०.३३%) आहे. यावरून असे लक्षात येते कि, मादिगा समाजामध्ये लिंग गुणोत्तर १ :१ याप्रमाणे आहे.

**२. उत्तरदात्यांचे वय व त्यांची आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. २

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ० ते ६ | ४६५ | १६.२४ |
| २ | ११ ते २० | ५४० | १८.८६ |
| ३ | २१ ते ३० | ६९६ | २४.३१ |
| ४ | ३१ ते ४० | ४६२ | १६.१४ |
| ५ | ४१ ते ५० | ३३५ | ११.७० |
| ६ | ५१ ते ६० | २१५ | ७.५१ |
| ७ | ६१ ते ७० | ११३ | ३.९५ |
| ८ | ७१ पेक्षा जास्त | ३७ | १.२९ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |

वरील सारणी उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण लोकसंख्येचे वय दर्शविणारी असून एकूण २८६३ लोकांपैकी सर्वाधिक २१ ते ३० या वयोगटातील असून त्यांची संख्या ६९६ (२४.३१%) इतकी आहे. ११ ते २० वर्ष वयोगटामध्ये ५४० (१८.८६%) लोकसंख्या आहे. १० वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्याची संख्या ४६५ (१६.२४%) आहे तर ३१ ते ४० वर्ष वय असणाऱ्याचे प्रमाण ४६२ (१६.१४%) इतके आहे. ४१ ते ५० वर्ष वय असणाऱ्याचे प्रमाण ३३५ (११.७०%) इतके आहे. ६१ ते ७० वर्ष वय असणाऱ्याचे प्रमाण ११३ (३.९५) ७१ वर्षा पेक्षा जास्त वय असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजेच ३७ (१.२९%) इतके आहे.


यावरून असे दिसून येते कि, एकूण लोकसंख्येपैकी युवकांची संख्या जवळपास पंचवीस टक्के असून वृद्ध किंवा जेष्ठ लोकांची संख्या तुलनेने फार कमी आहे.

## ३. मादिगा समाजाचे महाराष्ट्रातील वास्तव्याचा कालावधी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १० वर्षापेक्षा कमी | ४ | ०.७२ |
| २ | ११ ते २० वर्ष | १२ | २.१६ |
| ३ | २१ ते ३० वर्ष | ३२ | ५.७६ |
| ४ | ३१ ते ४० वर्ष | २९ | ५.२२ |
| ५ | ४१ ते ५० वर्ष | ५७ | १०.२५ |
| ६ | ५१ ते ६० वर्ष | ७९ | १४.२१ |
| ७ | ६१ ते ७० वर्ष | ९७ | १७.४५ |
| ८ | ७१ वर्षापेक्षा जास्त | २४६ | ४४.२४ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. २



वरील सारणी, उत्तरदात्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्याचा कालावधी दर्शविणारी असून एकूण ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी सर्वाधिक म्हणजे २४६ (४४.२४%) उत्तरदात्यांचे महाराष्ट्रामधील वास्तव्य हे ७१ वर्षापेक्षा अधिक आहे. त्याखालोखाल ६१ ते ७० वर्ष इतक्या कालावधीचे वास्तव्य ९७ (१७.४५%) इतक्या उत्तरदात्या कुटुंबांचे आहे. ७९ (१४.२०%) कुटुंबांचे वास्तव्य ५१ ते ६० वर्षांच्या दरम्यान असून ५७ (१०.२५%) कुटुंबांचे वास्तव ४१ ते ५० वर्षांच्या दरम्यान आहे. ३१ ते ४० वर्ष वास्तव्य असणाऱ्या कुटुंबाची संख्या २९ (५.२२%) आह त्याचबरोबर ११ ते २० वर्ष वास्तव्य असणाऱ्या कुटुंबाची संख्या १२ (२.१६%) आहे. केवळ ४ (०.७२%) कुटुंबे १० वर्षापेक्षा कमी वास्तव्य असणारी आहेत.

या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि, एकूण मादिगा समाजातील उत्तरदात्यांपैकी ६२% कुटुंबाचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य ६० वर्षापेक्षा अधिक काळ असून १९५० सालापूर्वीपासून ते महाराष्ट्रामध्ये राहतात.

**४. मादिगा समाजाचे इतर राज्यांमधून महाराष्ट्र राज्यात स्थलांतर झाले असल्याची आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ४

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ५३२ | ९५.६८ |
| २ | नाही | २४ | ४.३२ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |


वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी एकूण ५३२ म्हणजेच (९५.६८%) इतकी कुटुंबे हि महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झाली आहे. आणि २४ (४.३२%) उत्तरदात्यांनी त्यांचे स्थलांतर  झाले नसल्याचे सांगितले.

## ५. इतर राज्यांमधून महाराष्ट्रात झालेले स्थलांतर व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | १२५ | २२.४८ |
| २ | तेलंगणा | १९२ | ३४.५३ |
| ३ | कर्नाटक | २१५ | ३८.६७ |
| ५ | लागू नाही | २४ | ४.३२ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. ३




वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, एकूण ५५६ कुटुंबांपैकी तेलंगणा राज्यातून १९२ (३४.५३%) आणि आंध्रप्रदेश राज्यातून १२५ (२२.४८%) कुटुंबाचे महाराष्ट्र राज्यामध्ये स्थलांतर झाले आहे. कर्नाटक राज्यातून महाराष्ट्र राज्यामध्ये स्थलांतर झालेल्या कुटुंबाची संख्या २१५ (३८.६७%) असून २४(४.३२%) कुटुंबाचे स्थलांतर झाले नसल्याचे समोर आले आहे.


यावरून असे दिसते कि, बहुतांश कुटुंबे इतर राज्यांमधून स्थलांतरित असून कर्नाटक राज्यामधून झालेले स्थलांतराचे प्रमाण सर्वाधिक आहे.

## ६. मादिगा समाजाच्या स्थलांतराची कारणे दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ६

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण | ६ | १.०८ |
| २ | व्यवसाय / नोकरी | ५०० | ८९.९३ |
| ३ | नातेवाईक | ४८ | ८.६३ |
| ४ | नैसर्गिक आपत्ती | २९ | ५.२२ |
| ५ | कौटूंबिक समस्या | ३७ | ६.६५ |
| ६ | वैयक्तिक कारणे | ३ | ०.५४ |
| ७ | लागू नाही. | २४ | ४.३२ |

आलेख क्र. ४




वरील सारणी उत्तरदात्यांची स्थलांतराची कारणे दर्शविणारी आहे. स्थलांतराची कारणे दर्शवित असताना त्यांची, शैक्षणिक, व्यवसाय किंवा उदरनिर्वाह, कौटुंबिक समस्या, नैसर्गिक आपत्ती या वेगवेगळ्या निर्देशकांचा वापर करण्यात आला आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने, गरिबीमुळे उदरनिर्वाहासाठी व्यवसायासाठी किंवा नोकरीसाठी झालेले स्थलांतर सर्वाधिक म्हणजेच

५०० (८९.९३%) आहे. त्याखालोखाल नातेवाईक किंवा नातेसंबंधीय स्थलांतरित झाल्याने त्यांच्यासोबत स्थलांतरीत झालेल्यांची संख्या ४८ (८.६३%), कौटुंबिक समस्यांमुळे स्थलांतर केलेल्याचे प्रमाण ३७ (६.६५%), नैसर्गिक आपत्ती मुळे स्थलांतर केलेल्याचे प्रमाण २९ (५.२२ %) आहे. शिक्षणासाठी स्थलांतर झाल्याचे प्रमाण सर्वाधिक कमी म्हणजेच ६ (१.०८ %) इतके आहे.

## सारांश

मादिगा समजाचे साधारण ७० वर्षापूर्वी स्थलांतर झाल्याचे प्रमाण आणि मुळचे महाराष्ट्रातील मादिगा समजाचे प्रमाण यांची आकडेवारी लक्षात घेतली तर १९५० या वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांचे महारा:स्त्रातील वास्तव्य लक्षात येते. तसेच वरील एकंदरीत आकडेवारीवरून असे लक्षात येते कि, मादिगा समाजाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे व त्यांच्या मुळ राज्यांमध्ये उदरनिर्वाहाची साधने कमी असल्यामुळे व्यवसाय-नोकरी या कारणासाठी स्थलांतर केलेल्याचे प्रमाण अधिक दिसून येते तर शिक्षणाकरिता स्थलांतर केलेल्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. शिक्षणासाठी स्थलांतर केलेल्याची आकडेवारी पाहता शिक्षणास महत्व नसल्याचे दिसून येत आहे.

आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा राज्यांमधील रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि कर्नाटक सीमेवर असणाऱ्या सोलापूर शहारमध्ये मादिगा लोकांचे स्थलांतर जास्त प्रमाणात झालेले दिसून येते. महाराष्ट्र राज्यामधील शहरांमध्ये त्यांना रोजगार मिळत असल्याने थोड्याफार प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळते.

महाराष्ट्रातील शहरांमध्ये त्यांना निरपेक्ष वागणूक मिळण्याचे प्रमाण जास्त आहे. व्यवसाय आणि नोकरीसाठी अशा उदरनिर्वाहाच्या साधनांची उपलब्धता असल्याकारणाने स्थलांतराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. अभ्यासादरम्यान करण्यात आलेल्या निरीक्षणावरूनही असे दिसून येते कि, सदरचे स्थलांतर हंगामी स्वरूपाचे नसून कायम स्वरूपाचे आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागाकडून शहराकडे केवळ स्थलांतर झालेले नाही तर ग्रामीण ते ग्रामीण असे स्थलांतर दिसून येत आहे.

## ७. मादिगा समाजातील एकूण लोकसंख्येची वैवाहिक स्थिती दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | १३५६ | ४७.३६ |
| २ | अविवाहित (१८ वर्षापुढील महिला व २१ वर्षापुढील पुरुष ) | ५८२ | २०.३३ |
| ३ | घटस्पोटीत | ११ | ०.३८ |
| ४ | विधवा | १६५ | ५.७६ |
| ५ | विधुर | ३० | १.०५ |
| ६ | परितक्त्या | ८ | ०.२८ |
| ७ | लागू नाही (१८ वर्षाच्या आतील ) | ७११ | २४.८३ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |


वरील सारणी लोकसंख्येची वैवाहिक स्थिती दर्शविणारी आहे. २८६३ लोकसंख्येपैकी ७११ (२४.८३%) उत्तरदाते हे १८ वर्षाखालील आहे. उर्वरित विवाहित लोकसंख्येची संख्या सर्वात अधिक १३५६ (४७.३६%) आहे. तर ज्या महिलांचे वय १८ वर्षापेक्षा जास्त व पुरुषांचे वय २१ वर्षापेक्षा जास्त आहे परंतु विवाह झालेला नाही अशा लोकसंख्येची संख्या ५८२ (२०.३३%) इतकी आहे. घटस्फोटीत, विधवा व परित्यक्त्या यांचे प्रमाण अनुक्रमे ११ (०.३८%), १६५ (५.७६%), ८ (०.२८%) असे आहे. विधुरांच्या तुलनेत विधवांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.

### ८. मादिगा समाजातील लग्नाचे वय दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ८

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५ वर्षापेक्षा कमी वयात | २२९ | १४.५९ |
| २ | १६ ते १८ | ४२३ | २६.९४ |
| ३ | १९ ते २१ | ३५६ | २२.६८ |
| ४ | २१ किंवा जास्त | ५६२ | ३५.८० |
| | एकूण | १५७० | १०० |

आलेख क्र. ५




मादिगा समाजातील एकूण २८६३ लोकसंख्येपैकी विवाहितांची लोकसंख्या १५७० इतकी आहे. त्यापैकी कायदेशीररित्या उचित वयामध्ये म्हणजेच वयाच्या २१ वर्षानंतर पार पडलेली विवाहाचे प्रमाण सर्वाधिक आहे, त्याखालोखाल १९ ते २१ लग्न झालेल्या लोकसंख्येची संख्या ३५६ (२२.६८%) इतकी समाधानकारक दिसते. परंतु मादिगा समाजामध्ये बाल विवाह म्हणजेच वयाच्या १५ वर्षापेक्षा कमी वयात लग्न झालेल्या लोकसंख्येची संख्या २२९ (१४.५९%) इतकी असून १६ ते १८ वयोगटामध्ये ४२३ (२६.९४%) विवाह झालेली आहेत.

निरीक्षणानुसार ५० ते ६० दशकापूर्वी ज्यांची लग्न झालेली आहेत अशा लोकसंख्येचे वय १५ पेक्षा लहान असताना लग्न झालेले आहे, परंतु सद्यस्थितीमध्ये मुलीला १८ वर्ष पूर्ण व मुलाला २१ वर्ष पूर्ण झाल्यानंतरच लग्न केलेल्याचे दिसू येत आहे.

## ९. रहिवास व नागरिकत्वासंबंधी आवश्यक पुरावे उपलब्ध असलेबाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आधार कार्ड | २६१७ | ९१.४१ |
| २ | मतदान कार्ड | १६३० | ८७.७३ |
| ३ | पॅनकार्ड | १०५० | ३६.६७ |


शासकीय योजनांचा लाभ मिळविणेकरिताकिंवा कोणत्याही शासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता आपली ओळख दाखविण्यासाठी आधार कार्ड, मतदान कार्ड व पॅनकार्ड हि कागदपत्रे आधारभूत मानली जातात. केंद्र शासनाच्या आधार योजनेंतर्गत त्यानुसार २८६३ पैकी २६१७ (९१.४१%) व्यक्तींकडे आधारकार्ड आहे. आर्थिक उत्पन्न किंवा बँकेतील व्यवहारासाठी आवश्यक पॅनकार्ड केवळ १०५० (३६.६७%) व्यक्तींकडे आहे. तसेच वयाची १८ पूर्ण केलेल्या १८५८ इतक्या लोकांपैकी म्हणजेच १६३० (८७.७३%) व्यक्तींकडे मतदान कार्ड आहे.

**१०. शिधापत्रिका उपलब्ध असणे बाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. १०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिवळे | ६६ | ११.८७ |
| २ | केशरी | ३७८ | ६७.९९ |
| ३ | पांढरे | ८९ | १६.०१ |
| ४ | शिधापत्रिका ( रेशन कार्ड) नाही | २३ | ४.१४ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. ६




शिधापत्रिका असलेल्या उत्तरदात्या कुटुंबांपैकी ६६ (११.८७%) उत्तरदात्यांकडे दारिद्र रेषेखालील घटकांसाठी दिली जाणारी, पिवळ्या रंगाची शिधापत्रिका आहे. केशरी शिधापत्रिका असणाऱ्या लोकसंख्या ३७८ (६७.९९%) आहे. पांढरी शिधापत्रिका असणाऱ्या लोकसंख्या ८९ (१६.०१%) आहे. शिधापत्रिका नसलेल्यांची कुटुंबाची संख्या २३ (४.१४%) आहे.

शिधापत्रिकांचे पिवळे, नारंगी व पांढरी अशा तीन प्रकारामध्ये विभाजन करण्यात आले आहे. पिवळी शिधापत्रिकाधारक दारिद्र रेषेखालील घटकांसाठी आणि केशरी शिधापत्रिकाधारक कमी उत्पन्नगटामध्ये मोडणाऱ्या घटकांसाठी देण्यात येते. आर्थिकदृष्ट्या सधन असणाऱ्या कुटुंबास पांढरी शिधापत्रिका देण्यात येते. वरील आकडेवारीवरून असे दिसून येते कि, मादिगा समाजामध्ये असणारी आर्थिक दृष्ट्या सधन कुटुंबाची संख्या कमी असल्याने पांढरी शिधापत्रिका असण्याचे प्रमाण देखील अल्प आहे.

अनेकदा स्थानिक नगरसेवक तसेच शासनाकडून याबाबत वारंवार पाठपुरावा केला जात असल्यामुळे तसेच आधार कार्ड व मतदान कार्ड महत्वपूर्ण आधारभूत पुरावा असल्यामुळे अधिकतर लोकांकडे हि कागदपत्रे असल्याचे दिसून आले आहे.

**मादिगा समाजाची शैक्षणिक स्थिती** :

स्वातंत्र्यानंतर राज्य घटनेतील राज्य धोरणाच्या नीती निर्देशक तत्वाच्या ४५ कलमान्वये प्राथमिक शिक्षण १४ वर्षाखालील मुलांना मोफत व सक्तीचे केलेले आहे. तसेच १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने जीविताच्या अधिकाराखाली शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे असा निर्णय दिला आहे. ८६ व्या घटना दुरुस्तीमधील अनुच्छेद ४५ अंतर्गत हे मान्य केले आहे. सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये शिक्षणाच्या भूमिकेविषयी तज्ञ अभ्यासकांचा असा विश्वास आहे कि, समाजातील लोकांमध्ये अशी क्षमता असणे आवश्यक आहे, जी सभोवताली वैज्ञानिक आणि वास्तववादी, आधुनिक ज्ञान आणि कौशल्य वेगाने बदलत आहे, या क्षमतांचा वापर करून, त्या वेगास अनुसरून कार्य पूर्ण करेल, हि क्षमता विकसित करण्याचे काम शिक्षणामुळेच सहज शक्य होते. शिक्षणामुळे देशहिताचे आणि विकासाकरिता पूरक अशा विचारांचे, मूल्यांचे संवर्धन होण्यास मदत होते. शिक्षणाच्या मदतीने बालक आणि युवकांमधील कार्यात्मक आणि विश्लेषणात्मक क्षमता सुधारण्याची दिशा मिळते. व्यक्तिगत आणि सामुहिक स्वरूपामध्ये कौशल्य संपादन करण्याच्या संधी वाढत जातात, जेणेकरून जीवन जगण्याच्या पद्धतीचा दर्जा देखील विकसित होतो.


**११. मादिगा समाजाचे शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ११

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अशिक्षित /निरक्षर | ६३६ | २२.२१ |
| २ | सहा वर्षाखालील /लहान गट, मोठा गट, अंगणवाडी किंवा बालवाडी | २२६ | ७.८९ |
| ३ | पहिली ते चौथी | ४१६ | १४.५३ |
| ४ | पाचवी ते सातवी | ४८७ | १७.०१ |
| ५ | आठवी ते दहावी | ६४४ | २२.४९ |
| ६ | अकरावी ते बारावी | ३०८ | १०.७६ |
| ७ | पदवी | १२९ | ४.५१ |
| ८ | पदव्युत्तर पदवी | ११ | ०.३८ |
| ९ | आय.टी.आय/ डिप्लोमा/ सर्टिफिकेट | ५ | ०.१७ |
| १० | एम.फिल / पी.एच.डी | १ | ०.०३ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |

मादिगा समाजातील एकूण २८६३ लोकसंख्येपैकी अशिक्षित किंवा निरक्षर लोकांची संख्या ६३६ (२२.२१%) आहे. आठवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्याची लोकसंख्या ६४४ (२२.४९%) इतकी आहे. पाचवी ते सातवी पर्यंत शिक्षण घेतलेल्यांची संख्या ४८७ (१७.०१%) आहे. पहिली ते चौथी पर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या ४१६ (१४.५३%) इतकी आहे. सहा वर्षाखालील /लहान गट, मोठा गट, अंगणवाडी किंवा बालवाडी पर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या २२६(७.८९%) इतकी आहे.

आलेख क्र. ७




अकरावी ते बारावी पर्यंत शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांची संख्या ३०८ (१०.७६%) आहे. उच्च माध्यमिक शिक्षण क्षेत्रामध्ये जेथे विद्यार्थ्याला आपल्या आयुष्यातील किंवा भविष्यातील क्षेत्राची निच्छित करण्याची संधी असते तेथे सुद्धा मादिगा समाजातील व्यक्ती शिकण्याचे प्रमाण कमी दिसून यते आहे. पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या १२९ (४.५१%) इतकी आहे तर पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या ११ (०.३८%) इतकी आहे. आय.टी.आय/ डिप्लोमा/ सर्टिफिकेट पर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या ५ (०.१७%) इतकी आहे. एम.फिल / पी.एच.डी पर्यंत शिक्षण घेतलेल्याची संख्या सर्वाधिक कमी १ (०.०३%) इतकी आहे.

या आकडेवारीवरून हे स्पष्ट होत आहे कि, एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ८०% समाज दहावीपर्यंतदेखील शिक्षण घेवू शकला नाही. त्यापुढील शिक्षण म्हणजेच पदवीनंतरचे शिक्षण किंवा उच्च शिक्षणापर्यंत या समाजातील अत्यल्प प्रमाणात पोहचू शकला असून त्याचेही प्रमाण अगदी शुल्लक आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय शास्त्र अशा व्यावसायिक अभ्यासक्रम बाबत तर हा समाज अनभिज्ञ असल्याचे दिसून आले आहे. वास्तविक पाहता किमान पदवीपर्यंतचे शिक्षण सर्वसाधारण विद्यार्थ्यांसाठी आयुष्यातील सत्ता, संपत्ती प्रतिष्ठा प्राप्त करण्याचे तसेच दृष्टीकोन विकसित करण्याचे मार्ग आहे, परंतु या संधीपर्यंत देखील हा समाज पोचण्याचे प्रमाण कमी आहे.

## १२. मादिगा समाजाची शैक्षणिक स्थिती दर्शविणारी सारणी

सारणी क्र. १२

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शाळेत कधी न गेलेले | ६३६ | २२.२१ |
| २ | शाळा गळती झालेले | १२१२ | ४२.३३ |
| ३ | वय वर्षे सहा पेक्षा कमी असलेली मुल-मुली | २२६ | ७.८९ |
| ४ | शिक्षण घेत असलेले | ७८९ | २७.५६ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |

मादिगा समाजाची शैक्षणिक माहिती घेताना शिक्षण घेत असलेले व वय वर्ष सहा पेक्षा कमी वय असलेलेल्याची आकडेवारी सोडता शाळेत कधी न गेलेल्याचे प्रमाण ६३६ (२२.२१%) इतके आहे. शाळा गळती झालेले १२१२ (४२.३३%) इतके आहेत तर शिक्षण घेत असलेल्याचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ७८९ (२७.५६%) इतके आहे.

## १३. शिक्षणाचे माध्यम दर्शविणारी सारणी

सारणी क्र. १३

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १६४६ | ५७.४९ |
| २ | इंग्रजी | १९० | ६.६४ |
| ३ | तेलगु | १०२ | ३.५६ |
| ४ | कन्नडा | ६३ | २.२० |
| ५ | अशिक्षित व बालक ०-६ वय (लागू नाही) | ८६२ | ३०.११ |
| | एकूण लोकसंख्या | २८६३ | १०० |

मादिगा समाजातील एकूण २८६३ लोकसंख्येपैकी मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या किंवा घेत असलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १६४६ (५७.४९%) इतके आहे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्याचे किंवा घेत असलेल्यांचे प्रमाण १९० (६.६४%) इतके आहे. यामध्ये अधिकतर पाचवी इयत्तेच्या आतील मुलांचा समावेश आहे, म्हणजेच बदलत्या काळानुसार काही कुटुंबांमध्ये मुलांच्या शिक्षणाबाबत विचारपूर्वक निर्णय घेतला जात असला तरी हे प्रमाण कमी आहे. तेलगु माध्यमातून शिक्षण घेतलेल्याचे प्रमाण १०२ (३.५६%) इतके आहे. कन्नडा माध्यमातून शिक्षण घेतलेल्याचे प्रमाण सर्वाधिक कमी म्हणजेच ६३ (२.२०%) इतके आहे.


अशिक्षित किंवा निरक्षर व ज्यांचे वय लहान असून ते शिक्षण घेऊ शकत नाही अशा व्यक्तींचा समावेश ८६२ (३०.११%) इतके आहे. मादिगा समाजाचे महाराष्ट्रामध्ये इतर राज्यातून स्थलांतर झाले असल्याने त्यांची मातृभाषा कन्नड, तेलगु अशी आहे. परंतु, मादिगा समाजाचे स्थलांतर १९५० च्या पूर्वीपासून झाले असल्याने अनेक कुटुंबाच्या पिढ्यानपिढ्या महाराष्ट्रामध्ये वास्तव्यास असल्याने मराठी शाळेत शिक्षण घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. निरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले कि जे कन्नड आणि तेलगु माध्यमातून शिकले आहे त्यांचे वयोगट हे वय वर्ष ५० च्या जवळपास किंवा ५० पेक्षा जास्त असून त्यांचे शिक्षण जेमतेम ५ वी ते ७ वी पर्यंत झाले असून स्थलांतरापूर्वी त्यांच्या मुळ राज्यामध्ये घेतलेले शिक्षणाचे हे प्रमाण असू शकते.

**१४. शाळेत दाखल न करण्याची शाळा गळतीची कारणे व प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. १४

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गरिबी | १५१७ | ८१.३० |
| २ | अशिक्षित पालक | ३२ | १.७१ |
| ३ | लग्न झाल्याने | ८३ | ४.४५ |
| ४ | शिक्षणात रस नव्हता | १९२ | १०.२९ |
| ५ | इतर | ४२ | २.२५ |

आलेख क्र. ८




वरील सारणी शाळेमध्ये न जाण्याची किंवा शाळा गळतीची कारणे दर्शविणारी आहे. गरिबी किंवा आर्थिक परिस्थितीमुळे शाळा गळती झालेले किंवा शाळेत कधी न गेलेल्याची संख्या सर्वाधिक म्हणजेच १५१७ (८१.३०%) आहे. तर शिक्षणाच्या संदर्भात पालकांचे मार्गदर्शन न मिळाल्याचे किंवा अशिक्षित पालकांमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याचे मत ३२ (१.७१%) लोकांनी

व्यक्त केले आहे. लग्न झाल्यामुळे ८३ लोकांनी शिक्षण सोडले. असे कारण व्यक्त करणाऱ्या सर्व महिला असून शिक्षणाची आवड नसल्यामुळे १९२ (१०.२९%) लोकांनी शिक्षण सोडलेले आहेत.

वरील आकडेवारी पाहता आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे उत्तरदात्यांचे शाळेत न जाण्याचे किंवा शाळा सोडून देण्याचे प्रमाण अधिक आहे.

## सारांश

मादिगा समाजाची एकंदरीत शैक्षणिक स्थिती पाहता, असे स्पष्ट होते कि, शाळेमध्ये प्रवेश घेवूनही अनेक कारणामुळे शिक्षण थांबवावे लागलेल्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. वय वर्षे सहा पेक्षा कमी असलेली मुल-मुली आणि शिक्षण घेत असलेले यांची एकत्रित आकडेवारी १०१५ इतकी दिसून येत असली तरी या विद्यार्थ्यांमधून शाळा गळती होण्याची किंवा पुढे जाऊन शिक्षण थांबवावे लागले, असे उत्तरदाते असण्याची शक्यता असल्यामुळे हि आकडेवारी प्रथमदर्शनी समाधान देणारी दिसत असली तरी फसवी आकडेवारी आहे असे याला आपण म्हणू शकतो. एकूणच एका स्तरावर शाळेमध्ये प्रवेश घेतलेला दिसून येतो तर दुसऱ्या स्तरावर शाळा गळती झाली आहे असे म्हणावे लागेल.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे अनेक मुलांना जेमतेम सहावी सातवी पर्यंत शिक्षण घेतले कि १४ ते १५ वर्षातच बिगारी कामासाठी जुंपले जाते. त्यामुळे अनेक मुलांची शाळा गळती होते, मुलीमुलींच्या बाबतीत आर्थिक परिस्थिती सोबत लग्न, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या, लहान भावंडाना सांभाळण्याच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टींमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागते. अल्प प्रमाणात ज्या व्यक्तींचे शिक्षण पदवी अथवा त्यापुढेही झाले आहे, ते देखील सफाई कर्मचारी, बिगारी तत्सम करतानाच समोर दिसतात, त्यामुळे शिक्षणामुळे परिस्थिती बदलेल आणि म्हणून शिक्षण घेतले पाहिजे असा कोणताही आदर्श या व्यक्तींसमोर नसल्यामुळे देखील शिक्षणाची त्यांच्यामध्ये रुची दिसून येत नाही.

मादिगा सारख्या स्थलांतरित जातीचे वरील आकडेवारीनुसार दिसून येणारे विशेषत्व म्हणजे त्यांचे शैक्षणिक मागासलेपण होय, भारत जे कल्याणकारी राज्य असून राज्य घटनेनुसार सर्वांना सर्वच क्षेत्रात विकास करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. सर्वच अनुसूचित जातींना विशेष शैक्षणिक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत त्यातून अनुसूचित जातीतील काही जातीना लाभ झाला असून त्यांनी सर्वार्थाने त्यांची प्रगती केली आहे. परंतु मादिगा समाजाला हा विकास साध्य करून घेता आला आहे,

असे दिसून येत नाही. उपलब्ध शैक्षणिक सोयीचा उपयोग मादिगांना घेता आला नाही याच्या महत्वपूर्ण कारणांपैकी दारिद्य हे महत्वाचे कारण आहे. त्यांना उपजीविकेची साधने नाहीत, दरडोई उत्पन्नाचे प्रमाण अतिशय कमी आहे, शासकीय योजना व सवलती याबाबत त्यांच्यामध्ये सजगता नाही, विकासासाठी लागणारे सामाजिक व वैचारिक प्रोत्साहन नाही, इतर अनुसूचित जातींच्या तुलनेने शैक्षणिक क्षेत्रात साक्षरता, प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, पदवी, उच्च शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम अशा सर्वच स्तरावर सा समाज मागे पडलेला दिसून येत आहे.

मोफट्टने आपल्या संदर्भामध्ये डूमोच्या जाती उतरंडीच्या सार्वत्रिक विचारसरणीचे समर्थन केले आहे, "समानतेतील शेवटचे" (Last among equals) असे अस्पृश्य जातीविषयी मत नोंदविले आहेत, परंतु निरीक्षणातून देखील मादिगा समाजाचा दिसून आलेला शैक्षणिक मागासलेपणा शैक्षणिक क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने असमानता दर्शवितो.

सच्चर समिती अहवाल २००६, ४९ नुसार "वैज्ञानिक व तंत्र ज्ञानात्मक ज्ञान आपल्या जीवनाचे सर्व आयाम बदलून टाकताना आपण पाहत आहोत. जोपर्यंत आपण सूक्ष्म आर्थिक परिणामांची दाखल घेणार नाही तोपर्यंत मानवी भांडवल व राष्ट्रीय विकास वृद्धीसंबंधी आत्यांतिक प्रतिपादन करणे संयुक्तिक ठरणार नाही म्हणून व्यक्ती व समुदाय या दोन्हीच्या दृष्टीने युवकांची व मुलांची कार्यात्मक व आकालानात्मक क्षमता वृद्धिंगत करणे आवश्यक ठरते. शिक्षणातून कार्यक्षमता वृद्धिंगत करता येते , जीवन जगण्याची गुणवत्ता देखील वृद्धिंगत होते", याप्रमाणे तत्व मांडले आहे परंतु मादिगा समाजाची शैक्षणिक स्थिती पाहिली तर त्यांचा या क्षेत्रातील मागासलेपणा मुळे त्यांचा दृष्टीकोन, ज्ञान, कौशल्य, राहणीमानाचा दर्जा, जीवन जगण्याचा दर्जा अतिशय खालावलेला आहे असे आपण म्हणू शकतो.

महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झालेल्या समाजांमध्ये आर्थिक मागासलेपणा सोबत शिक्षणाचा अभाव देखील जास्त प्रमाणामध्ये दिसून येतो. वास्तविकत: शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे, सर्वांगीण विकासाचे आणि सामाजिक समता व न्याय प्रस्थापित करण्याचे एक महत्वाचे साधन आहे (पटवर्धन, १९७३, चिटणीस, १९७५) असा उल्लेख राष्ट्रीय स्तरावरील दस्तावेजामध्ये करण्यात आला आहे. शिक्षण व समाजाचा विकास याचा संबंध फारच जवळचा व परस्परावलंबून आहे.


**मादिगा समाजाची आर्थिक स्थिती**

**१५.मादिगा समाजाचे अर्थार्जनाची साधने किंवा व्यवसाय आणि उत्पन्न दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. १५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | काम न करणारे (बालक, गृहिणी आणि ६१ वर्षापुढील ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी वगळून ) | १५९६ | ५५.७५ |
| २ | बेरोजगार | १७५ | ६.११ |
| ३ | मजूर, शिपाई, इतरांकडे घरकाम, ड्रायव्हर यासारखे काम | ९४२ | ३२.९० |
| ४ | घरगुती किंवा लहान व्यवसाय (टपरी, लहान दुकान, भाजी-फळे विक्री किंवा यासारखे व्यवसाय | ५६ | १.९६ |
| ५ | ऑफिसर, शासकीय नोकरी, पांढरपेशी नोकरी, खाजगी नोकरी | ५९ | २.०६ |
| ६ | मोठे उद्योग | ३५ | १.२२ |
| | एकूण | २८६३ | १०० |

आलेख क्र. ९




वरील सारणी उत्तरदात्यांची अर्थार्जनाची साधने दर्शविणारी आहे. २८६३ लोकसंख्येपैकी १५९६ लोकसंख्या गृहिणी, १८ वर्षाच्या आतील मुले, विद्यार्थी, व वृद्ध या गटामध्ये असून हा गट अकार्यक्षम किंवा उत्पादनक्षमता असतो. हि संख्या वगळता उर्वरित लोकसंख्येपैकी म्हणजे एकूण १२५४ पैकी १७५ (६.११%) लोकं बेरोजगार आहेत तर ९४२ (३२.९०%) उत्तरदाते मजूर, शिपाई, घरकाम, ड्रायव्हर अशा प्रकारच्या कामामध्ये असून निरीक्षणामध्ये सफाई कर्मचारी व मजूर किंवा बिगारी काम करणारे उत्तरदाते अधिक आहेत. लहान प्रमाणात व्यवसाय करणाऱ्या लोकसंख्येची संख्या ५६ (१.९६%) इतकी आहे. ऑफिसर, शासकीय नोकरी, पांढरपेशी नोकरी, खाजगी नोकरी असणारे केवळ ५९ (२.०६%) इतके आहेत तर मोठे व्यवसाय किंवा स्थिर व्यवसाय करणाऱ्यांची संख्या ३५(१.२२% ) इतकी आहे. बालकामगार नसल्याचे वरील आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.


म्हणजेच समाजाच्या संरचनेमध्ये हलक्या दर्जाचे काम करणाऱ्या लोकसंख्येची संख्या सर्वात अधिक आहे त्याखालोखाल बेरोजगारांची संख्या आहे तर प्रतिष्ठीत स्वरूपाचे काम करणाऱ्या लोकसंख्येची संख्या कमी आहे.

**१६. मादिगा कुटुंबांचे मासिक उत्पन्न दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. १६

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ० रु.ते ५००० रु. | ४७ | ८.४५ |
| २ | ५,००१ रु. ते १०,००० रु. | १५७ | २८.२४ |
| ३ | १०,००१ रु. ते १५,००० रु. | १०६ | १९.०६ |
| ४ | १५,००१ रु. ते २०,००० रु. | ९५ | १७.०९ |
| ५ | २०,००१ रु. ते २५,००० रु. | ४३ | ७.७३ |
| ६ | २५,००१ रु. ते ३०,००० रु. | ३३ | ५.९४ |
| ७ | ३०,००१ रु. ते ३५,००० रु. | २९ | ५.२२ |
| ८ | ३५,००१ रु. ते ५०,००० रु. | ३२ | ५.७६ |
| ९ | ५०,००१ रु. ते १,००,००० रु. | १२ | २.१६ |
| १० | १,००,००० रु. च्या पुढे | २ | ०.३६ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १०



वरील सारणी हि कुटुंबाचे उत्पन्न दर्शविणारी आहे. संयुक्त कुटुंबामधून ५००१ ते १०००० उत्पन्न असणारे १५७ (२८.२४%) कुटुंबे आहेत, त्याखालोखाल १०००१ ते १५००० उत्पन्न असणारे १०६ (१९.०६%) कुटुंबे आहेत, ९५(१७.०९%) कुटुंबांचे उत्पन्न १५००१ ते २०००० रु. इतके आहे. ४७ (८.४५%) कुटुंबांचे उत्पन्न सर्वात कमी म्हणजे ५००० रु इतके आहे. २०००१ ते २५००० रु. उत्पन्न असणारे ४३ (७.७३%) टक्के लोक आहेत.


२५००१ ते ३०००० रु, ३०००१ ते ३५००० रु, ३०००१ ते ३५००० रु. एकत्रित उत्पन्न असणारे अनुक्रमे ३३ (५.९४%), २९(५.२२), ३२(५.७६%) टक्के आहे. ५०००१ ते १,००,००० एकत्रित उत्पन्न असणारे १२ (२.१६%) इतके तर १,००,००० च्या पुढे उत्पन्न असणारे केवळ २ (०.३६%) इतके आहेत.

## १७. घरातील आवश्यक सोयी सुविधा, साधन सामग्री व मनोरंजनाची साधनांची उपलब्धता दर्शविणारी सारणी

सारणी क्र. १७

| अनु.क्र. | साधन सामुग्री -सोयी सुविधा | उपलब्ध सोयी सुविधा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | टी. व्ही. (TV) | ४८९ | ८७.९५ |
| २ | मोबाईल | ५२७ | ९४.७८ |
| ३ | संगणक (डेस्कटॉप/ लॅपटॉप) | १४ | २.५२ |
| ४ | पंखा | ५०५ | ९०.८३ |
| ५ | कुलर | ३१ | ५.५८ |
| ६ | शिलाई मशिन | ८९ | १६.०१ |
| ७ | वॉटर फिल्टर | ३ | ०.५४ |
| ८ | पाण्याची मोटर | ४७ | ८.४५ |
| ९ | सोफा सेट | २२ | ३.९६ |
| १० | मायक्रोवेव्ह | ३ | ०.५४ |
| ११ | मिक्सर | ३८६ | ६९.४२ |
| १२ | फूड प्रोसेसर | ० | ०.०० |
| १३ | फ्रीज | १५६ | २८.०६ |
| १४ | वाशिंग मशिन | १८ | ३.२४ |
| १५ | लोखंडी कपाट | २९२ | ५२.५२ |
| १६ | सायकल | १२५ | २२.४८ |
| १७ | दुचाकी | २५२ | ४५.३२ |
| १८ | चारचाकी | २ | ०.३६ |
| १९ | टेम्पो | ४ | ०.७२ |
| २० | ट्रॅक्टर | ० | ०.०० |

आलेख क्र. ११




वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, ५५६ पैकी ५२७ (९४.७८%) जणांकडे मोबाईल आहे. मोबाईल जे आजच्या आधुनिक काळातील संपर्क करण्याचे प्रभावी साधन आहे, त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली असो किंवा बिकट, संपर्क करण्याच्या दृष्टीने अधिकतर व्यक्तींकडे मोबाईल असल्याचे दिसून आले. इतर साधनांमध्ये ४८९ (८७.९५%), पंखा ५०५ (९०.८३%), संगणक (डेस्कटॉप/ लॅपटॉप) १४ (२.५२%) कुलर ३१ (५.५८%), शिलाईमशिन ८९ ( १६.०१%), वॉटर फिल्टर ३ ( ०.५४%) पाण्याची मोटर ४७ (८.४५%), सोफा सेट २२ (३.९६%), मिक्सर ३८६ (६९.४२%), फ्रीज १५६ (२८.०६%), वाशिंग मशिन १८ (३.२४%) लोखंडी कपाट २९२ (५२.५२%), सायकल १२५ (२२.४८%), दुचाकी २५२ (४५.३२%), चारचाकी २ (०.३६%) आणि टेम्पो ४( ०.७२%) वस्तू त्यांच्या नावासमोर नमूद प्रमाणात आहेत. शेती पूरक किंवा व्यावसायिक कामांकरिता वापरत येणारा ट्रॅक्टर कोणत्याही उत्तरदात्यांकडे नसल्याचे दिसते.

आजच्या घडीला प्रत्येक घरामध्ये मनोरंजनाचे माध्यम म्हणून टी.व्ही., संपर्कासाठी मोबाईल, आणि महिलांचे काम सोयीस्कर करण्यासाठीचा अगदी स्वस्तातला मिक्सर अशा बाबी अगदी किरकोळ असून अत्यंत महत्वाच्या आहेत. या वस्तूंवरून मादिगा समाजाचे जीवनमान किंवा राहणीमानाचा दर्जा कसा आहे हे शोधण्याचा प्रयत्न काही निर्देशकांच्या आधारे करण्यात आला आहे. वीजपुरवठा, टेलिव्हिजन, मोबाईल, मिक्सर, फ्रीज, वाहने, पशुधन अशा काही वस्तू उत्तरदात्यांकडे आहेत किंवा नाही याचे परीक्षण या अभ्यासामध्ये करण्यात आले आहे.

**सारांश**

रोजगाराची उपलब्धता कोणत्याही व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला त्याचे दैनंदिन खर्च, मुलभूत गरजा, शिक्षणाचा दर्जा, मनोरंजनाची साधने हे सर्व उपलब्ध करून घेण्यासाठी सक्षम बनवतात. परंतु वरील आकडेवारी पाहता आर्थिक उत्पन्नक्षमता नसलेल्या लोकसंख्येच्या खालोखाल निम्न स्तरावर काम करणाऱ्या लोकसंख्येची आकडेवारी जास्त आहे. यावरून त्यांची आर्थिक परिस्थिती अवलंबून करते जी सद्यस्थितीमध्ये अत्यंत खालावलेली दिसते. रोजगाराच्या संधीची हि तफावत मादिगा समाजाला मिळणाऱ्या दर्जात्मक शैक्षणिक संधी, आरोग्याची साधने, मुलभूत गरजा, मनोरंजनाची साधने सर्वात महत्वाचे दर्जेदार शैक्षणिक याच्यावर प्रभाव करणारी आहे.

मादिगा समाजातील कुटुंबांचे एकत्रित उत्पन्न पाहिले तर ५ हजार ते १० हजार उत्पन्न असणारे कुटुंबे सर्वात जास्त आहेत, तीन व्यक्तींचे एक कुटुंब असे प्रमाण जरी ग्राह्य धरले तरी पाच हजार ते १५ हजार हे उत्पन्न कुटुंबाच्या किमान गरजा भागविण्यासाठी अतिशय कमी आहे. या उत्पन्नात दैनंदिन गरजा यासोबत दर्जेदार शैक्षणिक व आरोग्य या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे नाहीत. मादिगा समाजातील संयुक्त कुटुंबांमध्ये आजही दहापेक्षा अधिक सदस्य असतात. अशा कुटुंबाचे उत्पन्न अधिक दिसत असले तरी कुटुंब सदस्य संख्येचा विचार करता ते पुरेसे नसण्याचीच शक्यता आहे.

कुटुंबामध्ये असणाऱ्या साधन साहित्य व मनोरंजनाची साधने पाहिली तर पत्र्याची घरे, मातीची घरे असताना देखील केवळ गरज म्हणून वापराव्या लागणाऱ्या संख्येमध्ये पंख या साधनाचा वापर अधिकतर कुटुंबे करतात, संपर्क साधनासाठी मोबाईल आणि मनोरंजनामाध्ये टीव्ही या व्यतिरिक्त नमूद सर्व साधनांचा वापर क्वचित दिसतो. यावरूनही या कुटुंबांची आर्थिक स्थिती मागासलेली आहे हे लक्षात येते.

## **१८. बचतीचे माध्यम व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. १८

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | स्वःतकडे | १०५ | १८.८८ |
| २ | बँकेत/ पतपेढी | ९७ | १७.४५ |
| ३ | विमा (LIC) | ७८ | १४.०३ |
| ४ | भिशी | ३० | ५.४० |
| ५ | बचत गट | ४५ | ८.०९ |
| ६ | बचत करत नाहीत | ३६३ | ६५.२९ |

वरील सारणी उत्तरदात्यांनी बचत करण्याच्या माध्यमांचे बहुपर्याय निवडले असल्याने प्रत्येक प्रकारच्या माध्यमाची निवड करण्याचे प्रमाण ५५६ उत्तरदात्यांपैकी आहे. स्वतःकडे रोख रकमेची बचत करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ५५६ पैकी १०५ (१८.८८%) असून त्याखालोखाल ९७ (१७.४४%) उत्तरदाते बँकेमध्ये किंवा पतपेढीमध्ये पैशाची बचत करतात. एकूण उत्तरदात्यांपैकी ७८ (१४.०३%) उत्तरदाते विम्यामध्ये पैसे भरतात, विमा काढणाऱ्या उत्तरदात्यांमध्ये शासकीय सेवेमध्ये असणारे सफाई कर्मचारी सर्वाधिक आहेत. बचत गटांमध्ये पैसे ठेऊन बचत करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ४५ (८.०९%) असले तरी बचत गटामध्ये जमा करण्यात येणारी रक्कम हि प्रतिमाह केवळ ५० ते १०० रुपयांची बचत असते, या आधारे त्यांना अल्प प्रमाणात कर्ज मिळू शकते. बचत न करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५५६ पैकी ३६३ (६५.२८%) इतके आहे.

मादिगा समाजामध्ये आर्थिक मागासलेपणा जास्त प्रमाणत दिसून येतो. अशिक्षितपणा, कौशल्यांचा अभाव यामुळे बिगारी कामगार, मजुरी, घरकाम, सफाई काम अशा प्रकारच्या किंवा कमी उत्पन्न असलेली कामे करावी लागतात, परिणामी मोठ्या कष्टाने आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी काबाडकष्ट करणारा हा समाज असल्याने दैनदिन गरजा भागविता भागविता त्यांची दमछाक होत असते, अशा परिस्थितीमध्ये बचत होणे कठीण होऊन जाते. त्यामुळेच बहुतांश कुटुंबांमध्ये बचत न करणाऱ्यांचे कमी प्रमाणात दिसून येत आहे.

## १९. आर्थिक गुंतवणुकीसाठी निवडलेले पर्याय व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. १९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दागिने | १५ | २.६५ |
| २ | जमीन | ४ | ०.७१ |
| ३ | घर / फ्लॅंट | १० | १.७६ |
| ४ | इतर जंगम मालमत्ता | ० | ० |
| ५ | गुंतवणूक करत नाहीत | ५३८ | ९४.८९ |


वरील सारणी उत्तरदात्यांनी गुंतवणुकीचे बहुपर्याय निवडले असल्याने दागिने, जमीन, घर किंवा इतर ठिकाणी गुंतवणूक करण्याचे प्रमाण ५५६ उत्तरदात्यांपैकी आहेत. एकूण ५५६ उत्तरदात्यांपैकी ५३८ (९४.८९%) उत्तरदाते गुंतवणूक करीत नाहीत, तसेच ५५६ पैकी केवळ १५(२.६५%) उत्तरदाते दागिन्यांमध्ये गुंतवणूक करतात. घर किंवा फ्लॅंटमध्ये गुंतवणूक करणाऱ्याचे प्रमाण १० (१.७६%) आहे. गुंतवणूक म्हणून जमीन खरेदी करणारे केवळ ४ (०.७१) आहेत.

## २०.कर्ज घेण्याची कारणे व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वैयक्तिक समस्या | १० | १.८० |
| २. | विवाह | २३ | ४.१४ |
| ३. | घर बांधकाम | १८ | ३.२४ |
| ४. | व्यवसाय | ८ | १.४४ |
| ५. | पूर्वीचे कर्ज फेडण्यासाठी | २ | ०.३६ |
| ६. | शिक्षण | ९ | १.६२ |
| ७. | वैद्यकीय उपचार | २६ | ४.६८ |
| ८. | कर्ज घेतले नाही | ४६० | ८२.७३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १२



वरील सारणी मागील पाच वर्षामध्ये कर्ज घेतलेल्या उत्तरदात्यांची आकडेवारी दर्शविणारी आहे. एकूण ५५६ उत्तरदात्यांपैकी कर्ज घेतलेल्या उत्तरदात्यांची संख्या ९६ (१७.२७%) इतके आहे. त्यापैकी वैद्यकीय उपचारासाठी कर्ज घेणारे सर्वाधिक २६ (४.६८%) असून विवाहासाठी कर्ज घेणारे उत्तरदात्यांची संख्या २३ (४.१४%) आहे. घर बांधकाम साठी कर्ज घेणारे उत्तरदात्यांची संख्या १८ (३.२४%) आहे. व्यवसाय, शिक्षण, वैयक्तिक समस्याकरिता कर्ज घेणारे उत्तरदाते अनुक्रमे ८ (१.४४%), ९ (१.६२) आणि १०(१.८०%) उत्तरदात्यानी कर्ज घेतले आहे. पूर्वी घेतलेलं कर्ज फेडता न आल्याने ते कर्ज फेडण्यासाठी नवीन कर्ज घेणाऱ्यांची संख्या २ (०.३६%) इतकी आहे.

## २१. कर्जाचे स्त्रोत व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २१

| अनु.क्र. | कर्जाचे स्त्रोत | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सावकार | १५ | २.७० |
| २ | मित्र /नातेवाईक | ११ | १.९८ |
| ३ | बँक | ३५ | ६.२९ |
| ४ | पतपेढी | ३ | ०.५४ |
| ५ | बचत गट | २३ | ४.१४ |
| ६ | भविष्य निर्वाह निधी | २ | ०.३६ |
| ७ | वित्त कंपनी | ७ | १.२६ |
| ८ | कर्ज घेतलेले नाही | ४६० | ८२.७३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील आकडेवारीवरून निदर्शनास येते कि, बँकेकडून कर्ज घेणारे उत्तरदाते ३५ (६.२९%) इतके आहेत तर बचत गटामधून कर्ज घेणारे उत्तरदाते २३ (४.१४%) इतके आहेत. सावकाराकडून कर्ज घेणाऱ्या उत्तर दात्यांची संख्या १५ (२.७०%) असून आपल्याच मित्रांकडून किंवा नातेवाईकांकडून कर्ज घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ११ (१.९८%) आहे. वित्तकंपन्यामधून ७ (१.२६%) तर पतपेढीमधून ३ (०.५४) कुटुंबांनी कर्ज घेतले आहे. याशिवाय स्वतःच्या भविष्यनिर्वाह निधीमधून कर्ज घेणालेल्यांची संख्या केवळ २ (०.३६ %) आहे. एकूण ५५६ पैकी ४६० (८२.७३%) उत्तरदात्या कुटुंबांनी कर्ज घेतले नाही.

**२२. घेतलेले कर्ज फेडण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. २२

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | १२.५ |
| २ | नाही | ६ | ६.२५ |
| ३ | चालू आहे | ७८ | ८१.२५ |
| | एकूण | ९६ | १०० |

कर्ज घेतलेल्या एकूण ९६ उत्तरदात्यांपैकी ७८ (८१.२५%) उत्तरदात्यांकडून कर्जाची फेड चालू आहे, तर १२ (१२.५%) उत्तरदात्यांनी घेतलेले कर्ज पूर्णपणे फेडले आहे, याउलट ६(६.२५%) उत्तरदात्यांनी अद्याप कर्ज फेडले नाही किंवा त्याची परतफेड देखील केली नाही.

**सारांश**

यावरून असे लक्षात येते कि, मुळातच उत्पन्न कमी असल्यामुळे कर्ज घेण्याचे प्रमाण देखील या समाजाचे कमी आहे, ज्यांनी कर्ज घेतले आहे अशा व्यक्तींमध्ये शासकीय सेवेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा समावेश अधिक आहे. शिक्षणाकरिता कर्ज घेण्याचे प्रमाण कमी आहे म्हणजेच शिक्षणाप्रती उदासीनता दिसून येत आहे, कर्ज घेऊन मुलांना शिकविण्याकडे पालकांचा कल कमी आहे असे दिसते.

तसेच बँकाकडून दिले जाणारे कर्ज, सावकाराकडून दिले जाणारे कर्ज हे त्या व्यक्तीची पत किंवा कर्ज फेडण्याची योग्यता पाहून देखील दिली जाते, अर्थातच ज्यांची बँकेमध्ये बचत आहे व खात्यावर पैसा आहे, तारण ठेवण्यासाठी घर, जागा, दागिने आहेत, अशाच व्यक्तींना बँक कर्ज देते. अशा चौकटीना लक्षात घेतले तर वरील आकडेवारी मादिगा समाजाची, सामाजिक व आर्थिक पत निदर्शनास आणून देत आहे. बचत गटांकडून मिळणारे किंवा घेतले जाणारे कर्ज हे अत्यंत अल्प म्हणजे १००० ते ५००० रुपये किंवा क्वचित यापेक्षा जास्त दिले जाते, आणि त्याचा कर्जाचा हप्ता हा १०० ते ५०० रु इतकाही असतो . त्यामुळे हे कर्ज महिलांना घेणे आणि फेडणे सहज होते.

शासकीय स्तरावर अनेक कर्ज योजना किंवा व्यवसाय योजना आणि त्यास अनुसरून सबसिडी, महामंडळाकडून मिळणारे कर्ज, मुद्रा योजना, शैक्षणिक कर्ज असें असताना कर्जासाठी हे पर्याय निवडल्याचे दिसून येत नाही यावरून यासंदर्भातील माहितीचा अभाव स्पष्ट जाणवतो.


**मादिगा समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे वास्तव समजून घेण्यासाठी घराचे स्वरूप व बांधणी, क्षेत्र, शौचालयाची सुविधा, वीज, पाण्याची सुविधा या निर्देशकांचा वापर केला आहे.**

## २३. मादिगा समाजाच्या घराच्या मालकीबाबत माहिती दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २३

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत:ची | ३९६ | ७१.२२ |
| २ | भाडयाची | ५७ | १०.२५ |
| ३ | अतिक्रमित जागेत | २७ | ४.८६ |
| ४ | शासकीय निवासस्थान | ७३ | १३.१३ |
| ५ | बांधकामाचे ठिकाण | २ | ०.३६ |
| ६ | नातेवाईकांच्या घरी | १ | ०.१८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १३



वरील सारणी मादिगा समाजातील लोकांच्या घरांचे प्रकार दर्शविणारी आहे, या सारणीवरून असे निदर्शनास येते कि, स्वतःच्या घरामध्ये राहणाऱ्याची संख्या ३९६ (७१.२२%) आहे. भाडयाच्या घरामध्ये राहणाऱ्याची संख्या ५७ (१०.२५%) इतकी असून अतिक्रमित जागेत राहणाऱ्याची संख्या २७ (४.८६%) इतकी आहे. शासकीय निवासस्थानमध्ये राहणाऱ्याची संख्या ७३ (१३.१३%) इतकी आहे. बांधकामाचे ठिकाणी राहणाऱ्याची संख्या २ (०.३६%) इतकी आहे. नातेवाईकांच्या घरामध्ये राहणाऱ्याची संख्या १ (०.१८%) इतकी आहे.

## २४. घराच्या बांधणीचा प्रकार त्यांच्या आकडेवारीसह दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २४

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कच्चे (चटईचे, झोपडी, पत्र्याचे घर) | २२५ | ४०.४७ |
| २ | अर्धवट पक्के (मातीचे बांधकाम) | ९० | १६.१९ |
| ३ | पक्के (सिमेंट—विटांचे बांधकाम) | २४१ | ४३.३५ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणीवरून मादिगा समाजाच्या घरांची बांधणी स्वरूप निदर्शनास येते. कच्चे स्वरुपाच्या म्हणजेचचटईने बांधलेल्या झोपड्या, पत्र्याची घरे अशा प्रकारच्या घरांमध्ये राहणाऱ्याची संख्या २२५ (४०.४७%) इतकी आहे. मातीने बांधलेल्या अर्धवट पक्क्या स्वरूपाच्या घरामध्ये राहणाऱ्याची आकडेवारी ९० (१६.१९%) इतकी आहे. सिमेंट - विटांनी बांधकाम केलेल्या पक्क्या घरात राहणाऱ्याची संख्या २४१ (४३.३५%) आहे.

सोलापूर जिल्ह्यातील, सोलापूर महानगरपालिकेमध्ये सफाईकाम करणारे कर्मचारी महानगरपालिकेकडून मिळालेल्या शासकीय क्वार्टर्समध्ये राहतात. महानगरपालिकेने सफाई कामगारांसाठी स्वतंत्र वस्त्या स्थापन केल्या असून सर्व घरे पक्क्या स्वरुपाची आहेत. हि सर्व घरे पालिकेची मालमत्ता असल्याने मादिगा समजतील लोकांचा त्यावर हक्क नाही.

## २५. मादिगा समाजाच्या लोकांच्या घरातील खोल्यांची संख्या व त्यांची आकडेवारी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एक खोली | १९२ | ३४.५३ |
| २ | दोन खोल्या | २९९ | ५३.७८ |
| ३ | तीन खोल्या | ४४ | ७.९१ |
| ४ | चार खोल्या | १७ | ३.०६ |
| ६ | पाचपेक्षा जास्त खोल्या | ४ | ०.७२ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी उत्तरदात्यांच्या घरांमध्ये असणाऱ्या खोल्यांची संख्या दर्शविते. सारणीनुसार दोन खोल्या असणारे उत्तरदाते सर्वात जास्त म्हणजे २९९ (५३.७८%) इतके आहेत, त्याखालोखाल एक खोली असणाऱ्या लोकसंख्येची संख्या १९२ (३४.५३%) इतकी आहे. तीन खोल्या असणाऱ्या उत्तरददात्यांची संख्या ४४(७.९१%), चार खोल्या असणाऱ्या उत्तरददात्यांची संख्या १७ (३.०६) तर पाच खोल्यांच्या घरात राहणारे उत्तरदाते केवळ ४ (०.७२%) इतके आहेत.

**सारांश**

वरील आकडेवारीनुसार २८६३ उत्तरदत्यांपैकी ३९६ (७१.२२%) लोकसंख्येकडे स्वतःचे घर आहे. चटईच्या घरामध्ये किंवा पाल टाकून, पत्र्याच्या घरात तसेच मातीने सारवलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या आणि अर्धवट पक्क्या स्वरूपाच्या घरांमध्ये राहणाऱ्या उत्तरदात्यांची आकडेवारी ३१५ (५६.६६.%) आहे.

जी कुटुंबे पक्क्या घरामध्ये राहतात, ती शासकीय निवास स्थान किंवा भाडेतत्वावर असल्याने घरांची मालकी त्यांची नाही, असे दिसून येते. बहुतेकांना स्वतःची घरे असली तरी त्या घरातील स्थिती पाहिली तर फारच वाईट आहे. घरामध्ये शौचालय, स्नानगृह, सांडपाणी व्यवस्था नसल्याचे दिसते. एकूणच हा समाज मुलभूत सुविधांसाठी संघर्ष करीत असून सुविधांच्या पूर्ततेशिवाय सामाजिक परिस्थिती सुधारणे अशक्य ठरेल. मादिगा समाजाची निवाऱ्याची मुलभूत गरज पूर्ण होत असताना त्याची स्थिती निम्न दर्जाची किंवा त्यापेक्षा कनिष्ठ दर्जाची असल्याचे दिसते.

संशोधन अभ्यासादरम्यान करण्यात आलेल्या निरीक्षणामध्ये आढळून आलेल्या घराच्या स्थिती शहरामध्ये वसलेल्या वस्त्यांमधील असून, वस्तीमधील घरांना घर संकल्पना लागू होऊ शकत नाही. निकृष्ठ पद्धतीने केलेली घराची बांधणी, उन, वारा, पाऊस यांपासून सुरक्षतेचा अभाव, वीज, पाणी, शौचालया सारख्या अगदी मुलभूत सोयी सुविधांचा अभाव अशा खडतर परिस्थितीमध्ये समाज जीवनमान व्यतीत करीत आहे. त्याचे राहणीमान उंचाविण्यासाठी शासनाकडून ठोस पावले उचलणे अत्यावशक असल्याचे जाणवते.

वस्तींची संरचना देखील अतिशय दाटीवाटीने, एकमेकांना चिकटून, गजबजलेली असते. जागेच्या अभावामुळे घराबाहेर वाटांना पावूलवाटेचे स्वरूप प्राप्त होते, अशा गल्ल्या-गल्यांमधील रुंदी दोन फुटांपेक्षा कमी असते. कपडे धुणे, भांडी घासणे, अंघोळ करण्यासाठी रस्त्याचा वापर केला जातो, ज्यामुळे आरोग्याचे प्रश्न भेडसावत असतात, तर सांडपाण्याचा निचरा होईल अशी सार्वजनिक उत्तम व्यवस्था दिसून येत नाही. तसेच वस्तीमध्ये वाढत असलेल्या आगीसारख्या दुर्घटनेच्या वेळी अरुंद रस्त्यांमुळे अग्निशामक दल घटनेच्या ठिकाणी वेळेमध्ये पोहच्ण्यास विलंब होत असल्याने मनुष्यहानी आणि वित्तहानी अधिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## २६. शेती असणाऱ्या उत्तरदात्यांची शेतीच्या प्रकारासह आकडेवारी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २६

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जिरायती | ७० | १२.४१ |
| २ | बागायती | ६ | ०.९० |
| ३ | पडीक जमीन | १७ | ३.०६ |
| ४ | शेतजमीन नाही. | ४६३ | ८३.२७ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी उत्तरदात्यांकडे असलेल्या शेतजमीनबाबत आकडेवारी दर्शविणारी आहे. एकूण ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी ४६३ (८३.२७%) उत्तरदात्यांकडे स्वतःची शेतमालकी किंवा शेत जमीन नाही, तर स्वतःच्या मालकीची शेत जमीन असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण केवळ ९३ (१६.७३%) इतके आहे.

ज्या उत्तरदात्यांकडे शेत जमीन आहे, त्यांच्यातील १७ (३.०६%) उत्तरदात्यांची जमीन पडीक किंवा नापीक आहे. अनुक्रमे जिरायती व बागायती जमीन असणारे ९३ उत्तरदात्यांपैकी ७० (१२.४१%), ६(०.९०) इतके आहेत.

## २७. शेतजमिनीचा असणाऱ्या उत्तरदात्यांकडे शेती उपयोगी पाण्याच्या स्त्रोतांची उपलब्धतता दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विहीर | ६ | १.०८ |
| २ | बोअर | १ | ०.१८ |
| ३ | ओढा / नदी | २ | ०.३६ |
| ४ | कालवा | ४ | ०.७२ |
| ५ | इतर | ८० | १४.३९ |
| ६ | लागू नाही | ४६३ | ८३.२७ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

मादिगा समाजातील एकूण ५५६ पैकी ४६३ उत्तरदात्यांकडे जमीन नाही, तर उर्वरित ९३ पैकी पावसाच्या पाण्यावर ८० (१४.३९%) उत्तरदाते अवलंबून आहेत तर स्वतःची विहीर असणारे उत्तरदाते ६ (१.०८%), बोअर असणारे १ (०.१८%), ओढ्याच्या किंवा नदीच्या पाण्याचा वापर करणारे उत्तरदाते २ तर कालव्याच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या उत्तर दात्यांची संख्या ४ (०.७२%)आहे.


एखाद्या व्यक्तीकडे शेतजमीन किती आहे यावर त्याची समाजामधील पत निच्छित केली जाते. ग्रामीण भागामध्ये तर शेती असणे, हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. परंतु मादिगा समाजाच्या अधिकतर कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेत जमीन नाही. ज्यांच्याकडे शेती आहे त्यापैकी बहुतांश लोकांची जमीन नापीक किंवा पडीक असण्यासोबतच शेती किंवा जमीन गुंठ्यांमध्ये आहे. शेतीतून उत्पन्न घेणारे अगदी नगण्य आहे. यावरून आर्थिकदृष्ट्या स्थावर संपत्तीच्यादृष्टीने हा समाज अतिशय मागास आहे, असे म्हणू शकतो.

## २८. घरातील पाण्याची सुविधा दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २८

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक नळ | २२६ | ४०.६५ |
| २ | सार्वजनीक नळ | ३२६ | ५८.६३ |
| ३ | हातपंप / बोअर | ४ | ०.७२ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १४




वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, एकूण उत्तरदात्या कुटुंबांपैकी २२६ (४०.६५%) मध्ये पिण्याच्या पाण्याची सोय वैयक्तिकरित्या असून त्यापेक्षाही जास्त म्हणजेच ३२६ (५८.६३%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये पिण्याच्या पाण्याची वैयक्तिक सुविधा नसल्याने सार्वजनिक नळाचा वापर करावा लागतो. केवळ ४ (०.७२%) उत्तरदाते पाणी भरण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी असलेल्या हातपंपाचा वापर करतात.

## २९. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणांचे घरापासूनचे अंतर दर्शविणारी सारणी

सारणी क्र. २९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरामध्ये /अंगणामध्ये | २८५ | ५१.२६ |
| २ | घरापासून १०० ते ५०० मीटर च्या आत | २५५ | ४५.८६ |
| ३ | घरापासून ६०० मीटर ते १ किमी अंतरावर | ९ | १.६२ |
| ४ | घरापासुन २ किमी पेक्षा जास्त अंतरावर | ७ | १.२६ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

घरापासून पिण्याच्या पाण्याची सुविधा किती अंतरावर आहे याचे प्रमाण दर्शविणारी वरील आकडेवारी आहे. घरामध्ये किंवा अंगणामध्ये हि सुविधा असणारे उत्तरदाते सर्वाधिक म्हणजे २८५ (५१.२६%) इतके आहेत, तर त्याच्या जवळपास जाणारी आकडेवारी म्हणजेच २५५ (४५.८६%) उत्तरदात्यांना पिण्याच्या पाण्यासाठी घरापासून १०० ते ५०० मीटर च्या आत जावे लागते. ९ (१.६२%) उत्तरदात्यांना घरापासून अनुक्रमे घरापासून ६०० मीटर ते १ किमी अंतरावर पाणी आणण्यासाठी जावे लागते. केवळ ७ (१.२६%) उत्तरदात्यांना घरापासुन २ किमी पेक्षा जास्त अंतरावर पाणी आणण्यासाठी जावे लागते.

## ३०. विजेची मालकी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबाच्या नावावर | ४०३ | ७२.४८ |
| २ | भाडयाने | १५१ | २७.१६ |
| ३ | इतर | २ | ०.३६ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

## ३१. तासानुसार विजेची उपलब्धता दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३१

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चार तास | १ | ०.१८ |
| २ | आठ तास | ५ | ०.९० |
| ३ | बारा तास | ८ | १.४४ |
| ४ | चोवीस तास | ५४२ | ९७.४८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

विजेची उपलब्धता दर्शविणाऱ्या सारणीनुसार एकूण ५५६ कुटुंबांमध्ये विजेचे कनेक्शन असून त्यापैकी ४०३ (७२.४८%) कुटुंबामध्ये वीज कनेक्शन कुटुंबाच्या नावावर आहे. तर भाडयाने वीज घेणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १५१ (२७.१६%) इतकी आहे. पुणे, मुंबई आणि सोलापूर शहरातील वस्त्यांच्या ठिकाणच्या घरांमध्ये वीज २४ तास विज उपलब्ध असणारे उत्तरदाते सर्वात जास्त म्हणजे ५४२ (९७.४८%) इतके आहेत. तालुक्याच्या किंवा शहरापासून दूर राहणाऱ्या वस्त्यांमध्ये अनुक्रमे बारा तास, आठ तास व चार तास वीज असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ८ (१.४४)%), ५ (०.९०%), ४(०.१८%) इतकी आहे.

## ३२. इंधनाचा वापर दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३२

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गॅस | ५२६ | ९४.६० |
| २ | रॉकेल | ११ | १.९८ |
| ३ | जळावू लाकुड | १८ | ३.२४ |
| ४ | कोळसा | ० | ०.०० |
| ५ | इतर | १ | ०.१८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते कि, ५५६ कुटुंबांपैकी ५२६ (९४.६०) कुटुंबे गॅसचा वपर करतात, कोळश्याचा वापर करणारी कुटुंबे ११ (१.९८%) आहेत तर जळावू लाकूडाचा वापर करणारी कुटुंबे १८ (३.२४%) इतकी आहेत.

निरीक्षणामध्ये असेही आढळून आले कि, आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना देखील केवळ जळावू लाकूड उपलब्ध होत नसल्याने चूल चा वापर करू शकत नाही त्यामुळे गॅस परवडत नसताना देखील जळावू नाईलाजाने गॅस चा वापर करावा लागतो. असेही या समाजाने माहिती दिली आहे.

## ३३.  शौचालयाची सुविधा दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३३

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक शौचालय | ११२ | २०.१४ |
| २ | सार्वजनिक शौचालय | ४३२ | ७७.७० |
| ३ | खुल्या जागेत | १२ | २.१६ |
|  | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

## ३४.  शौचालयामधील पाण्याची व्यवस्था दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३४

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८१ | ५०.५४ |
| २ | नाही | २६३ | ४७.३० |
| ३ | लागू नाही | १२ | २.१६ |
|  | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणीवरून असे लक्षात येते कि, ५५६ उत्तरदात्यांपैकी सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४३२ (७७.७०%) असून याव्यतिरिक्त वैयक्तिक शौचालयाचा वापर करणाऱ्यांची  संख्या ११२ (२०.१४) आहे. खुल्या जागेवर शौचास जाणाऱ्यांची संख्या १२ (२.१६%) इतके आहेत.

सार्वजनिक व वैयक्तिक शौचालयांमध्ये पाण्याची सोय आहे, असे सांगणारे २८१ (५०.५४%) आहेत. तर पाण्याची सोय नाही असे सांगणारे उत्तरदाते २६३ (४७.३०) इतके आहेत.

केंद्र व राज्य शासनाने फार मोठ्या प्रमाणात शौचालय बांधणीचा कार्यक्रम हाती घेतला आहे, तथापि मादिगा समाज वास्तव्यास असणारी वस्तीची संरचना, कच्ची घरे आणि ड्रेनेज सिस्टीमच्या

अभावामुळे अधिकतर कुटुंबाना सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा लागत आहे. तसेच शौचालय असताना देखील केवळ पाण्याच्या अभावामुळे देखील अनेकदा शौचालयाचा वापर होत नसताना दिसते. आजही जवळपास ५०% लोक सार्वजनिक शौचालयाचा वापर करत असून वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय योजनांची कार्यक्षम अंबलबजावणी करणे आवश्यक वाटते.

### ३५. सांडपाणी व्यवस्था दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ड्रेनेजमध्ये | ३२९ | ५९.१७ |
| २ | बंदगटार | ९१ | १६.३७ |
| ३ | उघडी गटारे/ नाला | १३५ | २४.२८ |
| ५ | खुल्याजागेवर | १ | ०.१८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी सांडपाणी व्यवस्थेबाबत माहिती दर्शविते. अभ्यासामध्ये सहभागी ५५६ कुटुंबांपैकी ३२९ (५९.१७%) कुटुंबांनी सांडपाणी वाहून नेण्यासाठी ड्रेनेज व्यवस्था असल्याचे सांगितले. उघडी गटारे असल्याचे सांगणारे १३५ (२४.२८%) उत्तरदाते आहेत याउलट बंदगटार व्यवस्था असल्याचे ९१ (१६.३७%) उत्तरदात्यांनी सांगितले आहे.

## ३६. कचरा व्यवस्थापन दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३६

| अनु.क्र. | कचरा व्यवस्थापन | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कचरा वेचका देतो | २३ | ४.१४ |
| २ | कचरापेटी / कचराकुंडी | १६४ | २९.५० |
| ३ | कचरागाडी | ३३२ | ५९.७१ |
| ४ | खुल्याजागेवर | ३७ | ६.६५ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

महानगरपालिकेतर्फे शहरी भागांमध्ये आणि वस्त्यांमध्ये कचरा व्यवस्थापन चांगल्या परके करण्यात आले असून कचरा उचलण्यासाठी कचरा वेचक, घंटागाड्या आणि कचरा पेट्यांचा वापर केला जातो. संशोधन अभ्यासादरम्यान निवड करण्यात आलेल्या भागांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांपैकी ३३२ (५९.७१%) कुटुंबांनी सांगितले कि, त्यांच्या भागामध्ये कचरा नेण्यासाठी कचरागाडी येते तर कचरा कचरापेटी / कचराकुंडी मध्ये टाकणाऱ्या उत्तरदात्यांची आकडेवारी १६४ (२९.५०%) इतकी आहे. २३ (४.१४%) कुटुंबे त्यांच्याकडील कचरा वेचकास देतात. उर्वरित ३७ (६.६५%) कुटुंबे कोणतीही व्यवस्था नसल्याने खुल्याजागेवर कचरा टाकतात असे समजते.

**शासकीय योजनांच्या बाबत**

समाजातील दुर्बल घटकांना सुरक्षा कवच प्रदान करणे हे एकूणच आपल्या शासनाचे महत्वाचे लक्ष राहिले आहे, शिक्षण व आरोग्याच्या सोयी व सवलतीबरोबर शेती, जलसिंचन, जमीन वितरण, इ बाबी दुर्बल घटकांच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. त्याच बरोबर सार्वजनिक वितरण व्यवस्था सक्षम करणे, एकात्मिक बाल व महिला विकास योजना राबविणे यावर अधिक लक्ष देऊन त्याचा लाभ गरिबांना देणे इ. धोरणे आता राष्ट्रीय धोरणे झाली आहेत, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार हि ग्रामीण गरिबांसाठी निर्माण करण्यात आलेली एकमेव स्वयंरोजगार योजना आहे.

शासनामार्फत सुरु करण्यात आलेला हा कार्यक्रम IRDP, TRYSEM, DWDCRA, SITRA, GKY आणि NWS याच्या जागी आला आहे. ग्रामीण क्षेत्रातील गरिबांच्या क्षमतेचा उपयोग करून लहान लहान उद्योग धंदे सुरु करणे, त्यांच्या अंतर्गत असलेल्या कौशल्याचा प्रोत्साहन देऊन उत्पादने व सेवा निर्माण करण्यासाठी हि योजना सुरु करण्यात आली.

घरे बांधणीसाठी घरकुल योजना कार्यान्वुइत करण्यात आलेल्या आहे, शिक्षण व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व प्रवेशित जागांमध्ये आरक्षण निर्माण केले आहे, व्यवसायासाठी कर्ज योजना व सबसिडी आहे. अशा अनेक अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ घेऊन अनुसुचीत जाती मधील महार, चांभार, मांग , मातंग अशा काही समाजांनी आपला विकास साधला आहे. तथापि मादिगा समाज या पद्धतीने आपला विकास साधू शकला नाही.

## ३७. शासकीय योजनांची जनजागृती असणेबाबत माहिती दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४२ | ७.५५ |
| २ | नाही | ५१४ | ९२.४५ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |


वरील सारणीवरून असे स्पष्ट होते कि, एकूण ५५६ उत्तरदात्यांपैकी केवळ ४२ उत्तरदात्यांना शासकीय योजनांबाबत माहिती आहे. याउलट ५१४ (९२.४५%) उत्तरदात्यांना कोणत्याही शासकीय योजनांची माहिती नाही.

## ३८. योजनांची माहिती नसण्याची कारणे दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ३८

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | योजनेबाबत जनजागृती | १६० | २८.७८ |
| २ | जातीचा दाखला नसणे | ३२ | ५.७६ |
| ३ | निरक्षरता | १५९ | २८.६० |
| ४ | योजनेमध्ये विशेष रुची नसणे | ९१ | १६.३७ |
| ५ | स्थलांतर | १ | ०.१८ |
| ६ | वेळ नाही | ३ | ०.५४ |
| ७ | माहिती चे स्त्रोत | ८३ | १४.९३ |
| ८ | शासकीय अधिकाऱ्यांची उदासीनता | २६ | ४.६८ |
| ९ | सांगू शकत नाही | १ | ०.१८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १५



अनुसूचित जातीच्या सर्वकष विकासाच्या दृष्टीने शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावर योजनेला प्रसिद्धी दिली जात असताना देखील अनुसूचित जातीसाठी असणाऱ्या योजनेबाबत उत्तरदात्यांना माहिती नसल्याचे दिसून आले. या अनुषंगाने घेतलेल्या माहितीमध्ये सर्वात अधिक म्हणजे ५५६ पैकी १५९ (२८.६०%) उत्तरदात्यांनी पालकांचा आणि स्वतःचा अशिक्षितपणा व अडाणीपणा याचा सर्वात मोठा अडसर योजनेची माहिती घेताना होतो. योजनांबाबत माहिती नाही किंवा जागृती नसल्यामुळे योजनेबाबत संपूर्ण माहिती नसल्याबाबतचे मत १६० (२८.७८%) उत्तरदात्यांनी दिले आहे.

योजनेमध्ये विशेष रस नसल्याबाबतचे मत ९१ (१६.३७%) उत्तरदात्यांनी दिले आहे. योजनेबाबत सविस्तर माहिती किंवा मार्गदर्शन मिळण्याची ठिकाणे माहिती नसल्यामुळे योजनेबाबत काहीच समजत नसल्याचे मत ८३ (१४.९३) उत्तरदात्यांनी दिले आहे. जातीचा दाखला नसल्यामुळे तसेच संबंधित अधिकाऱ्याची उदासीनता हि दोन कारणे असल्याबाबतचे मत अनुक्रमे ३२(५.७६%) व २६ (४.६८%) उत्तरदात्यांनी दिले आहे. बहितांश मादिगा समाज रोजंदारीवर काम करत असल्याने योजनेची माहिती घेण्यासाठी वेळ मिळत नाही, वेळ काढल्यास रोजंदारी बुडेल या विचाराने रजा घेण्याचे टाळले जाते असे मत असणार्यांचे प्रमाण ३ (०.५४%) आहे. तर १ (०.१८%) उत्तरदात्यांनी दिली नाही.

निरीक्षणावरून असे आढळले कि अशिक्षितपणा किंवा अडाणीपणा यामध्ये शासकीय कार्यालयामध्ये जाऊन तेथील कर्मचाऱ्यांकडे जाऊन योजनेची माहिती घेणे, आवश्यक असणारे कागदपत्रे उपलब्ध करून ते सादर करणे या सर्व बाबींमध्ये सामाजीकीकरणाच्या स्तरावर अडचणी येत असणार आणि आत्मविश्वासाच्या अभावी, आणि स्थलांतर व भाषेचा अडसर या दडपणाखाली असल्यामुळे देखील योजनेबाबत फारसा सकारात्मक विचार करताना दिसून येत नाही.

सोबतच अशिक्षितपणा घरामध्ये रेडीओ किंवा टी. व्ही, रोजचे घरी येणारी वर्तमानपत्रे या सर्वांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने माहितीचा अभाव जाणवतो. स्थलांतरामुळे भाषेमुळे आणि एकूणच मागासलेपणामुळे त्यांना या गोष्टींबाबत एक प्रकारची भती मनात आहे

**३९. शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याबाबतचे आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ३९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ४.५० |
| २ | नाही | ५३१ | ९५.५० |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते कि, ५५६ पैकी एकूण ५३१ (९५.५०%) उत्तरदात्यांनी योजनेचा लाभ घेतलेला नाही, तर केवळ २५ (४.५०%) उत्तरदात्यांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे. शिष्यवृत्तीचा लाभ घेणारे १० कुटुंबे, घरकुल योजनांचा लाभ घेणारे ९ कुटुंबे, कर्ज योजना ६ कुटुंबे आणि अशी ५ कुटुंबातील लोकांनी रोजगार मिळविण्यासाठी योजनांचा लाभ घेतला आहे जेज्याचे प्रमाण अगदी हातांच्या बोटांवर मोजण्यासारखी आहे. त्या २५ कुटुंबांपैकी काहीनी दुहेरी योजनेचा लाभ घेतलेला आहे.

यावरून असेल दिसते कि, योजनेचा लाभ न घेणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक असण्यामागे अनेक कारणे समोर असली तरी विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तसेच त्यांचे लाभ समाजापर्यंत पोहोचविणे परिणामी त्यांचा त्यामार्फत विकास घडविणे महत्वाचे ठरते, परंतु प्रत्यक्षात मात्र असे होताना दिसू येत नाही जेणेकरून त्यांची एकंदरीत परिस्थिती अजूनही मागासलेल्या अवस्थेत असल्याचे जाणवते.

## ४०. लाभ घेण्यात आलेल्या योजनेचे स्वरूप दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ४०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक - शालेय साहित्य / शिष्यवृत्ती / अधिछात्रवृती / वसतिगृह | १० | १.८० |
| २ | रोजगार | ५ | ०.९० |
| ३ | आर्थिक सहाय्य – कर्ज सुविधा / सबसिडी | ६ | १.०८ |
| ४ | प्रशिक्षण/कौशल्य विकास प्रशिक्षण | ० | ०० |
| ५ | घरकुल / जमीन /पाळीव प्राणी/ विहीर | ९ | १.६२ |
| ६ | कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही. | ५३१ | ९५.५० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, ५५६ कुटुंबांपैकी सर्वाधिक ५३१ (९५.५०%) उत्तरदात्यांनी कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही. शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वसतिगृह अशा शैक्षणिक योजनांचा लाभ घेणाऱ्या उत्तरदाते १० (१.८०%) आहेत. घरकुल, जमीन, पाळीव प्राणी, विहीर संदर्भातील योजनांचा लाभ घेणारे उत्तरदाते ९ (१.६२%) इतके आहे. रोजगार आणि आर्थिक सहाय्य, कर्ज सुविधा, सबसीडी या संदर्भातील योजनांचा लाभ घेणारे उत्तरदाते अनुक्रमे ५ (०.९०%), ६ (१.०८%) इतकी आहे, तर प्रशिक्षण कौशल्य विकास प्रशिक्षण सारख्या योजनेचा लाभ घेणारे उत्तरदात्यांचे प्रमाण ० आहे.

वरील सारणी वरून ९५.५०% उत्तरदाते कोणत्याही योजनेचा लाभ घेत नाही, त्यामुळे मादिगा समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासावर मोठ्या प्रमाणात नकारात्मक परिणाम होताना दिसून येत आहे.

## ४१. योजनेचा लाभ घेण्यामध्ये येणाऱ्या अडचणी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ४१

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | योजनेची माहिती नाही. | ४५१ | ८१.१२ |
| २ | कागदपत्राची पूर्तता करण्यास असमर्थता | ४४३ | ७९.६८ |
| ३ | जातीचा दाखला / जातपडताळणी प्रमाणपत्र नाही | ४५९ | ८२.५५ |
| ४ | अधिकाऱ्यांकडून उदासीनता | २९२ | ५२.५२ |
| ५ | योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम भरता न येणे. | ६५ | ११.६९ |
| ६ | योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसणे. | ४५ | ८.०९ |
| ७ | योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई | २८ | ५.०४ |

वरील सारणीवरून योजनेचा लाभ घेण्यामध्ये येणाऱ्या अडचणीबाबत माहिती निदर्शनास असून उत्तरदात्यांना येणाऱ्या अडचणी एकापेक्षा अधिक असू शकतात, हे लक्षात घेवून त्यांना बहुपर्याय निवडण्यास मुभा देण्यात आली होती, त्यामुळे उत्तरदात्यांनी त्यांच्या अडचणी नमूद करण्यासाठी बहुपर्याय निवडले आहेत.

एकूण उत्तरदात्यांपैकी "योजनेची माहितीच नाही" असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ४५१ (८१.१२%) असून योजनेसंबंधी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महत्वपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थ असणारे उत्तरदात्यांचे प्रमाण ४४३ (७९.६८) इतके आहे. जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र नसल्यामुळे योजनेसाठी अर्ज करताच येत नाही असे सांगणाऱ्या कुटुंबांची संख्या ४५९ (८२.५५) आहे.

अधिकारी वर्गाची उदासीनता हे कारण सांगणारे उत्तरदाते २९२ (५२.५२%) इतके आहेत. आर्थिक अडचणीमुळे योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम भरू शकत नसल्याचे

६५(११.६९%) उत्तरदात्यांचे मत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसल्याबाबतचे मत ४५(८.०९%) उत्तरदात्यांनी निवडले आहे. योजनेचा लाभ मिळताना होणारी दिरंगाई आणि लागणारा विलंब यामुळे योजनेचा लाभ घेताना येणारी उदासीनता बाबत २८ (५.०४%) उत्तरदात्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

**४२. समाजाचा धर्म उत्तरदात्यांचा धर्म दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ४२

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ५५५ | ९९.८२ |
| २ | बौद्ध | १ | ०.१८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १००.०० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, एकूण ५५६ उत्तरदात्यांपैकी ५५५ (९९.८२ %) उत्तरदात्यांनी आपला धर्म हिदू असल्याचे सांगितले आहे, तर केवळ १ (०.१८) कुटुंबातील उत्तरदात्याने आपला धर्म बौद्ध असल्याचे सांगितले आहे. यावरून असे लक्षात येते कि, मादिगा समाज मूळतः हिंदू असून काही कुटुंबांनी बौद्ध देखील धर्म स्वीकारला आहे.

**सदर अभ्यास मादिगा समजाच्या जातीच्या संदर्भात झलेल्या चुकीच्या नोंदी व त्याची कारणे याकडे विशेष लक्ष वेधतो.**


**मादिगा समाजाने त्यांच्या जातीच्या संदर्भात झालेल्या चुकीच्या नोंदी आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांबाबत महाराष्ट्र राज्य शासनाकडे निवेदन दिले असून त्याअनुषंगाने सदर विषयाची माहिती घेण्याकरिता अनेक अभ्यासपूर्वक निर्देशक तयार करण्यात आले आहेत. ज्यामध्ये एकूण लोकसंख्येकडे असणाऱ्या जात प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण, चुकीच्या नोंदीचीं आकडेवारी आणि त्यामागील अशा अनेक घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.**

**४३. मादिगा समाजातील उत्तरदात्यांच्या कागदपत्रावर नोंद असलेली जात दर्शविणारी आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ४३

| **अनु.क्र.** | **जात** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | मादिगा | ८५ | १५.२९ |
| २ | मादगी | ६३ | ११.३३ |
| ३ | महार | २४ | ४.३२ |
| ४ | मांग | १०२ | १८.३५ |
| ५ | हरिजन | ५ | ०.९० |
| ६ | मोची | २५० | ४४.९६ |
| ७ | तेलगु | ६ | १.०८ |
| ८ | वाल्मिकी | ३ | ०.५४ |
| ९ | भंगी | ६ | १.०८ |
| १० | चांभार | ९ | १.६२ |
| ११ | बौद्ध | २ | ०.३६ |
| १२ | नवबौद्ध | १ | ०.१८ |
| | एकूण | ५५६ | १००.०० |

आलेख क्र. १६




सदर संशोधन अभ्यासामध्ये केवळ मादिगा जातीच्या कुटुंबाचा उत्तरदाते म्हणू सहभाग घेतला असूनही वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, मादिगा समाजाची जातीच्या संदर्भात विविध जातींची नोंद झाली असून सहभागी कुटुंबे कोणत्याही बाबतीत महाराष्ट्रातील मूळ मांग, महार, चांभार, हरिजन, बौद्ध अशा जातींच्या वैशिष्ट्याबाबत साम्य दर्वीत नाही.

वरील सारणीमध्ये मादिगा समाजातील लोकांना लागलेल्या चुकीच्या जाती आकडेवारीनुसार दर्शविण्यात आली आहे. एकूण ५५६ कुटुंबांपैकी २५० म्हणजेच (४४.९६ %) कुटुंबाना मोची जात लागली असून १०२ (१८.३५%) उत्तरदात्यांनी त्यांची नोंद मांग म्हणून झाली असल्याचे सांगितले आहे. अनुक्रमे ७२ (१२.९५%) आणि ६९ (१२.४१%) उत्तरदात्यांनी मादिगा आणि मादगी जात असल्याचे सांगितले आहे परंतु या व्यक्तींकडे या संदर्भातील प्रमाणपत्रे किंवा आवश्यक कागदपत्रे नाहीत. इतर जातीची कागदपत्रावर नोंद झालेली संख्या पुढीलप्रमाणे आहे. महार २५ (४.५० %), हरिजन ७ (१.२६), तेलगु ६ (१.०८), वाल्मिकी ३ (०.५४), भंगी ६ (१.०८%), चांभार १० (१.८०%)अनुसूचित जाती, बौद्ध, नवबौद्ध यांचे प्रमाण प्रत्येकी १ (०.१८ %) इतकी आहे.

वरील तक्त्यामध्ये दिसून येणारे तेलगु हि जात म्हणून नमूद असली तरी वास्तविक तेलगु हि जात कोणत्याच राज्यामध्ये जातीच्या यादीमध्ये नसून ती भाषा आहे. असे असूनही उत्तरदात्यांच्या कागदपत्रांवर जातीच्या रकान्यामध्ये तेलगु जात म्हणून नोंद झालेली दिसून येते.

## ४४. मादिगा कुटुंबातील सदस्यांकडे मूळ जातीची नोंद असणारी प्रमाणपत्रे दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ४४


| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जात प्रमाणपत्र | ३९ | ७.०१ |
| २ | जात पडताळणी प्रमाणपत्र | ० | ०.०० |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला | ६३ | ११.३३ |
| ४ | शासकीय नोकरीतील कागदपत्र | १ | ०.१८ |
| ५ | गाव १४ चा नमुना | ० | ०.०० |
| ६ | ७/१२ उतारा | १ | ०.१८ |
| ७ | निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद | ० | ०० |
| ९ | कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. | ४९१ | ८८.३१ |

मादिगा समाजातील लोकांकडे जात नमूद असलेली कागदपत्रांची पाहणी केली असता मूळ जात नमूद असलेली कागदपत्रांचे प्रकार व त्यांची आकडेवारी वरील तक्त्यानुसार मांडण्यात आली आहे.

एकूण ५५६ उत्तरदात्या कुटुंबामधील ३९ (७.०१%) कुटुंबियांकडेच मादिगा जातीचे दाखले आहेत परंतु जातीची पडताळणी होऊन जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केलेल्यांची संख्या शून्य (०% ) आहे.

तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यावर मादिगा जात नमूद असल्याचे ६३ (११.३३%) उत्तरदाते सांगतात. शासकीय नोकरीतील कागदपत्रावर आणि ७/१२ उतारा वर मादिगा जातीचा उल्लेख असणारे केवळ १ (०.१८%) उत्तरदाते आहेत. त्यासोबतच गाव १४ चा नमुना आणि निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद) मादिगा असणारे उत्तरदाते ० (०%) आहेत. मादिगा जातीची नोंद असणारी कोणतीच कागदपत्रे आपल्याकडे नसल्याचे ४९१ कुटुंबाचे म्हणणे आहे.

वरील विश्लेषणावरून असे दिसते कि, बहुतांश कुटुंबाकडे ते मादिगा समाजाचे असल्याचे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत. समाजातील शिक्षित लोकांकडे किमान शिक्षणामुळे शाळा सोडल्याचे दाखले उपलब्ध असून काहींनी जातीचे दाखले देखील काढले आहेत. परंतु अशा कुटुंबाचे प्रमाण अगदी कमी आहे.



**४५. जातीचे दाखले उपलब्ध असल्याबाबत आकडेवारी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ४५

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | एकूण उपलब्ध जातीचे दाखले | ५४० | १८.८६ |
| २ | एकूण उपलब्ध जात पडताळणी प्रमाणपत्र | १७ | ०.५९ |

एकूण लोकसंख्येपैकी केवळ ४८८ (१७.०५%) लोकांकडे उत्तरदात्यांकडे जातीचे दाखले आहेत. यामध्ये मादिगा जातीसोबतच इतर चुकीच्या लागलेल्या जातींचे दाखले देखील समाविष्ठ आहेत. तर केवळ १७ (०.५९%) लोकांकडेच जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध असून त्याचे प्रमाण एक टक्क्यापेक्षा कमी असल्याचे पाहायला मिळते.

सदर संशोधन अभ्यासादरम्यान एकूण उत्तरदात्या कुटुंबांपैकी केवळ ८५ कुटुंबे अशी आहेत जे स्वतःमादिगा जातीचे असल्याचे सांगतात. त्यापैकी केवळ ३९ कुटुंबांमधील ५९ जणांकडे जातीचे दाखले आहेत तर इतर कुटुंबाकडे जातीचे दाखले नाहीत.

**४६. मादिगा कुटुंबामध्ये प्रमाणपत्रांवर इतर जातीच्या झालेल्या (चुकीच्या) नोंदी दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ४६

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जात प्रमाणपत्र | २१४ | ३८.४९ |
| २ | जात पडताळणी प्रमाणपत्र | ११ | १.९८ |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला | ३८४ | ६९.०६ |
| ४ | शासकीय नोकरीतील कागदपत्र | १० | १.८० |
| ५ | गाव १४ चा नमुना | ० | ०.०० |
| ६ | ७/१२ उतारा | ० | ०.०० |
| ७ | निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद | १३ | २.३४ |
| ८ | कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. | १०० | १७.९९ |

स्वतःला मुळचे मादिगा आहे असे म्हणणाऱ्या समाजाकडेअसणाऱ्या जातीशी संबंधित प्रमाणपत्रावर त्यांच्या मुळ मादिगा जातीएवजी इतर जातीची नोंद झालेली आहे जी पूर्णतः चुकीची आहे. च्या अनुषंगाने याबाबत माहिती घेण्यासाठी चुकीच्या नोंदी झालेल्या कोणकोणते प्रमाणपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध आहेत याबाबतची माहिती घेतली

शाळा सोडल्याच्या दाखल्यावर मादिगा ऐवजी इतर जातीचा नमूद असणारे ३८४ (६९.०६%) सर्वाधिक उत्तरदाते आहेत. जात प्रमाणपत्रावर मादिगा इतर जातीचा उल्लेख असणारी २१४ (३८.४९%) उत्तरदात्यांकडे जात प्रमाणपत्रे आहेत, शासकीय नोकरीतील कागदपत्र १०(१.८०%), आणि निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद) १३(२.३४%), जात पडताळणी प्रमाणपत्र ११ (१.९८%) उत्तरदाते आहेत. , गाव १४ चा नमुना व ७/१२ उतारा वर इतर जातीचा जातीचा उल्लेख असणारे उत्तरदाते ० (०%) आहेत.

## ४७. मादिगा समाजाच्या जातीच्या संदर्भात झालेल्या चुकीच्या नोंदी ची कारणे दर्शविणारी सारणी

सारणी क्र.४७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अशिक्षित पालक | ३५६ | ६४.०३ |
| २ | शाळेत नाव टाकताना शाळेतल्या अधिकाऱ्यांनी त्यांना समजेल ती जात लिहिली. | ८६ | १५.४७ |
| ३ | आमच्या मूळ जातीला महाराष्ट्रात मान्यता नाही म्हणून आम्ही येथील जात लावली | ७३ | १३.१३ |
| ४ | आमच्या व्यवसायावरून आमची जात लागली आहे. | १५ | २.७० |
| ५ | मुळ जातीची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने | ६ | १.०८ |
| ६ | माहित नाही | १०७ | १९.२४ |

मादिगा समाजातील अनेकांच्या जातीच्या कागदोपत्री चुकीच्या नोंदी झाल्या आहेत, हे पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होते. चुकीच्या नोंदी होण्यामागील कारणे व आकडेवारीनुसार पुढीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहेत. पालक अशिक्षित असल्यामुळे मुलांच्या शाळा प्रवेशाच्या वेळी किंवा इतर ठिकाणी जात नमूद करताना योग्य जात न सांगितल्याने जातीची चुकीच्या नोंदी झाल्या आहेत, असे सांगणाऱ्याचे प्रमाण ३५६ (६४.०३%) असून शाळेमध्ये प्रवेश घेताना मरती भाषा वागत नसल्याने तेलगु भाषेमधून होत असलेल्या संभाषणामुळे, चुकीच्या उच्चारामुळे शाळेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या आकलनाप्रमाणे जातींची नोंद केली किंवा तेलगु भाषा बोलतात म्हणू तेलगु हीच जात लिहिली असे म्हणणाऱ्याचें प्रमाण ८६ (१५.४७%) इतके आहे.

मादिगा समाज हा आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटका राज्यांमधून स्थलांतर झाल्यानंतर आमच्याकडे आम्ही मादिगा असल्याचे मुळ राज्यातील पुरावे असतानादेखील अनेक वर्षे

महाराष्ट्रामध्ये रहिवास असतानाही केवळ येथील रहिवासाचे पुरावे नसल्याने आमच्या मूळ राज्यातील जातीच्या प्रमाणपत्राला येथे मान्यता नसल्याचे ७३ (१३.१३%) उत्तरदाते म्हणतात.

मादिगा समाज पूर्वी कातडीकाम करत, कातडीपासून चपला, बूट इत्यादी साहित्य बनवीत असत त्यामुळे त्यांची नोंद चांभार, मोची, हरिजन मोची अशी झाली त्याचबरोबर सफाई कामामुळे भंगी, वाल्मिकी, बाल्मिकी अशा जातींची देखील नोंद झाली. याशिवाय हलगी वाजविणे, दलितांमध्ये मोडत असल्याने त्यांच्या कागदपत्रांमध्ये विविध जातींची चुकीच्या पद्धतीने नोंद झाल्याचे दिसते. असे सांगणार्यांचे प्रमाण १५ (२.७०%) इतके आहे. मूळ जातीची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने कोणत्याही प्रकारचे पुरावे सादर करता येत नाहीत. त्यामुळे इतर जातींचे दाखले काढले आहेत, त्याकरिता ज्या नातेवाईकांची जात चुकीची लागली आहे त्यांचे पुरावे जोडले आहेत असे सांगणाऱ्याचें प्रमाण ६ (१.०८) इतके आहे.

### ४८. नातेवाईकांकडे असणारे प्रमाणपत्रे दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ४८

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १५ | २.७० |
| २ | नाही | ५४१ | ९७.३० |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |


उत्तरदात्या कुटुंबियांच्या नातेवाईकांकडे मादिगा समाजाचा उल्लेख असणारी कागदपत्रे असण्याबाबत माहिती घेतली असता ५४१ (९७.३०%) उत्तरदात्यांनी त्यांच्या नातेवाईकांकडे दाखले नसल्याबाबतचे नमूद केले आहे तर दाखले आहेत असे सांगणारे उत्तर दाते केवळ १५ (२.७०%) आहेत. यावरून असे दिसते कि, मादिगा समाजातील बहुतांश लोकांकडे ते मादिगा असल्याबाबत पुरावे उपलब्ध नाहीत.

## ४९. मादिगा समाजाच्या जातीच्या संदर्भातील चुकीच्या नोंदीमुळे या समाजास येणाऱ्या अडचणी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ४९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जातीचे दाखले मिळत नाहीत. | ४१७ | ७५.०० |
| २ | जात पडताळणी दाखला मिळत नाही. | ४३१ | ७७.५२ |
| ३ | कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. | ३७६ | ६७.६३ |
| ४ | समाजाची प्रगती खुंटते. | १६६ | २९.८६ |
| ५ | शासकीय नोकरी मिळत नाही | ४ | ०.७२ |
| ६ | लागू नाही | ३२ | ५.७६ |

आलेख क्र. १७




मादिगा समाजातील लोकांच्या शाळेचे दाखले किंवा इतर कागदपत्रांवर झालेल्या चुकीच्या नोंदीमुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. एकाच कुटुंबातील व्यक्तींना विविध जातींचे दाखले मिळाले आहेत किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यावर देखील वेगवेगळी जात नमूद आहे. त्यामुळे मादगी किंवा

चुकीची नोंद झालेल्या कोणत्याही जातीचे दाखले मिळत नाही असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ४१७ (७५.००%) असून सर्वाधिक लोकांचे हे मत आहे यासोबतच जात पडताळणी दाखला मिळत नाही असे मत असणारे ४३१ (७७.५२%) उत्तरदाते आहेत.

कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही असे मत असलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण ३७६ (६७.६३%), इतके आहे तर चुकीच्या नोंदीमुळे एकंदरीत समाजाची प्रगती खुंटते असे सांगणाऱ्याची संख्या १६६ (२९.८६%) आहे. त्याचबरोबर शासकीय नोकरी मिळत नाही असे उत्तर देणाऱ्यांचे परमन केवळ ४ (०.७२) इतके आहेत.

## ५०. सन १९५० पूर्वीचा पुरावा असण्याबाबतची आकडेवारी दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९ | ३.४२ |
| २ | नाही | ५३७ | ९६.५८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

जातीचा दाखला काढण्यासाठी किंवा जात पडताळणीसाठी १९५० पूर्वीचे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याचे पुरावे सादर करावे लागतात, अन्यथा सदर जातीचा दाखला किंवा पडताळणी मिळत नाही. जात प्रमाणपत्र किंवा जात पडताळणीचे दाखले शासकीय नोकरी, शिक्षणामध्ये सवलती, योजनांचा लाभ घेण्याकरिता अत्यंतसाठी शासनास आदर करावे लागतात. परंतु १९५० सालच्या पूर्वीचा कोणताही पुरावा नाही, असे सांगणारे उत्तरदाते सर्वात अधिक म्हणजे ५५६ पैकी ५३७ (९६.५८%) इतके आहेत तर पुरावे आहेत असे म्हणणारे उत्तर दाते १९ (३.४२%) इतके आहे.

## ५१. सन १९५० सालापुर्वीचे जातीचे दाखले उपलब्धता व त्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५१

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जात प्रमाणपत्र | ० | ०.०० |
| २ | जात पडताळणी प्रमाणपत्र | ० | ०.०० |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला | १८ | ९४.७४ |
| ४ | शासकीय नोकरीतील कागदपत्र | ० | ० |
| ५ | गाव १४ चा नमुना | ० | ० |
| ६ | ७/१२ उतारा | १ | ५.२६ |
| ७ | निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद | ० | ० |
| | एकूण | १९ | १०० |

वरील सारणी क्र. ५० नुसार १९५० पूर्वीचा पुरावा आहे असे म्हणणारे उत्तरदात्यांची संख्या केवळ १९ आहेत असून त्यापैकी १८ उत्तरदात्यांकडे केवळ शाळा सोडल्याचा दाखला आहे. तर १ (५.२६) उत्तरदात्याकडे त्यांच्याकडे असलेल्या जमिनीचा ७/१२ उतारा आहे. इतर जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, शासकीय नोकरीतील कागदपत्र, गाव १४ चा नमुना, निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा (शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद यावरील नोंदी या १९५० पूर्वीच्या नाहीत किंवा हे पुरावेच उत्तर्दात्यांकडे नाहीत.

म्हणजेच जवळ जवळ सर्वच उत्तरदात्यांकडे जातीचा दाखला मिळण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक असणारी कागदपत्रे नाहीत हे स्पष्ट होते

## ५२. सन १९५० पूर्वीचा पुरावा उपलब्ध नसल्याची कारणे दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५२

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पिढीजात शिक्षणाचा अभाव | ३७३ | ६७.०९ |
| २ | पालक जागृत नव्हते | ८० | १४.३९ |
| ३ | स्थलांतर झाल्यामुळे | १४६ | २६.२६ |
| ४ | गरिबीमुळे, घर, शेतजमीन नसल्याने कागदपत्र जपून ठेवता आली नाही. | १२५ | २२.४८ |
| ५ | नैसर्गिक आपत्ती व अपघातामुळे नष्ट झाले | ८ | १.४४ |

वरील सारणी क्र. ५० नुसार बहुतांश उत्तरदात्यांकडे १९५० पूर्वीचे कागदपत्रे नाहीत हे स्पष्ट झाले असून पुरावे नसण्याची मुख्य कारणीमीमांसा करताना अनेक कारणे समोर आली आहेत. मादिगा समाजातील लोकं पिढ्यानपिढ्या शाळेत गेलीच नाहीत. शाळेत प्रवेश घेतलाच नसल्याने शाळा प्रवेशाचा निर्गम उतारा किंवा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नाही. पिढीजात शिक्षणाचा अभाव असल्याने कागदपत्रे तयार झाली नाहीत, असे मत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ३७३

(६७.०९%) इतके आहे. त्याचबरोबर कागदपत्र, जातीची दाखले, त्यांचा लाभ घेणे याबाबत पालकांमध्ये जागृती नसल्याने त्यांनी कागदपत्रे जपून ठेवली नाही असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण ८० (१४.३९%) इतके आहे. समाजातील बहुतांश जनता स्थलांतरित असल्याने स्थलांतर करताना अनेक कागदपत्रे गहाळ झाली किंवा सांभाळून ठेवता आली नाहीत त्यामुळे त्यांची उपलब्धतता नाही असे सांगणारे १४६ (२६.२६%) इतके आहेत. गरिबीमुळे, घर, शेतजमीन नसल्याने कागदपत्र नाहीत असे सांगणारे उत्तर दाते १२५ (२२.४८%) इतके आहेत. याशिवाय नैसर्गिक आपत्ती किंवा अपघातामुळे त्यांची कागदपत्रे नष्ट झाल्याचे ८ (१.४४%) मत आहे.

**सारांश**

वरील जाती संदर्भात निदर्शनास आलेल्या सर्व सारण्यावरून लक्षात येते कि, स्थलांतर आणि शिक्षणाचा अभाव यांमुळे हा समाज अतिशय दबलेल्या आणि मागासलेल्या स्थितीमध्ये रहात आहे. शैक्षणिक स्थिती पाहता, आजदेखील या समाजामध्ये शिक्षणाचे महत्व असल्याचे दिसून येत नाही, तर वर्ष १९५० साल किंवा किंवा त्यापूर्वीची शैक्षणिक परिस्थिती अत्यंत दयनीय असू शकते याबाबत शंका नाही. शेतजमीन, स्वतःची घरे, मालमता, उद्योग व्यवसाय अशा कोणत्याही बाबतीत मादिगा समाज आजही सक्षम नसल्याने ५-६ दशकांपूर्वीची परिस्थिती याहूपेक्षा बिकट असल्याचे दिसते. अशा परिस्थितीमध्ये जातीच्या संदर्भात आवश्यक असणारे कोणतेच पुरावे देऊ शकत नाही किंवा अशा प्रकारचे पुरावे त्यांचेकडे उपलब्ध नाहीत.

शासनाने अनुसुचीत जातीच्या विकासासाठी अनेक उपयोजना, शैक्षणिक आरक्षण, नोकरीमध्ये आरक्षण , इतर अनेक योजना सर्व राबविण्यात येत आहे, परंतु कागदपत्रांच्या अभावी हा समाज या कोणत्याही गोष्टीचा लाभ तर घेता येत नाही, परंतु दुसऱ्या शहरात जाऊन आपली ओळख हरवून बसल्याप्रमाणे खिन्नावस्था या समाजाची आहे.

## **५३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा – १९८९ बाबत माहिती असणाऱ्यांचे मादिगा समाजातील कुटुंबाचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ५३

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१ | ७.३७ |
| २ | नाही | ५१५ | ९२.६३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत मादिगा समाजामध्ये असलेली जागृतीबाबत आकडेवारी दर्शविणारी आहे. यानुसार ५५६ पैकी ५१५(९२.६३%) उत्तरदात्यांना याबाबत काहीही माहिती नाही. तर या कायद्याबाबत माहिती आहे असे सांगणारे केवळ ४१ (७.३७%) आहे.

यावरून असे स्पष्ट होते कि, समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अतिशय अल्प असून हा समाज इतर समाजामध्ये फार कमी प्रमाणात मिसळतो, त्यामुळे सामाजिकी करणामधून मिळणारे ज्ञान व दृष्टीकोन याचा देखील येथे विकास झालेला दिसून येत नाही.

## ५४. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा — १९८९ या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५४

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ० | ०.०० |
| २ | नाही | ४१ | ७.३७ |
| ३ | लागू नाही | ५१५ | ९२.६३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १००.०० |

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हे नोदाविण्याचे प्रमाण दर्शविणारी हि सारणी आहे. **सारणी क्र. ५३** नुसार कायदा माहित नसलेल्यांचे प्रमाण ५१५ (९२.६३%) इतके असून कायदा माहित नसल्याने त्यानी त्याचा वापर केला नाही. परंतु ४१ (७.३७%) उत्तरदत्यांनाच कादा माहित असूनही त्यांनी गुन्हा नसल्याचे सांगितले.

## ५५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा – १९८९ या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करण्याची कारणे व प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गुन्हा दाखल करण्याची वेळ आली नाहीं | ९१ | १६.३७ |
| २ | आम्हाला कायदा माहितीच नाही | ३८१ | ६८.५३ |
| ३ | शिक्षणाचा अभाव | ६६ | ११.८७ |
| ४ | कोणीही माहिती दिली नाही. | २५ | ४.५० |

**सारणी क्र. ५३** नुसार कायदा माहित असलेल्यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते परंतु, ज्यांना कायदा माहीत आहे त्यांनी देखील या कायद्याचा वापर केल नाही असे असताना त्यामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत,

एकूण उत्तरदात्यांपैकी ९१ (१६.३७%) उत्तरदात्यांच्या मते गुन्हा दाखल करण्यासारखी घटना घडलेली नाही. तर उर्वरित उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. अट्रोसिटी कायद्याच्या अंतर्गत गुन्हा का नोंदविला नाही याचे पर्याय व प्रमाण दर्शविणारी सारणी आहे. यामध्ये कायाद्याची माहिती नसणे, शिक्षणाचा अभाव आणि या कायद्याबाबत कोणीही माहिती दिली नाही असे एक समान अर्थाने असणारे पर्याय निवडणारे उत्तरदाते अनुक्रमे ३८१ (६८.५३%), ६६(११.८७%), २५(४.५०%) इतके आहे, तर

वास्तविक एकूण उत्तरदात्यांच्या ५१५ (९२.६३%) उत्तरदात्यांना या कायद्याबाबत माहिती नाही असे आकडेवारीवरून समजते, परंतु चर्चा करताना असे निरीक्षणास आले कि, हा समाज शैक्षणिकदृष्ट्या अतिशय मागास असल्याने त्यांना अनुसूचित जाती म्हणजे काय? आपला समाज अनुसूचित जातीमध्ये मोडतो कि नाही ? हे देखील माहिती नाही. मादिगा समाज अनुसूचित जाती मध्ये येतो या बाबत समाज अनभिज्ञ आहे.

**मादिगा समाज मुळचा आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यामधून महाराष्ट्र राज्यामध्ये स्थलांतरित झाला आहे. साधारण १९२० -३० पासून किंवा त्यापेक्षाही आधीपासून अगदी अलीकडच्या काळामध्ये देखील स्थलांतर झाल्याचे दिसते. आज महाराष्ट्रातील को समाज स्वत:ला मादिगा म्हणवून घेत आहे, तो समाज आणि कर्नाटक, आंध्रप्रदेश किंवा कर्नाटकमधील मादिगा समाज यांच्यामधील साम्य, भिन्नता किंवा समान गुणधर्मांचा अभ्यास संशोधन अभ्यासामध्ये करण्यात आली आहे. या अनुषंगाने खालील सारण्यामध्ये रक्तसंबंध, नातेसंबध, रोटी- बेटी व्यवहार अशा निर्देशांकांचा आधारे माहिती मिळण्यासाठी वापर करण्यात आला आहे.**

**५६. आंध्रप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक राज्यातील मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाज यांच्यातील समानतेबाबत मत व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

**सारणी क्र. ५६**

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ५२७ | ९४.७८ |
| २ | नाही | ६ | १.०८ |
| ३ | सांगता येत नाही | २३ | ४.१४ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी हि आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यामध्ये असणारा मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाज यांच्यात समानता आहे का याचे आकडेवारी दर्शविणारा आहे. ५५६ पैकी ५२७ (९४.७८%) उत्तरदात्यांनी समानता असल्याबाबत नमूद केले आहे तर समानता नाही असे सांगणारे केवळ ६ (१.०८%) इतके आहे, या बाबत माहिती सांगू न शकणारे उत्तर दाते २३ (४.१४%) इतके आहेत.

सर्वात अधिक उत्तर्दात्यांनी समानता असल्याचे सांगितले. महाराष्ट्र व कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यामधील मादिगा समाज एकच असून त्यांच्यात समानता असल्याचे दिसते. म्हणजेच

तेथील समाज मादिगा असेल तर तीच जात येथे अस्तित्वात असलेल्या समाजास देखील लागू असणे आवश्यक आहे परंतु येथील मादिगा समजास चांभार, मोची, हरिजन अशा अनेक जाती लागल्या आहेत. ज्यामुळे त्यांचे मूळ अस्तित्व किंवा ओळख पुसली जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

यावरून असे स्पष्ट होते कि, ज्या उत्तरदात्यांनी नाही किंवा माहिती नाही असे पर्याय निवडले आहेत त्यापैकी बहुतांश लोकांचा जन्म महाराष्ट्रातील असून कुटुंबामध्ये गावासंबधित माहिती असणारे किंवा ज्येष्ठ व्यक्ती नसल्याचे निरीक्षणामध्ये दिसून आले.

महाराष्ट्र व कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यामधील मादिगा समाज एकसारखा आहेत किंवा नाहीत? याचा शोध घेण्यासाठी, गुणात्मक स्वरूपात माहिती संकलित केली असताना, अधिकतर उत्तरदात्यांनी समानता असलेल्या बाबी पुढीलप्रमाणे नमूद केल्या आहेत.

आंध्रप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक  राज्यामध्ये असणारा मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाज यांची आडनावे एक आहे, भाषा एक आहे, रूढी परंपरा, धार्मिक विधी एक आहेत, चालीरीती समान आहेत, महाराष्ट्रातील मादिगा समाजाचे लोक या राज्यांमधील त्यांच्या गावी जत्रा यात्रा करण्यास जातात, त्याची आहार पद्धती एक आहे, कुल- दैवत सारखे आहेत, या राज्यांमधील मादिगा समाजाचे परस्परांमध्ये रोटी बेटी व्यवहार होतात. या सर्व मानववंश शास्त्रीय माहितीचे निर्देशक यांच्यामध्ये समानता असल्याचे दिसून येते.

**५७. महाराष्ट्र राज्यातील मादिगा समाजाचे आंध्रप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक राज्यामध्ये असणारे नातेवाईक व रक्त संबंधीय असण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ५७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५११ | ९१.९१ |
| २ | नाही | ४५ | ८.०९ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते कि, एकूण ५५६ उत्तरदात्यांपैकी ५११ (९१.९१%) उत्तरदात्यांचे आंध्रप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक राज्यांमध्ये मादिगा समाजाचे नातेवाईक व रक्त संबंधीय आहेत, ४५ (८.०९) उत्तरदात्यांचे नातेवाईक किंवा रक्त संबंधीय नाहीत.

यावरून असे स्पष्ट होते कि आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाज हा एकच आहेत.

## ५८. रोटी बेटी व्यवहार होत असल्याबाबत मते व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५८

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५२४ | ९४.२४ |
| २ | नाही | ० | ० |
| ३ | माहिती नाही | ३२ | ५.७६ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते कि, महाराष्ट्र राज्यातील मादिगा समाजाचे आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यामध्ये रोटी बेटी व्यवहार होत असल्याबाबतची माहिती या आकडेवारीमधून प्राप्त होते. दोन्ही राज्यांमध्ये रहिवास करणाऱ्या मादिगा समाजामध्ये रोटी बेटी व्यवहार होत असल्याचे ५२४ (९४.२४%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ३२(५.७६%) उत्तरदात्यांनी रोटी बेटी होतात किंवा नाही होत याबाबत माहिती नसल्याचे सांगतले.

## ५९. जातपंचायत संबंधी माहिती दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ५९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८९ | ७०.० |
| २ | नाही | १६७ | ३०.० |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |


वरील सारणी मादिगा समाजामध्ये जात पंचायतची स्थिती दर्शविणारी आहे. पूर्वीच्या काळामध्ये अस्तित्वात असलेल्या जातपंचायतीचे अस्तित्व लोप पावत असले तरी समाजावर नियंत्रण आणि समाजाची ओळख निर्माण करण्यामध्ये जात पंचायतीची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. मादिगा समाजामध्ये पूर्वी जात पंचायत होती असे सांगणारे उत्तरदाते ५५६ कुटुंबांपैकी ३८९ (७०.०) आहेत, तर जातपंचायत चे पूर्वी अस्तित्व नव्हते असे सांगणारे १६७ (३०.०%) आहे.

**६०. जातपंचायती अंतर्गत न्यायनिवाडा करण्यास घेतले जाणारे विषय दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६०

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | कौटुंबिक तंटा | ३६५ | ६५.६ |
| २ | इतर तंटा निवारण | ३४३ | ६१.७ |
| ३ | विवाह संबधित | ३०९ | ५५.६ |
| ४ | स्त्रियांवरील अत्याचार | १७५ | ३१.५ |
| ५ | इतर | १३ | २.३ |

आलेख क्र. १८




वरील प्रश्नांची उत्तरे देताना उत्तरदात्यांनी बहुपर्याय निवडलेले आहेत. वरील सारणीनुसार स्पष्ट होणाऱ्या आकडेवारीनुसार कौटुंबिक तंटा, इतर तंटा निवारण, विवाह संबधित समस्या जात पंचायत मार्फत सोडविल्या जात असत. पंचायतीमार्फत कौटुंबिक तंटा, इतर भांडण - तंटा निवारण, विवाह संबधित समस्या सोडविल्या जातात असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अनुक्रमे ३६५ (६५.६%), ३४३ (६१.७%), ३०९ (५५.६%) असून स्त्रियांवरील अत्याचाराबाबत वाद विवाद सोडविण्यासाठी जात पंचायतीचा फायदा होत असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण केवळ १७५(३१.५%) इतके आहे.

**६१. जातपंचायतीची अपराधी बाबत घेतल्या जाणाऱ्या भूमिकांचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६१

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वाळीत टाकणे | ४२ | ७.५५ |
| २ | दंड | १६८ | ३०.२२ |
| ३ | दंड व वाळीत टाकणे दोन्ही | ४५ | ८.०९ |
| ४ | शारीरिक शिक्षा | १० | १.८० |
| ५ | माहित नाही | ३४ | ६.१२ |
| ६ | समज देणे, समजावून सांगणे. | ३०७ | ५५.२२ |

वरील सारणी जातपंचायतीमार्फत देण्यात येणाऱ्या शिक्षेचा प्रकार दर्शविणारी असून जातपंचायतीकडे निर्णयासाठी आलेल्या प्रकरणात संबंधितांना समजावून सांगून प्रकरण सामपोचाराने सोडविण्याचे प्रमाण सर्वात जास्त असून ५५६ उत्तरदात्यांपैकी ३०७ (५५.२२%) उत्तरदात्यांचे असे म्हणणे आहे. रकमेच्या स्वरूपात अथवा वस्तूच्या स्वरूपात दंड देण्यात येते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १६८ (३०.२२%) असून शिक्षा म्हणून वाळीत टाकण्याची शिक्षा देतात असे म्हणणारे उत्तरदाते ४२ (७.५५%) इतके आहेत. शिक्षा म्हणून दंड आणि वाळीत टाकणे अशा दोन्ही प्रकारचे शिक्षा दिली जाते असे म्हणणारे उत्तरदाते ४५ (८.०९%) असून गुन्ह्यासाठी शारीरिक शिक्षा दिली जाते असे म्हणणारे उत्तरदाते केवळ १० (१.८०%) इतके आहेत.

यावरून असे दिसून येते कि, जात पंचायत अस्तित्वात होती त्याकाळामध्ये जातपंचायत आपसात होणारी भांडणे, तंटे, किंवा इतर वाद विवाद सोडविण्यासाठी मध्यस्थी करत असे. वाद विवादांचा निकाल लावून न्याय देत असत.

**सदर संशोधन अभ्यासाच्या पूर्व पाहणी मध्ये सदरचा समाज आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे आढळून येते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पुरुषांसोबत महिलादेखील अर्थार्जन करताना दिसून येते. या अनुषंगाने समाजातील महिलांची स्थितीबाबत अभ्यास करण्यासाठी विविध निर्देशकांचा वापर करण्यात आला असून पुढील सारण्यामध्ये त्यांची मांडणी केली आहे.**

**६२.महिलांचे अर्थार्जन करण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६२

| **अनु.क्र.** | **पर्याय** | **उत्तरादात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | २३५ | ४२.२७ |
| २ | नाही | ३२१ | ५७.७३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणी हि कुटुंबातील महिला अर्थार्जनासाठी काम करते का हे दर्शविणारी आहे. या आकडेवारीनुसार ५५६ कुटुंबापैकी ३२१ (५७.७३%) महिला अर्थार्जनासाठी काम करीत नाहीत.

संशोधकांच्या निरीक्षणामध्ये दिसून येते कि, मादिगा समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून कुटुंबातील अर्थार्जन करण्याची जबाबदारी पुरुषांवर आहे. त्याचबरोबर महिलांचे अर्थार्जानामध्ये कमी प्रमाण कारणे म्हणजे कमी वयाच्या, नवीन लग्न झालेल्या मुलींचे जास्त प्रमाण किंवा कुटुंबातील महिलेचे स्थान अशी आहेत. त्याचबरोबर घराची आणि लहान मुलांची जबाबदारी महिलांवर असल्याने त्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

तसेच ५५६ कुटुंबापैकी २३५(४२.२७%) कुटुंबातील महिला उदरनिर्वाहासाठी काम करतात, निरीक्षणामध्ये निदर्शनास आल्यानुसार जवळपास बहुतांश महिला धुणी- भांडी किंवा सफाई कर्मचारी म्हणून काम करत असून त्यातून मिळणारे उत्पन्न हे फारसे समाधानकारक नाही.

### ६३. महिलांच्या अर्थार्जना मागील कारणे व त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ६३

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंब प्रमुख असल्याने | ६९ | १२.४१ |
| २ | घर खर्चास हातभार | १७७ | ३१.८३ |
| ३ | आर्थिक परिस्थिती | ९५ | १७.०९ |
| ४ | शिक्षणासाठी | ४ | ०.७२ |
| ५ | लागू नाही | ३२१ | ५७.७३ |


वरील सारणी महिलांचे अर्थार्जनाची कारणे दर्शविणारी आहे. ५६६ उत्तरदात्याकुटुंबांपैकी ३२१ (५७.७३%) कुटुंबातील महिला कोणत्याही स्वरूपाचे अर्थार्जन करीत नाही, तर अर्थार्जन करीत असलेल्या महिलांपैकी आर्थिक परिस्थिती आणि घर खर्चास हातभार म्हणून अर्थार्जन करणाऱ्या महिलांची आकडेवारी अनुक्रमे १७७ (३१.८३%) व ९५ (१७.०९%) इतकी आहे. त्याखालोखाल कुटुंब प्रमुख किंवा कुटुंबामध्ये करता पुरुष नसल्यामुळे अर्थार्जनाची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी काम करणाऱ्या महिलांची आकडेवारी ६९ (१२.४१%) इतकी आहे. मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक पैशाची गरज भागविण्यासाठी अर्थार्जन करणाऱ्या महिलांची संख्या सर्वात कमी म्हणजे केवळ ४ (०.७२%) इतकी आहे. शिक्षणासाठी प्राधान्यक्रम कमी असल्याचे दिसून येते.

**६४. महिलांच्या नावावर असलेल्या संपत्तीचे प्रकार व प्रमाण दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६४

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घर | ३६ | ६.४७ |
| २ | जमीन | २ | ०.३६ |
| ३ | बँकेतील ठेवी | ३ | ०.५४ |
| ४ | महिलांच्या नावावर संपती नही | ५१५ | ९२.६३ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

आलेख क्र. १९




वरील सारणीनुसार ५५६ उत्तरदात्यांच्या मते ५१५ कुटुंबातील महिलांच्या नावावर कोणतीही संपत्ती नसून केवळ ४१ महिलांच्या नावावर संपत्ती आहे. त्यामध्ये ३६ (६.४७%) महिलांच्या नावावर घर आहे. जमीन नावावर असणाऱ्या महिलांचे प्रमाण २ (०.३६%), बँकेतील ठेवी नावावर असणाऱ्या महिलांचे प्रमाण ३ (०.५४%) आहे.

निरीक्षणामध्ये नोंदविल्याप्रमाणे, ज्या महिलांनी शासकीय नोकरीमध्ये असताना घरासाठी कर्ज काढले आहे अशाच महिलांच्या नावावर संपत्ती म्हणजे घर आहे किंवा पतीच्या निधनानंतर वारसदार म्हणून महिलेच्या नावावर घर असल्याचे दिसून आले आहे. या व्यतिरिक्त महिलांच्या नावावर घरासारखी मोठी संपती असल्याचे दिसून येत नाही.

**६५. महिलांचे बाळंत होण्याचे ठिकाण त्यांचे प्रमाणासह दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६५

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरकारी दवाखाना | ५१३ | ९२.२७ |
| २ | खाजगी दवाखाना | १०४ | १८.७१ |
| ३ | घरी | १७८ | ३२.०१ |

वरील सारणी मादिगा समाजातील महिलांची बाळंतपण होण्याची ठिकाणे त्यांच्या प्रमाणासह दर्शवते. या प्रश्नाचे उत्तर देताना असे दिसून येते कि, उत्तरदात्यांनी बहुपर्याय निवडले असून एकूण ५५६ कुटुंबांपैकी ५१३ (९२.२७%) कुटुंबातील महिलांचे बाळंतपण खाजगी दवाखान्यात झाले आहे तसेच ५५६ कुटुंबांपैकी १७८ ३ (३२.०१%) कुटुंबातील महिलांचे बाळंतपण घरीच झाले आहे.

खाजगी दवाखान्यामध्ये बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण १०४ (१८.७१%) इतके असून घरी बाळंतपण झालेल्या तसेच सरकारी दवाखान्यात बाळंतपण झालेल्या महिलांच्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

सर्व्हेक्षणादरम्यान करण्यात आलेल्या निरीक्षणामध्ये असे निदर्शनास आले आहे कि, घरी बाळंतपण झाले असल्याचे सांगणाऱ्या महिलांचे वय ५० -६० पेक्षा जास्त असून सध्याच्या काळात होणारी बहुतांश बाळंतपण दवाखान्यात केली जातात. समाजाची एकंदरीत आर्थिक परिस्थिती पाहता खाजगी दवाखान्यामध्ये बाळंतपण करणे खिशाला परवडणारे नसते, त्यामुळे सरकारी दवाखान्याचा पर्याय निवडला जातो. आपत्कालीत परिस्थितीमध्ये घरीदेखील बाळंतपण होत असून त्याचे प्रमाण अत्यल्प प्रमाणात आहे.

**६६.कुटुंबातील निर्णयप्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग दर्शविणारी सारणी**

सारणी क्र. ६६

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१६ | ९२.८१ |
| २ | नाही | ४० | ७.१९ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणीनुसार असे निदर्शनास येते कि, ५५६ पैकी ५१६ (९२.८१%) महिलांनी त्यांना त्यांच्या कुटुंबामध्ये घेतल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेतले जात असल्याचे सांगितले. मुलांचे शिक्षण, घर- खर्च, मुलामुलींची लग्न अशा महत्वाच्या विषयांमध्ये महिलांसोबत चर्चा केली जाते, त्यांचे मत जाणून घेतले जाते. तर ४० (७.१९%) महिलांच्या मते त्यांना कुटुंबामध्ये घेतल्या जाणाऱ्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात नाही.

### ६७. महिलांना कुटुंबामध्ये मिळणारी वागणूक दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ६७

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | समान | ५३० | ९५.३२ |
| २ | दुय्यम | २६ | ४.६८ |
| | एकूण उत्तरदाते कुटुंब | ५५६ | १०० |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते कि, महिलांना कुटुंबामध्ये समान वागणूक मिळते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्याचे प्रमाण ५३० (९५.३२%) इतके आहे. महिलांना कुटुंबांमध्ये दुय्यम स्थान असल्याचे सांगणारे उत्तरदाते केवळ २६ (४.६८%) इतके आहे. अधिकतर महिलांना कुटुंबामध्ये समानतेचा दर्जा आहे किंवा समान वागणूक मिळते.

सारांश:

मादिगा समाज आर्थिकदृष्ट्या किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे दिसत असले तरी समाजामध्ये महिलांचे स्थान मानाचे आहे, त्यांना समानतेचा दर्जा दिला जातो किंवा त्यांना पुरुषापेक्षा कमी लेखले जात नाही.

महिला सक्षमीकरण अंतर्गत येणाऱ्या मुद्यांसंबधित आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि, कुटुंबांमध्ये महिलांच्या विचारांना व निर्णयाला प्राधान्य दिले जात असून, हि अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. इतर समाजाप्रमाणेच मादिगा समाजातील महिलादेखील कुटुंबाला हातभार लावण्यासाठी अर्थार्जन करतात परंतु हि जबाबदारी पेलताना महिला स्वतःच्या प्रगतीसाठी किंवा चैन करण्यासाठी कमवीत नसून केवळ कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी काम करताना दिसतात. यामध्ये सफाई काम किंवा घरेलू काम अशा पद्धतीचे काम त्यांना करावे लागते. आर्थिक मागासलेपणामुळे कुटुंबामध्ये महिलांच्या शिक्षणास कमी महत्व दिले जात असल्याने पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

समाजाची अवस्था अत्यंत बिकट असून महिलांप्रमाणे पुरुषदेखील सक्षम असल्याचे दिसून येत नाही. महिलांप्रमाणे पुरुषांनाही शिक्षणासंदर्भात जागृती नाही किंवा गांभीर्य नाही असे दिसते. समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना आणि कायद्याची माहिती नसल्याने अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद कमी असल्याचे दिसते.


"शिक्षणाने प्रगती होते" हा विचारच समाजातील लोकांमध्ये नाही. त्यामुळे मादिगा समाजातील सर्व घटकांची  व्यथा सारखीच आहे, म्हणून महिलांना त्यातून वगळून त्यांचा सक्षमीकरणासाठी वेगळे निर्देशक घेवून त्याचे सहसंबंध तपासणे अभ्यासामध्ये तूर्तास बाजूला ठेवणे  योग्य वाटते, कारण सर्वात आधी समजाची बांधणी, संघटन आणिशिक्षणाच्या विचारांचा प्रसार होणे गरजेचे आहे.

## ६८. मादिगा समाजातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ६८

| अंधश्रद्धा प्रकार | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| कुंडली पाहतात का? | ४२८ | ७६.९७% | १२८ | २३.०२% |
| शुभ कार्यापूर्वी मुहूर्त काढतात का ? | ४१० | ७३.७४% | १४६ | २६.२५% |
| पशु बळी देतात का ? | ३७२ | ६६.९१% | १८४ | ३३.०९% |
| नवस करतात का ? | ३४७ | ६२.४१% | २०९ | ३७.५९% |
| देव मानतात का? | ५४३ | ९७.६६% | १३ | २.३४% |
| समाजात देवदासी - मुरळी प्रथा आहे का? | १७ | ३.१% | ५३९ | ९६.९% |

आलेख क्र. २०



वरील सारणीनुसार मादिगा समाजातील कुंडलीवर विश्वास ठेवणाऱ्या उत्तरदात्यांची आकडेवारी पाहता, लग्न कार्य किंवा आयुष्यात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटना यासंबंधी कुंडली पाहून त्यानुसार निर्णय घेणारे ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी ४२८ (७६.९७%) कुटुंबे आहेत तर कुंडली न पाहणाऱ्या उत्तरदात्या कुटुंबांची संख्या १२८ (२३.०२%) आहे. तसेच शुभ कार्य करतेवेळी मुहूर्त पाहून शुभ कार्याची वेळ निच्छित करणाऱ्यांचे प्रमाण देखील ५५६ कुटुंबांपैकी ४१० (७३.७४%) इतके आहे. मुहूर्त न पाहणाऱ्या उत्तरदात्या कुटुंबांची संख्या १४६ (२६.२५%) आहे. यावरून असे निदर्शनास येते कि, कुंडलीवर विश्वास ठेवणाऱ्या तसेच मुहूर्त पाहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून याबाबत अशुभ गोष्टी किंवा घटना टाळण्यासाठी अशा प्रकारच्या अंधश्रद्धेवर विश्वास ठेवला जातो.

वरील सारणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी ३७२ (६६.९१%) कुटुंबे पशुबळी देण्यामध्ये विश्वास ठेवतात, प्रसंगी पशुबळी देतात. नवस, देवाची जत्रा, यात्रा, देव-देवीचा उत्सव किंवा खडतर आयुष्यातून किंवा आजारातून सुटका करून घेण्यासाठी, किंवा देव-देवीला खुश करण्यासाठी असा पशुबळी दिला जातो. आकडेवारी पाहता, मादिगा समाजावर असलेल्या रूढी परंपरेचा पगडा असल्याचे दिसते. पिढ्यापिढ्या चालत आलेल्या रूढी आणि परंपरच्या प्रवाहामध्ये अडकून जत्रा, यात्रा, सण समारंभ अशा धार्मिक रूढी पाळण्यासाठी देव-देवतेसमोर कोंबडे, बकरे अशा प्राण्यांचा बळी देतात. याउलट केवळ १८४ (३३.०९%) कुटुंबे बळी देत नाहीत असे दिसते.

नवस करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ५५६ पैकी ३४७ (६२.४१%) टक्के आहे, याउलट नवस न करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २०९ (३७.५९%) इतकी आहे. देवाकडे आपली इच्छा किंवा अपेक्षा पूर्ण करण्यासाठी साकडे घातले जाते आणि ती इच्छा पूर्ण झाल्यास त्याबदल्यात देवाचा उत्सव करण्याचे किंवा पैशांच्या, दागदागिन्यांच्या, नारळ सारख्या फळांच्या किंवा पशुबळीच्या स्वरुपात भेट चढविण्याचे आश्वासन दिले जाते. नवस करणे हा श्रद्धेचा भाग असला तरी यामध्ये पशुबळी किंवा इतर आत्मक्लेश करून इच्छापूर्तीची परतफेड करण्याने अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यासारखे आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या देवावर विश्वास ठेवतोच. देव आपले नशिब लिहितो, आणि त्याप्रमाणे सर्व होत असते अशी धारणा माणसांमध्ये असते. आपल्या चांगल्या वाईट प्रसंगामध्ये देवच आपली साथ देतो, त्याच्यामुळेच आपले आयुष्य असून आपला उद्धार त्याच्या कृपेनेच होऊ शकतो अशी मनोभावना असल्याने आपले नशीब लिहिणाऱ्या देवावर व्यक्ती विश्वास ठेऊन त्याची पूजा-अर्चा करतात.

वरील सारणी पाहता असे स्पष्ट होते कि, एकूण ५५६ उत्तरदात्या कुटुंबांपैकी ५४३ (९७.६६%) कुटुंबे देवावर विश्वास ठेवतात तर केवळ १३ (२.३४%) कुटुंबे देव मानत नाहीत.

मादिगा समाजामध्ये देवदासी किंवा मुरळी म्हणून मुलांना किंवा मुलींना देवाला सोडण्याची प्रथा नाही, असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे ५३९ (९६.९%) याउलट केवळ १७ (३.१%) उत्तरदात्या कुटुंबांनी मादिगा समाजामध्ये देवदासी किंवा मुरळी प्रथा असल्याचे सांगितले परंतु त्यांचे कुटुंबामधून अशा प्रकारे देवदासी किंवा मुरळी सोडल्याचे दिसून येत नाही. समाजामध्ये देवाला मुल सोडणे किंवा देवदासी असणे म्हणजे समाज फार मोठ्या अंधश्रद्धेमध्ये जगात आहे असे म्हणता येईल. देवदासी किंवा मुरळी या रूढी- परंपरांच्या तळाशी घट्ट रुतलेली असून अशा प्रथांना विरोध करणे किंवा प्रथा नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे फार आव्हानात्मक आहे. मादिगा समाजामध्ये देवदासी मुरळी प्रथा नाही असे दिसून येते.

## ६९. उपवास करण्यामागील कारणे आणि त्यांचे प्रमाण दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ६९

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | इच्छापूर्ती / नवस | १९८ | ३५.६१ |
| २ | निरोगी / बारीक राहण्यासाठी | ४५ | ८.०९ |
| ३ | श्रद्धा | ४०० | ७१.९४ |
| ४ | घरातील इतर करतात म्हणून | १५ | २.७० |
| ५ | इतर | ३ | ०.५४ |
| ६ | उपवास करत नाही. | ७५ | १३.४९ |

वरील सारणीनुसार नमूद आकडेवारी उपवास करणाऱ्या व्यक्ती व उपवास करण्याची कारणे दर्शविणारी आहे. यामध्ये उत्तरदात्यांनी बहुपर्याय निवडलेले दिसून येते. या आकडेवारीनुसार ४०० उत्तरदाते (७१.९४%), श्रद्धा असल्याने उपवास करतात. इच्छापूर्ती / नवस केल्यामुळे उपवास धरणारे उत्तरदाते १९८ (३५.६१%) इतके आहेत तर स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या हेतूने उपवास करणारे उत्तरदाते ४५ (८.०९%) टक्के आहेत.  घरामध्ये इतर जण करतात म्हणून उपवास करणारे, किंवा उपवासाच्या मागे कोणतीही भावना नसणारे उत्तरदाते १५(२.७०%) टक्के आहेत. तर उपवास न करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ७५ (१३.४९%) टक्के आहे.

यावरून असे निदर्शनास येते कि, देवावर असणारी श्रद्धा तसेच देवाकडे एखाद्या गोष्टीसाठी साकडे घातल्यानंतर ती बाब पूर्ण होण्यासाठी उपवास करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वात अधिक आहे.

### ७०. कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यांनातर करण्यात येणारे उपाय दर्शविणारी सारणी

सारणी क्र. ७०

| अनु.क्र. | पर्याय | उत्तरादात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरगुती उपाय | ९९ | १७.८१ |
| २ | औषधोपचार / डॉक्टरकडे जातो | ५४४ | ९७.८४ |
| ३ | साधूबुआ कडे जातो | ९ | १.६२ |
| ४ | यज्ञ- नवस करतो | ७ | १.२६ |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते कि, देवावर विश्वास ठेवणारे उत्तरदात्यांची संख्या जरी अधिक असली तरी आजारी पडल्यानंतर डॉक्टरकडे जाणारे किंवा औषधोपचार करणाऱ्या व्यक्तींची संख्या सर्वाधिक म्हणजे ५४४ (९७.८४) इतकी आहे. यामध्ये उत्तरदात्यांनी बहुपर्यायांची देखील निवड केलेली आहे. ९९ (१७.८१%) लोक लहान-सहान आजारांसाठी घरगुती उपाय करतात तर साधू बुवाकडे जाणारे व यज्ञ- नवस करणारे अनुक्रमे ९ (१.६२%), ७(१.२६%) इतके टक्के उत्तरदाते आहेत.

सदर संशोधन अभ्यासाकरिता पुणे व सोलापूर शहरामधील उत्तरादात्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असून ग्रामीण भागांमधील कुटुंबांचा सहभाग कमी प्रमाणात आहे. सबब शहरी भागामध्ये आरोग्य सुविधांची सोय ग्रामीण भागांपेक्षा जास्त प्रमाणात असल्याने, तसेच आरोग्य सुविधांबाबत जागृती केली जात असून अनेक आरोग्य सुविधा अल्प दारात किंवा मोफत मिळत असल्याने आरोग्याच्या समस्यांच्या उपायांसाठी डॉक्टरकडे जाण्याचे प्रमाण अधिक असून औषधोपचारदेखील दवाखान्यात घेतले जातात.

## प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

# निष्कर्ष

सदर अहवालाचे निष्कर्ष हे संदर्भ साहित्यातून मिळालेली माहिती प्रत्यक्ष सर्वेक्षणातून मिळालेली माहिती, व निरीक्षण (triangulation of data) या सर्वातून संकलित करण्यात आली आहे. उपलब्ध माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे निष्कर्ष समोर आले आहेत.

**ठळक व मुख्य निष्कर्ष:**

- मादिगा समाज मुख्यतः कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यांमधून स्थलांतरित झाला असून ४० ते ७० वर्षांपूर्वीपासून स्थलांतर झाले असल्याचे स्पष्ट होते. रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी स्थलांतर झाल्याने प्रामुख्याने आढळून येते.
- महाराष्ट्रामधील मादिगा समाजातील बहुतांश लोकांच्या शाळेच्या दाखल्यावर, जातीच्या दाखल्यावर मादिगा जातीची नोंद झाली नसून अनुसूचित जातीच्या यादीमधील इतर जातीच्या नोंदी झाल्या आहेत.
- इतर राज्यांमधून झालेले स्थलांतर, मराठी भाषा आत्मसात नसल्याने भाषेची अडचणी, गरिबी, शिक्षणाचा अभाव त्यासोबतच आवश्यक कागदपत्रांची माहिती आणि त्याबाबत गांभीर्य नसल्याने जातीसंदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करण्यास मादिगा समाज असमर्थ आहे.
- मादिगा समाज आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असण्याबरोबर सामाजिकदृष्ट्या देखील अतिशय मागासलेला आहे.
- इतर राज्यांमध्ये मादिगा समाज हा अनुसूचित जातीच्या यादीमाध्येच आहे त्यामुळे प्रवर्गामध्ये कोठे बदल झालेले नाहीत. समस्या केवळ महाराष्ट्रातील पुरावे सादर करणाऱ्या बाबीशी निगडीत आहे.

**उपलब्ध संदर्भ ग्रंथामध्ये नमूद जातीसंदर्भात मांडलेले निष्कर्ष**

- ✓ अनेक संदर्भ ग्रंथामध्ये मादगी, मादिगा एकच असल्याचे नमूद केले आहे, त्यामुळे एकाच संदर्भामध्ये प्रथम मादगी जातीची माहिती प्रस्तुत होत असताना पुढे जाऊन ते मादिगा च्या नावावर प्रस्तुत होताना दिसत आहे. श्री प्रभाकर मांडे यांच्या संदर्भानुसार मांग, मातंग आणि मादिग या जाती एकसारख्या दिसत असल्या, त्यांच्या चालीरीती देवदेवता यामध्ये समानता दिसून येत असली तरी त्या स्वतंत्र जाती आहेत. थर्स्टनच्या मताप्रमाणे मातंग किंवा मातंगी

हे मादिगांचे पर्यायी शब्द आहेत. मादिग लोक स्वतःला "मातंगी" वक्कलू म्हणजेच मातंगीचेपुत्र असे मानतात. मादिगा ही महाराष्ट्रातील मातंगासारखीच पूर्वास्पृश्य जात असून या जातीचे लोक चामड्याचा व्यवसाय करतात. ते स्वतःला "जांबवतुलू" आणि "मातंगलू" असे म्हणतात. श्री भोंडे यांनी १९७३ साली पुणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या तरुण भारत अंकामध्ये लेख लिहिला. त्यामध्ये मांगानाच कर्नाटकात मादिगा आणि गुजरातेत मांगेल म्हणतात, असा उल्लेख आहे. डॉ. ताराबाई परांजपे यांनी मराठवाड्याच्या पूर्व सरहद्दीवरील लोक साहित्याचा अभ्यास या शोध पदवीसाठी लिहिलेल्या प्रबंधात आंध्रात मांगाना मादिगा असे म्हणतात आणि हे मांगांचे प्रदेशविशिष्ट नाव आहे असे म्हंटले आहे.

याच संदर्भातील माहितीनुसार कर्नाटक, गुजरात आणि आंध्रप्रदेश या राज्यामध्ये मांग. मातंग हे मादिगाचेच पर्यायी शब्द आहेत. तसेच मादिगा हे चामड्याचा व्यवसाय करतात, महाराष्ट्राच्या यादीमध्ये मादिगा समाज असला तरी त्यावेळी १६९१ च्या भारतीय जनगणना अहवालानुसार त्यावेळी त्यांची महाराष्ट्रातील एकूण संख्या हि फक्त १९१७ (एक हजार नऊशे सतरा) तर २०११ च्या अहवालानुसार हि संख्या १,५३,०१८ (एक लाख त्रेपन्न हजार अठरा) इतकी आहे, यावरून असे म्हणता येईल कि मादिगाची संख्या कमी असल्यामुळे या समाजाबाबत फारशी माहिती नसण्याची शक्यता आहे तसेच या जातीबाबत महाराष्ट्रातून त्याकाळामध्ये फारसे लिखाण देखील आढळून येत नाही, म्हणजेच मादिगा समाजाबाबत महाराष्ट्रामध्ये फारशी माहिती नाही असे म्हणता येईल.

- ✓ मुंबई इलाख्यातील जाती: (गोविंद मंगेश कालेलकर) या संदर्भामध्ये लेखकाने नमूद केले आहे कि, मांग हे महाराष्ट्र, कर्नाटक व दक्षिण गुजरात येथे आढळतात. यास कानडीत मादिग व गुजराथीत मांगेला असे म्हणतात. संस्कृतात मातंग ह्या नावाच्या जातींचे वर्णन आहे. तेच हे मांग होत. ते आपली उत्पत्ती जांब ऋषीपासून झाली आहे असे सांगतात. महारांप्रमाने यांस अस्पृश्य गणण्यात येते. यावरून ते येथील मूळ रहिवाशांपैकी असावे. असे दिसते. मांग, मादिग आणि मांगेला ह्या तीन प्रातींक स्वरूपाच्या स्वतंत्र जाती असून त्यांचा परस्पर अन्न व्यवहार व शरीर संबंध होत नाहीत.
- ✓ मादिगा जातीमध्ये एकूण तेरा पोटभेद आहेत. १.असादरू, २.चन्न होलीया, ३.डकलेरू ४.डबके मादिग, ५.दळ्या, ६.ढोर, ७.मांग गड्डेरु, ८.मांग गडीगेर, ९.मिनी मादिग,

१०.मोचीगर किंवा मोची, ११.पेड किंवा फेड, १२.मांग राउत आणि १३.सनादी किंवा वाजंत्री, यातील बहुतेक पोटभेद मराठा मांगातही आढळतात. मोची, फेड आणि सनादी यांचा परस्परांसोबत अन्नव्यवहार होतो, पण शरीर संबंध होत नाही. बाकीच्यांचा परस्पर अन्न व्यवहार अथवा शरीरसंबंध होत नाही. मादिगांच्या चालीरीती व धर्म समजुती मांगाप्रमानेच आहेत.

- ✓ स्थलांतर उदरनिर्वाहासाठी मिळेल तो व्यवसाय स्वीकारला गेला आणि पुढील येणाऱ्या पिढ्याकरिता तोच व्यवसाय वारसा म्हणून दिला गेल्याने या समाजाची महाराष्ट्रामधील ओळख त्या व्यवसायावरुनच मिळाली. मोचीकाम करणारे मोची, चांभार झाले, हलगी बजावणारे मांग, मातंग झाले. सफाई काम करणारे भंगी, वाल्मिकी झाले. अशा प्रकारे इतर अनेक जाती लागल्याचे आढळते. सोलापूरमध्ये मादिगा लोकांना मोची म्हणून ओळख मोठ्या प्रमाणात या समाजाला मिळालेली आढळून येते तसेच मांग आणि मातंग म्हणून देखील त्यांचा उल्लेख किंवा त्यांच्या कागदपत्रांवर नोंद झालेली दिसून येते.
- ✓ मुळ मादिगा जातीचे असताना महार, मांग, मातंग, मोची, भंगी, चांभार अशा चुकीच्या जातीच्या नोंदी कागदपत्रांवर झाल्या आहेत. परंतु त्याचा त्यांच्या आपसात होणाऱ्या रोटी-बेटी व्यवहारावर कोणताही विपरीत परिणाम होताना दिसून येत नाही. तसेच कागदोपत्री महार, मांग, चांभार, मोची किंवा इतर जात लागल्यामुळे मादिगा समाज महाराष्ट्रातील मुळच्या महार मांग, चांभार, मोची जातींच्या समाजासोबत असे व्यवहार करत नाहीत किंवा झालेले दिसून येत नाहीत.
- ✓ कर्नाटक, आंध्रप्रदेश मध्ये महार जातीला मादरू संबोधले जाते, महार जात सर्वात खालच्या स्तरावरील जात समजली जाते, त्याचप्रमाणे मादगीचा सामाजिक दर्जा हा महार समाजाप्रमाणे जातीच्या उतरंडीमध्ये खालच्या स्तरावर आहे. स्थलांतरानंतर शाळेमध्ये किंवा इतर ठिकाणी जातीची नोंद करताना, भाषेच्या अडचणींमुळे तेलगु, कानडी अशा नावानेही जातीची नोंद झालेली पाहायला मिळते, तसेच भाषा येत नसल्याने किंवा जात सांगता न आल्याने किंवा सांगितलेल्या जातीच्या नावांचे आकलन न झाल्याने केवळ खालची जात असल्याचा बोध घेवून "महार, मांग' अशी जात लागल्याचेही सर्वेक्षण करतेवेळी या समाजाच्या लोकांशी बोलताना जाणवले आहे.

## १. स्थलांतर संदर्भात:

- ✓ मादिगा समाजचे मूळ कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यात असून अधिकतर समाज हा महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झालेला आहे. हे स्थलांतर हंगामी स्वरूपाचे नसून कायम स्वरूपाचे आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा राज्यांमधील रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि कर्नाटक सीमेवर असणाऱ्या सोलापूर शहारमध्ये मादिगा लोकांचे स्थलांतर जास्त प्रमाणात झालेले दिसून येते.
- ✓ उदरनिर्वाहासाठी व्यवसायासाठी किंवा नोकरीसाठी झालेले स्थलांतर सर्वाधिक आहे.
- ✓ १९५० पूर्वीपासून महाराष्ट्रामध्ये स्थलांतर झाले असताना स्वतःची जमीन किंवा स्वतःचे घर नसल्याने शहरांमधील वस्त्यांमध्ये किंवा शासकीय जागांमध्ये अतिक्रमण करून तेथे पाल, झोपडी किंवा पत्र्याची खोली बांधून राहत असल्याचे दिसते. त्यामुळे अनेकदा एका जागेवरून हुसकविण्यात आल्यास नवीन जागेचा शोध घ्यायचा आणि पुन्हा घर बांधायचे. अशा प्रकारच्या जीवनाक्रमामुळे कागदपत्र बनण्याचा प्रश्नच येत नसे. यामुळे १९५० पूर्वी महाराष्ट्रामध्ये स्थायिक असल्याबाबतचे पुरावे त्यांच्याकडे नाहीत.

## २. जातीचे दाखले काढण्यासाठी पुरावे सादर करण्यासंदर्भात

- ✓ अनुसूचित जातीच्या प्रवर्गातून जातीचा दाखला काढताना किंवा जातपडताळणी करताना त्या जातीचा उल्लेख शाळेच्या दाखल्यावर, वडिलांचा जातीचा दाखला, १९५०च्या पूर्वीचा असा अधिकृत दस्तावेज ज्यावर अर्जदाराच्या वंशावळीतील व्यक्तीचे नाव व जात नमूद आहे, वडिलांकडील कोणाचीही जातपडताळणी, सातबारा, गाव नमुना न. १४ या दस्तावेजावर त्या जातीचा उल्लेख असणे आवश्यक आहे. परंतु ७० वर्षापेक्षा अधिक काळ महाराष्ट्रात वास्तव्यास असूनही शिक्षण नाही, गरिबीमुळे शेती सारखी स्थावर मालमता नाही, तर दाखले आणि ७/१२ सारखे पुरावे कसे तयार होणार ? असा प्रश्न पडतो. या समाजामध्ये जवळपास संपूर्ण समाज तेलगु भाषा बोलतो तर कर्नाटक मधून आलेले लोक कन्नड भाषा वापरतात. मराठी भाषा अवगत नसल्याने भाषेची अडसर निर्माण होऊन शाळेमध्ये चुकीची जात लागली गेली त्यामुळे पुढे शाळा सोडल्याच्या दाखल्यावर देखील त्याच जातीचा उल्लेख केला गेला असल्याचेही अनेकांनी सांगितले.

- ✓ महाराष्ट्रामध्ये जातीच्या चुकीच्या नोंदी झालेला मादिगा समाज हा मुळचा आंध्रप्रदेश, तेलंगना, कर्नाटक मधील असून अजूनही तेथे त्यांचे रक्त नातेसंबंधीय व नातेवाईक स्थायिक आहेत. अनेक कुटुंबातील या राज्यामधील असून त्यांचात रोटी-बेटी व्यवहार होतात. महाराष्ट्रातील या समाजातील लोक इतर राज्यांमध्ये आपल्या मूळच्या गावी जातात, तेथे त्यांची कुलदेवता यल्लमा, जम्ल्लामा, रेणुका देवी, हनुमान यांची जत्रा करतात, जत्रेला ते कोंबडे, बकरे अर्पण करतात, काही जण केवळ गोडधोडाचे, पुरणपोळीचे जेवण करतात. त्यांच्या रूढी परंपरा एकाच आहेत, यावरून असे निदर्शनास येते कि, इतर राज्यातील मादिगा समाज आणि महाराष्ट्रातील मादिगा समाज एकच आहेत.
- ✓ मादिगा जातीचा असतानाही केवळ चुकीच्या जातींची नोंद झालेला हा समाज, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या पिचलेला असल्याने स्वतःची ओळख टिकवून ठेवू शकत नाही. हा समाज स्वतःची ओळख देखील हरवून बसला तर, भविष्यामध्ये तो कोणत्याही प्रकारच्या विकास योजनाचा लाभ घेवून स्वतःचे आयुष्य बनवू शकणार नाही.
- ✓ महाराष्ट्राच्या अनुसूचित जातीच्या यादीत एकूण ५९ जाती असून यापैकी फार कमी जातींसंदर्भात त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती व अस्तित्वाचा अभ्यास झाला असून या समाजाची कोणतीही माहिती लिखित स्वरुपात उपलब्ध नसल्याचे आढळून येते. संशोधनांदरम्यान करण्यात आलेल्या निरीक्षणावरून असे स्पष्ट होते कि, वय वर्ष ६० पेक्षा पुढील व्यक्ती मादिगा समाजाच्या रूढी परंपरा किंवा समाजाची वैशिष्ट्ये सांगू शकत शकतात, परंतु आजच्या आधुनिक जगातील तरुणाला समाजाबद्दल माहिती नाही. अशाने भविष्यामध्ये एखाद्या पिढीनंतर मादिगा समाजाबाबत माहिती असलेली व्यक्ती मिळणार नाही.
- ✓ मादिगा जातीचे पुरावे नसल्याने जातीची दाखले उपलब्ध नाहीत तसेच शाळेच्या दाखल्यावर चुकीच्या नोंदी झाल्याने जातीचे दाखलेही मिळत नाहीत. समाजातील काहींना महार, मांग, चांभार, वाल्मिकी अशा जातीचे दाखलेही मिळाले आहेत परंतु त्याचा आधार घेवून केवळ शैक्षणिक सवलती घेता येतात, त्याही ठराविक शिक्षण क्षेत्रासाठी मर्यादित राहून, ज्या ठिकाणी पडताळणी मागितली जाते, तेथे पडताळणी न झाल्याने आरक्षणाचा लाभ मिळत नाही परिणामी पुढील शिक्षण थांबवावे लागते याचा त्यांच्या विकासावर परिणाम होताना दिसतो. सामाजिक आर्थिक शैक्षणिक मागासलेपणाचा संबंध जात पडताळणी, जातीचा

दाखला व जातीच्या झालेल्या चुकीचा नोंदी याच्याशी तपासण्यात आला. यामध्ये मिळालेल्या निष्कर्षानुसार या सह संबंध जवळचा असून समाजाच्या विकासावर तो परिणाम करतो.

- ✓ मादिगा समाजाच्या मांग आणी मातंग या जातीच्या नावाने देखील नोंदी झाल्या आहेत. मातंग समाज जांबमुनी ऋषींना पुजतो, त्याचप्रमाणे मादिगा समाज देखील जांबुवंत ऋषींना पुजतो. परंतु, त्यांच्या इतर देवदेवता भिन्न असल्याचे आढळते.
- ✓ लहूजी वस्ताद मातंग आयोगाच्या अहवालानुसार "मालेगावच्या खंडोबाच्या यात्रेत मातंग समाजाची स्वतंत्र काठी आणून तेथे हजारोने मातंग लोक दर्शनासाठी जातात. जोगतीन, देवदासी प्रथा किंवा खंडोबाला मुले-मुली सोडणे आणि त्यातून वाघ्या मुरळी प्रथेचा उदय झाला असल्याचा असा उल्लेख आढळतो, जे कि मादिगा समाजामध्ये या प्रथेबाबत काहीच मान्यता नसल्याबाबत समाजातील लोकांनी सांगितले, प्रत्यक्ष सर्वेक्षण व लक्ष गट चर्चा यामध्ये याकुठेच साम्यता दिसून येत नाही किंवा संदर्भ ग्रंथामध्ये देखील मादिगा समाजामध्ये हि प्रथा आहे किंवा नाही याबाबत बोलले गेले नाही. एकूणच दोन समाजातील परंपरेमधील हि सर्वात मोठी भिन्नता आहे.

## ३. शैक्षणिक सद्यस्थिती संदर्भातील निष्कर्ष:

- ✓ मादिगा समाजामध्ये शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी असून पुरुषांची व महिलांची शैक्षणिक स्थिती सारखीच खालावलेली असल्याचे दिसते.
- ✓ मादिगा समाजातील शिक्षण घेतलेली मुलामुली आठवी – दहावी च्या पुढे शिक्षण घेताना दिसत नाही. तसेच निरक्षरतेचे प्रमाण देखील अधिक आहे. अशिक्षित पालक, गरिबी, शिक्षण सोयींचा अभाव आणि जातीसंदर्भात दाखले उपलब्ध नसल्याने पदवी, पदव्युत्तर पदवी आणि इतर क्षेत्रातील उच्च शिक्षणापासून समाज वंचित राहिला आहे. शिक्षण घेण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी निम्मे विद्यार्थ्यांची शाळा गळती झालेली दिसून येते.
- ✓ मराठी माध्यमातून शाळा शिकणाऱ्याचे प्रमाण अधिक असले तरीही आर्थिक स्थिती सुधारलेल्या लोकांनी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे.

- ✓ समाजाचे दर्जेदार किंवा नामांकित शाळेमध्ये प्रवेश नगण्य आहे.
- ✓ पदवी किंवा त्यापुढील शिक्षण अतिशय अल्प स्वरूपाचे आहे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचे प्रमाण काहीच नाही. शिक्षण नसल्यामुळे इतर सामाजिक विषयामध्ये उदासीनता मोठ्या प्रमाणामध्ये आहे. नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास झाला नसल्याने आर्थिक स्थिती सुधारण्याचे मार्ग खुले होत नाहीत. अशा प्रकारची शैक्षणिक मागासलेपणाची दुर्दैवी स्थिती अहवालातून दिसते.
- ✓ कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे अनेक मुलांनी शिक्षण अर्धवट सोडून कुटुंबास आर्थिक मदत करण्यासाठी १४ ते १५ वर्षाच्या वयातच बिगारी कामास सुरुवात केली आहे, तर गरिबीमुळे लहान भावंडांना सांभाळण्यासाठी किंवा घरकाम करण्यासाठी मोठ्या मुलींची शाळा सोडवून घरी बसविले जाते. तसेच लहान वयात झालेली लग्न, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या, एक पालकत्व किंवा कुटुंबामध्ये खाणारी तोंडे जास्त असल्याने शिक्षण अर्ध्यावर सोडलेले विद्यार्थी देखील मोठ्या प्रमाणावर आहेत.
- ✓ शैक्षणिक सोयी सुविधा, समाजाची आर्थिक परिस्थिती आणि शिक्षणाबाबत जागृती अशा अनेक बाबींमुळे समाज शिक्षणापासून वंचित राहिला असून जातीचे दाखले व पुरावे उपलब्ध नसल्याने संपूर्ण समाजाचे नुकसान होत आहे.

## ४. आर्थिक संदर्भात

- ✓ मादिगा समाजामध्ये समाजाच्या संरचनेमध्ये हलक्या दर्जाचे काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या सर्वात अधिक आहे, त्याखालोखाल बेरोजगारांची संख्या आहे तर प्रतिष्ठीत स्वरूपाचे काम करणाऱ्या लोकसंख्येची  संख्या ३ % च्या आसपास आहे.
- ✓ शिक्षणाचा अभाव, स्थलांतर, भाषा अवगत नसल्याने साधारणपणे तीन पिढ्या बिगारी काम, शेतमजुरी, मजुरी, सफाई काम अशा प्रकारची कामे करताना मोठ्या प्रमाणात दिसते.
- ✓ मादिगा समाजातील कुटुंबांचे एकत्रित उत्पन्न पाहिले तर ५ हजार ते १० हजार उत्पन्न असणारे कुटुंबे सर्वात जास्त आहेत, तीन व्यक्तींचे एक कुटुंब असे प्रमाण जरी ग्राह्य धरले तरी पाच हजार ते १५ हजार हे उत्पन्न कुटुंबाच्या किमान गरजा भागविण्यासाठी अतिशय कमी आहे. या उत्पन्नात दैनंदिन गरजा यासोबत दर्जेदार शैक्षणिक व आरोग्य या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे नाहीत. मादिगा समाजातील संयुक्त कुटुंबांमध्ये आजही

दहापेक्षा अधिक सदस्य असतात. अशा कुटुंबाचे उत्पन्न अधिक दिसत असले तरी कुटुंब सदस्य संख्येचा विचार करता ते पुरेसे नसण्याचीच शक्यता आहे.

- ✓ कुटुंबामध्ये असणाऱ्या साधन साहित्य व मनोरंजनाची साधने पाहिली तर पत्र्याची घरे, मातीची घरे असताना देखील केवळ गरज म्हणून वापराव्या लागणाऱ्या साधनांमध्ये पंखा या साधनाचा वापर अधिकतर कुटुंबे करतात, संपर्क साधनासाठी मोबाईल चा वापर देखील अधिक आहे, आणि मनोरंजनामध्ये टीव्ही या व्यतिरिक्त नमूद सर्व साधनांचा वापर क्वचित दिसतो. यावरूनही या कुटुंबांची आर्थिक स्थिती मागासलेली आहे हे लक्षात येते.
- ✓ अर्थार्जनासाठी महाराष्ट्रामध्ये स्थायिक झाल्यानंतर कातडीच्या संदर्भातील कामे, मोची कामे, बिगारी कामे अशा प्रकारची कमी दर्जाची समजली जाणारी कामे करीत असल्यामुळे कामाचा कोठेही लेखाजोखा नाही, त्यामुळे जातीची नोंद नाही आणि जेथे नोंद झाली तेथे कामाच्या स्वरूपावरून मोची, मातंग, अशा प्रकारे नोंद झाली आहे. पुरेसे शिक्षण नसल्यामुळे जातीच्या नोंदी, या मुख्य असून पुढे यातून त्यांची आर्थिक, शैक्षणिक विकासास बाधा येऊ शकते या बाबत देखील त्यांचात जागरुकता नाही.
- ✓ उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्यामुळे बचत करण्याचे प्रमाण खूपच अल्प आहे. बिगारी काम किंवा रोजंदारीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी मासिक पंधरा हजार रुपये कमाई सांगितली असली तरी हे काम नेहमीच असते किंवा प्रत्येक महिन्याला असेलच नाही कधी कधी तर दोन-तीन महिन्यांच्या विश्रांतीनंतर देखील हे काम त्यांना मिळत असते. त्यामुळे मासिक कामामध्ये सातत्यता आढळत नाही.
- ✓ उपजीविकेसाठी त्यांच्याकडे जमीन नाही स्वतःची संपत्ती नाही. शिक्षणाचा अभाव, कौशल्याचा अभाव, यामुळे आजच्या स्थितीमध्ये समाज अत्यंत दारीद्यामध्ये जीवन जगत आहे.
- ✓ कोणत्याही उच्च दर्जाची नोकरी किंवा उत्पन्नाचे साधन त्यांच्याकडे नाही.
- ✓ दारिद्याची परिसीमा इतकी आहे कि ३,००० ते १५,००० वेतनावर महिनाभर हे शारीरिक कष्टाचे काम करतात. हंगामी स्वरूपाचे किंवा बिगारी काम जास्त प्रमाणात असल्यामुळे त्यांच्याकडे १२ महिने कामाची उपलब्धता नसते.
- ✓ मादिगा समाजाच्या अधिकतर कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेत जमीन नाही. ज्यांचेकडे शेती आहे, त्यापैकी बहुतांश लोकांची जमीन नापीक, पडीक किंवा छोट्या तुकड्यांमध्ये

आहे. शेतीतून उत्पन्न घेणारे अगदी नगण्य आहे. यावरून आर्थिकदृष्ट्या स्थावर संपत्तीच्यादृष्टीने हा समाज अतिशय मागास आहे, असे म्हणू शकतो.

**५. सामाजिक संदर्भात.**

- ✓ मादिगा समाज हिंदू धर्म मानतो. धर्म बदल्याचे किंवा एकापेक्षा जास्त धर्माचे आचरण करण्याचे प्रमाण या समाजात दिसत नाही.
- ✓ अधिकतर मादिगा समाजाच्या व्यक्तींकडे शिधा पत्रिका, मतदान कार्ड, आधार कार्ड आहेत, पॅन कार्ड असणारे केवळ शासकीय नोकरदार आहेत.
- ✓ मादिगा समाज ज्या भागामध्ये राहतो तेथील पायाभूत सुविधा अत्यंत दयनीय आहेत.
- ✓ ज्या व्यक्तींकडे स्वतःच्या मालकीची घरे आहेत त्या घरांचे स्वरूप अर्धे कच्चे, पत्र्याचे अशा स्वरूपाचे आहे.
- ✓ शहरी वस्त्या, झोपडपट्ट्या रेल्वेच्या अतिक्रमित जागा अशा ठिकाणी घरे बांधून लोक राहतात, जी कुटुंबे पक्क्या घरामध्ये राहतात, ती शासकीय निवास स्थान किंवा भाडेतत्वावर असल्याने घरांची मालकी त्यांची नाही, असे दिसून येते. बहुतेकांना स्वतःची घरे असली तरी त्या घरातील स्थिती पाहिली तर फारच वाईट आहे. घरामध्ये नसल्याचे दिसते. एकूणच हा समाज मुलभूत सुविधांसाठी संघर्ष करीत असून सुविधांच्या पूर्ततेशिवाय सामाजिक परिस्थिती सुधारणे अशक्य ठरेल. मादिगा समाजाची निवाऱ्याची मुलभूत गरज पूर्ण होत असताना त्याची स्थिती निम्न दर्जाची किंवा त्यापेक्षा कनिष्ठ दर्जाची असल्याचे दिसते.
- ✓ मादिगा लोकही वस्तीमध्ये राहणाऱ्या इतर समाजाप्रमाणे शौचालय, स्नानगृह, सांडपाणी व्यवस्था, निकृष्ठ दर्जाची निवास व्यवस्था, अस्वच्छ परिसर, मनोरंजनाच्या साधनांच्या अभावामुळे हलाकीचे जीवन जगत आहेत.

**६. मादिगा समाजास शासकीय योजनांबाबत असलेली माहिती व योजनांच्या लाभासंदर्भातील निष्कर्ष**

- ✓ मादिगा समाजामध्ये शासकीय योजनांचे लाभ घेण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. इतर समाजापासून काहीसा अलिप्त असा हा समाज असल्यामुळे योजनांची माहिती या वर्गापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ त्यांनी घेतलेला दिसून येत

नाही. लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करताना जातीच्या दाखल्याची सर्वात मोठी अडचण त्यांच्यासमोर असते.

- ✓ बहुतांश लोकांनी कोणत्याही प्रकारच्या योजनांचा लाभ घेतलेला दिसून येत नाही. तर केवळ २५ कुटुंबांनी योजनांचा लाभ घेतला आहे, जे प्रमाण ३ ते ४ टक्के इतके आहे. त्यामध्ये शिष्यवृत्ती, घरकुल, कर्ज योजना अशा योजनाचा समवेश होतो.
- ✓ शासकीय नोकऱ्या, रोजगार योजना, उद्योग –व्यवसाय करिता मोठे कर्ज किंवा उच्च शिक्षणासाठीच्या योजना अशा योजनांचा लाभ कोणीही घेतलेला दिसून येत नाही.
- ✓ योजनेचा लाभ न घेणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक असण्यामागे अनेक कारणे समोर असली तरी विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तसेच त्यांचे लाभ समाजापर्यंत पोहोचविणे परिणामी त्यांचा त्यामार्फत विकास घडविणे महत्वाचे ठरते, परंतु प्रत्यक्षात मात्र असे होताना दिसून येत नाही जेणेकरून त्यांची एकंदरीत परिस्थिती अजूनही मागासलेल्या अवस्थेत असल्याचे जाणवते.
- ✓ शासनाने अनुसुचीत जातीच्या विकासासाठी अनेक उपयोजना, शैक्षणिक आरक्षण, नोकरीमध्ये आरक्षण, इतर अनेक योजना सर्व राबविण्यात येत आहे, परंतु कागदपत्रांच्या अभावी या समाजास कोणत्याही गोष्टीचा लाभ तर घेता येत नाही, परंतु दुसऱ्या शहरात जाऊन आपली ओळख हरवून बसल्याप्रमाणे खिन्नावस्था या समाजाची आहे.

## ७. सर्व समावेशक निष्कर्ष

- ✓ मादिगा समाजास असुरक्षिततेची भावना सतत भेडसावत असलेली दिसते. आपण गरीब आहोत, आपले जीवन असहाय्य आहे, आपले प्रश्न कोणी ऐकून घेत नाही, आपण आवाज उठवू शकत नाही, अशा भावनेतून हा समुदाय सतत तणावाखाली वावरताना दिसतो. आर्थिक परिस्थिती, कामाचे स्वरूप, भाषेचा अडसर आणि प्रचंड अज्ञान यामुळे हा समाज आहे ती परिस्थिती निमूटपणे सहन करत आहे, बदलाचा प्रयत्न केला तर हे हि निसटून जाईल या भीतीने हा समाज ग्रस्त असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट जाणवत आहे.
- ✓ ग्रामीण भागातून किंवा अन्य कोणत्याही ठिकाणाहून शहरांकडे लोकसंख्येचे होणारे स्थलांतर या प्रक्रियेचे समाजावर अनेक परिणाम होताना दिसतात. व्यवसायास मिळणारी चालना हा महत्वाचा परिणाम होय तर दुसरा असा कि जे स्थलांतरित होतात ते आपल्यासोबत येताना

आपल्या मुळच्या काही रूढी परंपरा घेऊन येतात. परंतु कालांतराने त्यांची संख्या त्या तुलनेने कमी असल्यामुळे काही वर्षात त्या रूढी परंपरा स्थलांतरित झालेल्या ठिकाणच्या रूढी परंपरांमध्ये विलीन होऊन जातात. आणि त्या नंतरची त्या समाजाची पिढी या रूढी परंपराबाबत सखोल माहिती देऊ शकत नाही, त्यांच्या परंपरा, सणवार, आहार पद्धती, वेशभूषा, देवदेवता सर्वच विलीन होत गेल्यामुळे त्या जातीची मूळ वैशिष्ट्ये शोधणे अवघड बाब होईन जाते. आणि हळूहळू अशा जाती नामशेष होताना दिसतात.

- ✓ सर्वच अनुसूचित जातींना आरक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत, त्यातून महार, मांग, मातंग, चांभार या समजाची प्रगती झाली आहे. परंतु मादिगा समाजास हे साध्य करता आले नाही. उपलब्ध शैक्षणिक सोयीचा उपयोग मादिगा समाजास करून घेता आला नाही. त्यांना उपजीविकेची साधने नाहीत, शासकीय सोयी सवलती बाबत त्यांच्यात जागरूकता नाही. लागणारे सामाजिक, व वैचारिक प्रोत्साहन नाही, समाजामध्ये कोणी शिकलेला नेतृत्व करणारा नाही.
- ✓ सुरुवातीच्या काळामध्ये या समाजाच्या समस्या व सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती सोबत जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र याप्रश्नांबाबत अभ्यास केंद्रित करताना हा त्यांच्या जातीच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा देखील प्रश्न आहे आणि याचे स्वरूप फार व्यापक असल्याचे निदर्शनास आले आहे.

**८. महिला सक्षमीकरण संदर्भात**

- ✓ महिलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
- ✓ मादिगा समाज आर्थिक, सामाजिक दृष्ट्या जरी मागासलेला असला तरी विवाह कायद्याचे पालन करताना दिसत आहे. मागील एका दशकामध्ये झालेले विवाह वेळचे वय मुलींसाठी १८ वर्ष व मुलांकरिता २१ च्या पुढे आहे.
- ✓ मादिगा समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून कुटुंबातील अर्थार्जन करण्याची जबाबदारी पुरुषांवर आहे. त्याचबरोबर महिलांचे अर्थार्जानामध्ये कमी प्रमाण असण्याची कारणे म्हणजे कमी वयाच्या, नवीन लग्न झालेल्या मुलींचे जास्त प्रमाण किंवा कुटुंबातील महिलेचे कुटुंबप्रमुख म्हणून असणारे स्थान. त्याचबरोबर घराची आणि लहान मुलांची जबाबदारी महिलांवर असल्याने त्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

- ✓ बहुतांश महिला धुणी- भांडी किंवा सफाई कर्मचारी म्हणून काम करत असून त्यातून मिळणारे उत्पन्न हे फारसे समाधानकारक नाही.
- ✓ शिक्षणासाठी आवश्यक पैशाची गरज भागविण्यासाठी अर्थार्जन करणाऱ्या महिलांची अत्यल्प असून समाजामध्ये शिक्षणाला महत्व असल्याचे दिसत नाही.
- ✓ ज्या महिलांनी शासकीय नोकरीमध्ये असताना घरासाठी कर्ज काढले आहे अशाच महिलांच्या नावावर संपत्ती म्हणजे घर आहे किंवा पतीच्या निधनानंतर वारसदार म्हणून महिलेच्या नावावर घर असल्याचे दिसून आले आहे. याव्यतिरिक्त महिलांच्या नावावर घरासारखी मोठी संपत्ती असल्याचे दिसून येत नाही.
- ✓ घरी बाळंतपण झाले असल्याचे सांगणाऱ्या महिलांचे वय ५०-६० पेक्षा जास्त असून सध्याच्या काळात होणारी बहुतांश बाळंतपण दवाखान्यात केली जातात. समाजाची एकंदरीत आर्थिक परिस्थिती पाहता खाजगी दवाखान्यामध्ये बाळंतपण करणे खिशाला परवडणारे नसते, त्यामुळे सरकारी दवाखान्याचा पर्याय निवडला जातो. आपत्कालीत परिस्थितीमध्ये घरीदेखील बाळंतपण होत असून त्याचे प्रमाण अत्यल्प प्रमाणात आहे.
- ✓ मादिगा समाज आर्थिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास असूनही समाजामध्ये महिलांचे स्थान मानाचे आहे त्यांना पुरुषापेक्षा कमी लेखले जात नाही.

### ९. श्रद्धा आणि अंधश्रद्धा बाबत

- ✓ जास्तीत जास्त कुटुंबे हि कुंडलीवर विश्वास ठेवतात व मुहूर्त पाहून शुभ कार्य निच्छित करतात.
- ✓ देवावर असणारी श्रद्धा तसेच देवाकडे एखाद्या गोष्टीसाठी साकडे घातल्यानंतर ती बाब पूर्ण होण्यासाठी उपवास करतात. आपले नाशिब देव लिहितो, आणि त्याप्रमाणे सर्व होत असते अशी धारणा माणसांमध्ये असते. आपल्या चांगल्या वाईट प्रसंगामध्ये देवच आपली साथ देतो, त्याच्यामुळेच आपल आयुष्य असून आपला उद्धार त्याच्या कृपेनेच होऊ शकतो अशी मनोभावना असल्याने आपले नशीब लिहिणाऱ्या देवावर व्यक्ती विश्वास ठेऊन त्याची पूजा-अर्चा करतात. देवावर विश्वास ठेवणारे उत्तरदाते सर्वात अधिक आहेत.
- ✓ देवाकडे आपली इच्छा किंवा अपेक्षा पूर्ण करण्यासाठी साकडे घातले जाते आणि ती इच्छा पूर्ण झाल्यास त्याबदल्यात देवाचा उत्सव करण्याचे किंवा पैशांच्या, दागदागिन्यांच्या, नारळ

सारख्या फळांच्या किंवा पशुबळीच्या स्वरुपात भेट चढविण्याचे आश्वासन दिले जाते. यामुळे मादिगा समाजामध्ये काही प्रमाणात अंधश्रद्धा असल्याचे दिसून येते.

- ✓ पिढ्यापिढ्या चालत आलेल्या रूढी आणि परंपरांच्या प्रवाहामध्ये अडकून जत्रा, यात्रा, सण समारंभ अशा धार्मिक रूढी पाळण्यासाठी देव-देवतेसमोर कोंबडे, बकरे अशा प्राण्यांचा बळी देतात. आकडेवारी पाहता,मादिगा समाजावर रूढी परंपरेचा पगडा असल्याचे दिसते.
- ✓ मादिगा समाजामध्ये देवदासी किंवा मुरळी प्रथा नसल्याचे दिसते.

**१०.जात पंचायत संदर्भात**

- ✓ जात पंचायत अस्तित्वात होती त्याकाळामध्ये जातपंचायत आपसात होणारी भांडणे, तंटे, किंवा इतर वाद विवाद सोडविण्यासाठी मध्यस्थी करत असे. वाद विवादांचा निकाल लावून न्याय देत असत.
- ✓ कौटुंबिक किंवा जातीतील कोणतेही वाद विवाद सोडविण्यासाठी जात पंचायत एकमात्र माध्यम मानले जात, जात पंचायतीने दिलेला निर्णय सर्वमान्य असत. आरोपीस किंवा पक्षकारास निर्णय मान्य नसल्यास किंवा त्यांनी निर्णयाविरुद्ध बंड पुकारल्यास समाजातून बाहेर काढले जात.
- ✓ किरकोळ स्वरूपाचे वाद पंचांना किंवा गावातील प्रतिष्ठीत मंडळींना दारू आणि मटणाची मेजवानी देवून मिटवली जात.
- ✓ जात पंचायतीकडून बहिष्कार, वाळीत टाकणे, रकमेच्या सरुपात दंड करणे अशा प्रकारच्या शिक्षा केल्या जात. परंतु शारीरिक वेतन करण्याच्या हेतूने कोणतीही शिक्षा करण्यात येत नव्हती.

# शिफारशी

सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेला समाज, अस्वच्छ काम करणारा समाज तसेच ज्यांना इतर समाजाकडून अस्पृश्यतेची वागणूक दिली जाते, अशा समाजाची नोंद अनुसूचित जाती या प्रवर्गाच्या अंतर्गत करण्यात आली असून १९५० मध्ये केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेमध्ये सदर अनुसूचित जातींची यादी घोषित केली असून यामध्ये एकूण ५९ जातींचा समावेश केला असून मादिगा समाज ३६ क्रमांकावर आहे.

प्रस्तुत अभ्यासामध्ये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीमधील मादिगा समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती समजून घेण्याचा करण्यात आला आहे. मादिगा समाजाने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने त्यांच्या जातीच्या संदर्भातील झालेल्या चुकीच्या नोंदी आणि त्यामुळे येणाऱ्या अडचणी, या सर्वाचा त्यांच्या विकासावर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला आहे.

मादिगा समाज अनुसूचित जातीमध्ये असल्याने अस्पृश्यतेसोबतच सततच्या अन्याय अत्याचारामुळे समाज पिचलेला आहे, त्याचबरोबर स्थलांतरामुळे शैक्षणिक दुर्बलता, अर्थार्जन संधीचा अभाव अशा समस्यांनी समाज ग्रस्त आहे. मादिगा समाजाच्या मागासलेपणाची कारणीमीमांसा करताना असे लक्षात येत कि, सदर अभ्यास मादिगा समाजाचे स्थलांतर, स्थलांतराचा कालखंड, जातींच्या चुकीचा नोंदी अशा बाबींकडे विशेष लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतो. समाज जीवनाच्या विकासावर या सर्व बाबींमुळे झालेला परिणाम याची चिकित्सा सदर अहवाल करीत आहे.

प्रस्तुत अभ्यासामध्ये समस्यांचा विचार करताना या समाजाचा सामजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपणा याचा सहसंबंध जातीचा दाखला, जात प्रमाण पत्र पडताळणी आणि जातीच्या चुकीच्या नोंदी यांच्यासोबत तपासण्यात आला असून याचा समाजाच्या विकासावर जवळचा परिणाम होतो, हे प्रस्तुत अभ्यासामध्ये स्पष्ट दिसुन येत आहे. या अनुषंगाने वरील समस्येचा प्रामुख्याने विचार करता प्रस्तुत अभ्यासामध्ये पुढीलप्रमाणे टप्याटप्याने शिफारशी करण्यात येत आहे.

**जातीच्या नोंदी व जात प्रमाणपत्रे व जात पडताळणी**

मादिगा समाजाकडे महाराष्ट्र राज्यातील १९५० पूर्वीच्या दाखल्यांचा व कागदपत्रांचा अभाव असल्याने जातीचे दाखले आणि जात प्रमाणपत्र पडताळणी मिळविण्यासाठी अडचणींमध्ये वाढ झाल्याचे दिसते. तसेच ज्यांच्याकडे जातीचा उल्लेख असणारी कागदपत्रे आहेत, त्यावर स्वतःच्या

जाती ऐवजी म्हणजेच मादिगा जातीऐवजी महार, मांग, चांभार, भंगी, हरिजन, तेलगु, कानडी, कोंगडी, मोची, वाल्मिकी अशा चुकीच्या जातींची नोंद झाल्या आहेत. अशा चुकीच्या नोंदी होण्यामागे अनेक कारणे आहेत. जातीचे दाखले काढण्यासाठी आवश्यक पुरावे ते सादर करू शकत नाहीत सबब त्यांना त्यांच्या जातीचे जातीचे दाखले मिळत नाहीत.

मादिगा समाजातील लोकांना मोची, महार, मांग अशा चुकीच्या जाती लागल्यामुमुळे त्यांना महार, मांग अशा जातीने ओळखले जाते, परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्रातील मुळचा महार, मांग, चांभार किंवा मोची समाज या समाजाशी कोणतेही संबध ठेवत नाही किंवा कोणताही व्यवहार, रोटी - बेटी व्यवहार होत नाहीत.

**<u>सद्यस्थितीमध्ये मादिगा समाज ना मूळ राज्यातील राहिला, ना महाराष्ट्रतला, ना मूळ जातीचा राहिला ना चुकीच्या नोंद झालेल्या जातीचा...</u>**

मादिगा समाजाच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाच्या प्रश्नावर लक्ष वेधून अभ्यासामध्ये अशी शिफारस करण्यात येत आहे कि, अधिकतर हा समाज ७० वर्षांपेक्षाही आधीच्या काळापासून महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झाला आहे. पिढ्यानपिढ्या महाराष्ट्रामध्ये अधिवास असलेला हा संपूर्ण समाज आज महाराष्ट्राचा रहिवासी असून त्यांना मूळ राज्यात जाणे आणि तेथील राज्य शासनाकडून जातीचे दाखले किंवा पडताळणी मिळविणे अशक्य बाब आहे. त्यामुळे हा समाज त्या राज्यांमध्ये न जाता महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये मादिगा समाजाचे नाव समाविष्ठ असल्याने याच नावाची ओळख मिळण्यासाठी धडपडत आहे.

वर्षानुवर्षे शिक्षणापासून वंचित राहावे लागल्याने, आर्थिक स्थिती सुधारता आली नाही, तसेच कागदपत्रे तयार करण्यासाठी किंवा योजनांचा लाभ मिळविण्यासाठी लागणारे पुरावे देऊ शकले नाहीत, आणि आजही देऊ शकत नाहीत. अशावेळी महाराष्ट्रातील त्यांचे इतक्या वर्षाचे वास्तव्य विचारात घेवून जातीचा दाखला आणि पडताळणी मिळविण्यासाठी १९५० पूर्वीचे पुरावे सादर करण्याची अट शिथिल करण्याबाबत तसेच त्या आधारे  त्यांना जातीचे दाखले देणेबाबत शासनाने शासन स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.

मादिगा समाजाच्या संघटना, मंडळांची नोंदणी करवून व त्यांचेकडून चौकशी किंवा पडताळणी झालेल्या आणि त्यानंतर संघटनेकडून शिफारस करण्यात आलेल्या व्यक्तीलाच जातीचा दाखला

देण्याबाबत किंवा समाजाच्या तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय किंवा राज्यस्तरीय संघटनेमार्फत करण्यात आलेल्या शिफारशीच्या आधारे जातीचे दाखले देणेबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

- ✓ महाराष्ट्र राज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या मादिगा समाजास त्यांच्या मूळ जातीच्या नावाने जातीचे दाखले मिळण्याकरिता कुटुंबातील किंवा रक्तसंबंधातील कोणत्याही व्यक्तीचा पुरावा असल्यास तो ग्राह्य धरूनत्याआधारे कुटुंबातील इतरांना दाखले देणेबाबत शासनाने शासन स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.
- ✓ आजही काही मादिगा समाजातील व्यक्तींकडे मूळ राज्यातील जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध आहे ज्यावर त्यांची जात मादिगा म्हणून नमूद आहे. आपली ओळख दाखविण्यासाठी अनेकांनी मूळ राज्यामध्ये जाऊन त्यांच्या शाळेतील दाखले काढून आणले आहेत तर बहुतांश लोकाकडे अशा प्रकारचे दाखले उपलब्ध नाहीत. तरी ज्यांच्याकडे अशा प्रकारचे दाखले आहेत, त्यांचा शासनाने सकारात्मक विचार करता त्यांना महाराष्ट्र राज्याचे जातीचे दाखले देणेबाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.
- ✓ मादिगा जातीचे असताना देखील शाळा सोडल्याच्या दाखल्यावर किंवा जातीच्या दाखल्यावर मादिगा व्यतिरिक्त इतर कोणतीही चुकीची जात लागली असता, ती नोंद त्वरित रद्दबातल ठरवून त्याऐवजी मादिगा संघटना आणि संस्था मार्फत शिफारसीसह मादिगा जातीच्या नावाने दुरुस्ती करण्यात यावी आणि त्यांना मादिगा जातीचे शाळा सोडल्याचे दाखले आणि जातीचे दाखले देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.

**सोयी सुविधांबाबत शिफारशी:**

मादिगा समाज, प्रामुख्याने शहरालगत वसलेल्या वस्त्या किंवा झोपडपट्ट्यामध्ये वास्तव्यास असून कच्चे बांधकाम असलेल्या मातीची, पत्र्याची, कुडाच्या भिंतीच्या घरांमध्ये राहतो. स्थानिक पातळीवर शासनाने जरी वीज, सार्वजनिक शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केल्या असतील तरीही त्या अपुऱ्या ठरत असून उघडी गटारे, कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छतेमुळे घाणीचे साम्राज्य पसरलेले आजही दिसते.

- ➢ सामाजिक न्याय विभाग, समाज कल्याण प्रशासनामार्फत, महानगर पालिका आणि स्थानिक नेतृत्व यांनी पुढाकार घेऊन वस्त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता योजना तयार करून त्यांची

अंबलबजावणी मादिगा समाज  केंद्रित क्षेत्रे आणि झोपडपट्ट्या विकसित करण्याबाबत शासनाने  योग्य ती कार्यवाही करावी.

- घर बांधणीसाठी शासनाकडून मिळणारा निधी किंवा योजना राबविण्यासाठी या समाजाला वैयक्तिक लक्ष केंद्रित करून मार्गदर्शन करून कागदपत्रांची पूर्तता करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता अटी व शर्ती लवचिक ठेऊन जास्तीत जास्त समाजाला लाभ घेता देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- वस्तीचा विकास होण्यासाठी रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, रस्त्यावरील प्रकाशव्यवस्था, सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, अशा सोयी उपलब्ध करून देत असताना समाज मंदिरे, अंगणवाड्या, वाचनालये, मार्गदर्शन केंद्रे, बाग-बगीच्या सारखी मनोरंजनाची  ठिकाणे सुद्धा स्थापनेबाबत शासनाने  योग्य ती कार्यवाही करावी.
- शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक सुविधा आणि रुग्णालयांसारख्या सोयी-सुविधांच्या ठिकाणी त्यांना प्रवेश सहज घेता येण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. अशाने समाजामध्ये सकारात्मक परिणाम  होऊन त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. पायाभूत सुविधांच्या विकासाच्या अवस्थेत, महाराष्ट्र शासनातर्फे प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने  योग्य ती कार्यवाही करावी.

**शैक्षणिक क्षेत्रातील शिफारशी**

मादिगा समाजाचे प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणासारख्या सर्वच क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्याचे तसेच उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अत्यल्प असून शाळा गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. शिक्षणाशिवाय हा समाज जागतिक स्पर्धेमध्ये उतरू शकणार नाही. त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अंमलबजावणी करण्यायोग्य शिफारशी खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

- **प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण**
  - पहिली ते दहावीचा या टप्प्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोडी निर्माण होण्यासाठी तसेच अधिकतम शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यास मादिगा समाजातील सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने  योग्य ती कार्यवाही करावी.

- दहावीच्या पुढे शिक्षणामध्ये तांत्रिक शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून आय टी आय किंवा इतर व्यासाय प्रशिक्षण माध्यमातून व्यासायाभिमुख शिक्षण दे देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा. जेणेकरून ते भविष्यात चांगला रोजगार मिळवू शकतील किंवा स्वतः नोकरी- धंदा सुरु करू शकतील.
- कला, वाणिज्य, विज्ञान शाखेसोबतच अभियांत्रिकी, मेडिकल, व्यवस्थापन अशा विविध शाखांमधून पदवी, पदव्युत्तर पदवी मिळविण्यासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- शाळा किंवा महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेबाबत जनजागृती आणि शिक्षण विषयक मार्गदर्शन व सल्ला देणेकरीता कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, माहिती व तंत्रज्ञान व तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन तसेच शैक्षणिक क्षेत्रातील शिष्यवृत्ती व सवलती मिळवून देण्यासाठी विशेष मदत करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- औपचारिक शिक्षणासोबत अनौपचारिक शिक्षणास प्राथमिक स्तरापासूनच सुरुवात करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी जेणेकरून मुलांमधील इतर कला गुण, कौशल्य विकास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.
- वसतीगृहातील विद्यार्थ्याचा शैक्षणिक, निवास, भोजनाचा खर्च शासनाकडून केला जात असल्याने कुटुंबावरील आर्थिक बोजा कमी होईल त्यामुळे सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाकडे यापूर्वी या समाजाने महाराष्ट्रातील वसतीगृहामध्ये १०% आरक्षण देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी जिल्हा परिषद व महानगरपालिका यांच्या अधिनस्थ असणाऱ्या शाळांमध्ये देखील ०५% जागा राखून ठेवण्याबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षणासाठी आवश्यक गेट सारख्या प्रवेश परीक्षा, नेट, सेट किंवा विविध शिष्यवृत्या मिळविण्यासाठी आवश्यक प्रवेश परीक्षेची तयारी करनाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य किंवा मार्गदर्शन किंवा मोफत कोचिंग उपलब्ध करून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी

**आर्थिक:**

मादिगा समाजातील अधिकतर लोक बांधकाम, शेतीमध्ये, किंवा इतर क्षेत्रामध्ये मजूर म्हणून काम करतात. साफ-सफाई सारख्या अस्वच्छ कामामध्ये सफाई कामगार व बिगारी कामगार म्हणून कामं करण्याचे प्रमाणदेखील जात आढळून आले आहे. मादिगा समाजातील बेरोजगारी आणि समाजाला सन्मानाने करता येईल अशा प्रकारच्या नोकरी - धंद्यात आणण्यासाठी विविध शिफारसी करण्यात आल्या आहेत.

- स्वयंरोजगार वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन तसेच सी.एस.आर अंतर्गत उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या कार्यक्रमांचे शहरी व ग्रामीण भागामध्ये योग्यरित्या अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- खाजगी व शासकीय नोकरीच्या संधी मादिगा समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृतीपार कार्यक्रम, शिबिरे, कार्यशाळा राबवून चांगल्या दर्जाच्या कामाच्या संधी उपलब्ध करवून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- पोलीस भरती, सैन्य भरती, कंपनीमध्ये होणारी कौशल्याधारित भरती, संशोधन क्षेत्र मार्गदर्शन केंद्रे, व प्रशिक्षण केंद्रे सुरु करून किमान बारावी किंवा पदवीचे शिक्षण पूर्ण झालेल्यांना उपजीविकेसाठी हि क्षेत्रे त्यांना उपलब्ध करण्याबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. सारख्या स्पर्धा परीक्षा देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करून किंवा अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये विनामुल्य प्रवेश देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी. जेणेकरून मादिगा समाजातील विद्यार्थी देखील शासकीय सेवेमध्ये आपले योगदान देवू शकतील. यामुळे समाजाची देखील प्रतिमा उंचाविण्यास मदत होईल.

**महिला सक्षमीकरण:**

- महिला सक्षमीकरणाकरिता शासन स्तरावर राबविण्यात येणारे स्वयंसहाय्यता गट (बचत गट) वस्त्यांमध्ये प्रभावीपणे राबविण्याकरिता व महिलांना व्यवसाय उद्योग उभा करण्यासाठी, विविध प्रशिक्षणाचा, कार्यशाळांचे आयोजन करण्यात येऊन घरगुती

व्यावसाय सुरु करण्याकरिता अल्पदरात कर्ज उपलब्ध करून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

- शिक्षण, आरोग्य, राहणीमानाचा दर्जा, स्वच्छता या सर्व बाबतीत महिलांचा दृष्टीकोन विकसित होण्याकरिता महिलांविषयक शासकीय योजना, कायदे याबाबत महिलांना माहिती देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**(सामजिक बांधिलकी) कॉर्परेट सोशल रिस्पॉन्सिबीलिटी (सी.एस.आर)**

आज बहुतांश कंपन्या (सी.एस.आर) अंतर्गत मराठी व इंग्लिश मिडीयम शाळांमधून डिजिटल क्लास, इ-लर्निंग, स्वच्छता गृह, पिण्याचे शुध्द पाणी अशा अनेक गोष्टी उपलब्ध करून देण्याकरीता अनेक उपक्रम राबवीत आहेत तसेच मोफत आरोग्य सेवा, पर्यावरणपूरक उपक्रम, उद्यान, वृक्ष लागवड व जोपासना, स्वच्छता मोहीम, शैक्षणिक विकासासाठी आर्थिक सहाय्य असे प्रकल्प राबवीत आहेत.

- सी.एस.आर उपक्रम राबविणाऱ्या विविध कंपन्यांशी करार करून पुढील पाच ते दहा वर्षांसाठी मादिगा समाजाचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात असलेल्या भागामध्ये विविध सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**सामाजिक संस्था सहभाग :**

सामाजिक संस्थामध्ये शास्त्रीय पद्धतींचा वापर करून समाज विकासाकरिता अनेक स्तरावर त्यांच्याकडून कृती आराखडा तयार करण्यात येत असतो.

विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना मादिगा लक्ष केंद्रित वस्त्यांची पाहणी करून विकास आराखडे व कृती आराखडे सादर करण्याचे आव्हान करून ते राबविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

अशा विविध शिफारशींच्या माध्यमांद्वारे समाजाला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध करवून देवून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वरीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहेत.

# संदर्भ सूची

१) Enthoven, R.E. The Tribes and castes of Bombay Vol.1. New Delhi: Asian Educational Services, 1990

२) Russel R.V and Hirala. The Tribes and castes of the Central Provinces of India Vol.I, II. New Delhi: Asian Educational Services, 1993

३) Singh, K.S. The Scheduled Caste Vol.II. London: Oxford University press, 1993.

४) भारतीय जनगणना अहवाल १९६१- २०११

५) मांडे प्रभाकर, मांग आणि त्यांचे मागते, औरंगाबाद : गोदावरी प्रकाशन

६) कालेलकर,गोविंद मंगेश. मुंबई इलाख्यातील जाती.

# मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून जातीसंदर्भातील माहिती संकलन

## लक्ष गट चर्चा — प्रश्न सूची

**वैशिष्ट्ये** **जातीचे/ समाजाचे नाव**

दुसऱ्या जिल्ह्यांमध्ये/ राज्यांमध्ये या जातीस इतर नावाने ओळखले जाते का?

जातीचा उगम/इतिहास/ संदर्भ कथा आहेत का?

जातीचे /समाजाचे वैशिष्ट्य काय आहे?

या जातीमध्ये असणाऱ्या इतर उपजाती

कुळ कोणते आहे?

गोत्र कोणते आहे

बेटी व्यवहार करताना कोणत्या कुळ, गोत्र, आडनावामध्ये केला जातो

कुलदैवत कोणते आहे.

आपल्या जातीतील पूर्वीची आडनावे कोणती आहेत?

**स्थलांतर** मूळ कोणत्या राज्यामध्ये आहे.

स्थलांतराचा साधारण कालावधी काय आहे.

सध्या रहात असलेल्या ठिकाणी किती वर्षापासून राहता?

स्थलांतर होण्याची कारणे काय आहेत

स्थलांतर कशा स्वरूपाचे असते? हंगामी / कायम स्वरूपी

**व्यवसाय संदर्भात** आपल्या जातीचा पारंपारिक व्यवसाय कोणता आहे?

मागील तीन पिढ्यांचे व्यवसाय काय आहेत. ( आजेबांचा व्यवसाय, वडिलांचा व्यवसाय, मुलाचा व्यवसाय )

इतर कोणते व्यवसाय स्वीकारले आहेत.

पारंपारिक कला कौशल्य कोणती आहे.

व्यवसायाकरिता विशिष्ट हत्यार वापरले जाते का? कोणते?

**भाषा** आपल्या जातीची/ समाजाची भाषा कोणती आहे

बोलीभाषा कोणती आहे

इतर राज्यांमध्ये त्यामध्ये बदल झालेले आहेत का?

आहार आपली आहार पद्धती कोणती आहे? शाकाहारी/मांसाहारी

सण- समारंभ किंवा विशिष्ट दिवशी विशिष्ट आहार केला जाण्याची समाजाची काही पद्धती आहे का?

**पोशाख** आपल्या समाजाचा पोशाख कोणता आहे.

धार्मिक विधीच्या वेळी विशिष्ट पोशाख परिधान करता का?

विवाहाच्या वेळी विशिष्ट पोशाख परिधान करता का?

विशिष्ट प्रकारचे दागदागिने /अलंकार

**धार्मिक / प्रथा-परंपरा** आपल्या समाजाचा किंवा जातीचा कोणता विशिष्ट सण साजरा केला जातो?

इतर धर्माचे सण आपण साजरे करता का?

आपल्या समाजात कोणत्या देवाची जत्रा साजरी केली जाते का?

जत्रेमध्ये कोणते धार्मिक विधी केले जातात. (सुरुवात ते शेवटपर्यंत कशापद्धतीने केले जातात.)

जत्रेची वैशिष्टे काय आहेत? म्हणजे कोणत्या ठिकाणी, कोणत्या विशिष्ट दिवशी, नैवेद्य, पारंपारिक वाद्य वाजविणे, विशिष्ट पोशाख, विशिष्ट जेवण, सर्व विधीमध्ये सर्व वस्तूंचा वापर कशा पद्धतीने होतो.

समाजाची/जातीची तीर्थ स्थाने/ तीर्थ क्षेत्रे आहेत का?

समाजात होणारे धार्मिक विधी कोणाच्या हाताने केले जातात? ( पुजारी, विधी सांगणारा कोणत्या समाजाचा असतो?)

**जन्मविधी** महिला गर्भवती झाल्यानंतर विशिष्ट विधी केला जातो का? — डोहाळे जेवण — करण्याची पद्धत

बाळंतपण कोठे होते

बाळाच्या जन्मानंतर बाळाच्या नाळ संबंधी काही प्रथा आहेत का?

बाळ जन्माला आल्यानंतर विटाळ पाळण्याची पद्धत

बाळाची पाचवीपूजन ( कार्यक्रमाची सुरुवात ते शेवटपर्यंत काय काय केले जाते)

जावळ काढण्याची पद्धत, प्रथा, परंपरा

बारसे/ मुंज कशा पद्धतीने केले जाते.

या विषयाच्या संदर्भात आणखी विशिष्ट प्रथा आहे का?

मुलगी वयात आल्यानंतर काही धार्मिक विधी केले जातात का?

**लग्नविधी** लग्न ठरविताना वर-वधू पहाणे या कार्यक्रमाची पद्धत कशी आहे?

विवाहाच्या वेळचे वय काय होते

लग्न जुळविताना कुळ, गोत्र, आडनाव या संदर्भात काही बाबी तपासल्या जातात का?

लग्न ठरल्यानंतर सुपारी, साखरपुडा या संदर्भातील प्रथा काय आहेत? ( वधू व वर या दोन्हीकडील )हळदीचा कार्यक्रम कसा केला जातो.

लग्नाच्या अगोदरचे सर्व विधी ते लग्न झाल्यानंतर पुढील सर्व विधी

लग्न लावण्याची पद्धती

लग्नामध्ये देण्यात येणारे भोजन

विधवा पुर्नविवाह

दोन लग्न करण्याची पद्धत

विभक्त होण्याची प्रथा

| | |
|---|---|
| **हुंडा पद्धत** | हुंडा कशा स्वरूपात दिला जातो. |
| | वधूकडून /वराकडून ( कोणाकडून कोणास दिला जातो) |
| | हुंडा ठरविण्याची व देण्याची पद्धत काय आहे. |
| **मृत्यू विधी** | मृत्यू विधी कशा प्रकारे करतात |
| | सुतक कशा प्रकारे पाळतात |
| | तिसरा, दहावा, तेरावा दिवस या संदर्भातील प्रथा |
| | इतर माहिती |
| **जात पंचायत** | जात पंचायत कशा प्रकारची रचना आहे. |
| | महिलांचा सहभाग |
| | कोणती प्रकाराने हाताळली जातात |
| | शिक्षेचे स्वरूप काय असते. |
| | सामाजिक समस्या |
| | आर्थिक समस्या |
| | शैक्षणिक समस्या |
| | महिलांची स्थिती |
| | अंधश्रद्धा |

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन)**

# महाराष्ट्र राज्यामधील अनुसूचित जातीतील मादिगा जातीचा सर्वांगीण अभ्यास (महाराष्ट्र राज्य)

गावाचे/वस्तीचे नाव:- ------------------------------------------------------------------------------------------------

गाव:- ---------------------------------- तालुका:- ------------------------------जिल्हा---------------------------

मुलाखतीचा दिनांक : / /२० मुलाखतीची वेळ:- वा. मि.

******************************************************************************************

## १. वैयक्तीक / कौटूंबिक माहिती

| प्र.क्र. | प्रश्न | पर्याय / प्रतिसाद |
|---|---|---|
| १.१ | उत्तरदात्याचे नाव :- | |
| १.२ | कुटुंब प्रमुखाचे नाव;- | |
| १.३ | धर्म | |
| १.४ | जात | |
| १.५ | पोटजात | |
| १.६ | कुटुंबाचा व्यवसाय | |
| १.७ | सध्या राहत असलेल्या ठिकाणी किती वर्षापासुन राहता ? | १. १० वर्षापेक्षा कमी<br>२. ११ - २० वर्ष<br>३. २१ - ३० वर्ष<br>४. ३१ - ४० वर्ष<br>५. ४१ - ५० वर्ष<br>६. ५१ - ६० वर्ष<br>७. ६१ – ७० वर्ष<br>८. ७१ वर्षा पेक्षा जास्त |
| १.८ | तुमचे वडील/आजोबा/पणजोबा इतर राज्यातून महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित आहेत का ? | १. होय<br>२. नाही |
| १.९ | होय, असल्यास मुळ ठिकाण कोणते | गाव:- तालुका:-<br>जिल्हा:- राज्य:- |
| १.१० | स्थलांतर करण्याची कारणे | १. शिक्षण<br>२. व्यवसाय / नोकरी<br>३. नातेवाईक<br>४. नैसर्गिक आपत्ती<br>५. कौटूंबिक समस्या<br>६. इतर (नमुद करावे.)___________________<br>७. लागू नाही. (Not Applicable) |

२. कुटुंबातील सदस्यांची माहिती तक्ता

| अ.क्र | सदस्याचे नाव (सर्व प्रथम कुटुंब प्रमुखाचे नाव लिहावे.) | कुटूंब प्रमुखशी नाते | लिंग १. स्त्री २. पुरुष | वय | शिक्षण | शैक्षणिक माध्यम १. मराठी २. इंग्रजी ३. हिंदी ४. तेलगु ५. कन्नड | शिक्षण अर्धवट सोडले आहे का? १. होय २. नाही | शिक्षण सोडल्याची कारणे / शिक्षण न घेण्याची कारणे | कोणत्या वर्गात शिक्षण सोडले आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २.१ | २.२ | २.३ | २.४ | २.५ | २.६ | २.७ | २.८ | २.९ |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | |

## कुटुंबातील सदस्यांची माहिती तक्ता

| अ. क्र | व्यवसाय | उत्पन्न<br><br>(एकूण मासिक उत्पन्न नमूद करावे) | वैवाहिक स्थिती<br><br>१. विवाहित<br>२. अविवाहित<br>३. घटस्पोटीत<br>४. विधवा<br>५. विधुर<br>६. परितक्त्या | विवाह वेळेचे वय (वर्ष) | आधार कार्ड<br><br>१.होय<br>२.नाही | मतदान कार्ड<br><br>१. होय<br>२.नाही | पॅनकार्ड<br><br>१.होय<br>२.नाही | रेशन कार्ड<br><br>१. पिवळे<br>२. केशरी<br>३. पांढरे<br>४. नाही | जातीचा दाखला<br><br>१.होय (असल्यास दाखल्यावर कोणती जात नमूद आहे?)<br><br>२.नाही | जात पडताळणी प्रमाणपत्र<br><br>१.होय<br>२.नाही | मूळ जात कोणती आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २.१० | २.११ | २.१२ | २.१३ | २.१४ | २.१५ | २.१६ | २.१७ | २.१८ | २.१९ | २.२० |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | |

## ३. अ) कुटूंबाकडील साधन संपत्ती व सोई सुविधा:

| प्र.क्र. | प्रश्न | पर्याय (योग्य पर्यायासमोर ✓ अशी खुण करावी) | निरीक्षण |
|---|---|---|---|
| ३.१ | घराची मालकी | १. स्वत:ची<br>२. भाडयाची<br>३. अतिक्रमित जागेत<br>४. शासकीय निवासस्थान<br>५. इतर (नमूद करा)_______________ | |
| ३.२ | घराची बांधणी / स्वरुप | १. कच्चे (चटईचे, झोपडी, पत्र्याचे घर)<br>२. अर्धवट पक्के (मातीचे बांधकाम)<br>३. पक्के (सिमेंट—विटांचे बांधकाम)<br>४. इतर (नमूद करा) _______________ | |
| ३.३ | घराचे एकूण अंदाजे क्षेत्रफळ: | चौ. फुट. | |
| ३.४ | घरात किती खोल्या आहेत ? | १. एक खोली<br>२. दोन खोल्या<br>३. तीन खोल्या<br>४. चार खोल्या<br>५. पाचपेक्षा जास्त खोल्या | |
| ३.५ | तुमच्या कुटूंबाच्या मालकीची शेतजमीन आहे का? | १. होय<br>२. नाही | |
| ३.६ | असल्यास शेतजमीनीचा प्रकार | १. जिरायती<br>२. बागायती<br>३. दोन्ही (जिरायत व बागायत)<br>४. पडीक जमीन<br>५. लागू नाही.(Not Applicable) | |
| ३.७ | किती जमीन आहे? | एकर गुंठा | |
| ३.८ | किती एकरा मध्ये पिक घेता ? | | |
| ३.९ | शेती करिता पाण्याचे स्त्रोत कोणकोणते आहेत? | १. विहीर<br>२. बोअर<br>३. ओढा / नदी<br>४. कालवा<br>५. तलाव<br>६. इतर (नमूद करावे)_______________ | |

## ३. ब) कुटूंबाकडील सोई सुविधा:

| प्र.क्र. | प्रश्न | पर्याय (योग्य पर्यायासमोर ✓ अशी खुण करावी) | निरीक्षण |
|---|---|---|---|
| ३.१० | पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत | १. वैयक्तिक नळ<br>२. सार्वजनीक नळ<br>३. विहिर<br>४. बोअर<br>५. तलाव /नदी/झरे/ओढा<br>६. इतर(नमूद करावे)_______________ | |
| ३.११ | घरापासुन पिण्याचे पाणी मिळण्याचे अंतर : | १. घरामध्ये /अंगणामध्ये<br>२. घरापासून १०० ते ५०० मीटर च्या आत<br>३. घरापासून ६०० मीटर ते १ किमी अंतरावर<br>४. घरापासुन २ किमी पेक्षा जास्त अंतरावर | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१२ | घरात वीज कनेक्शन आहे का? | १. होय<br>२. नाही | |
| ३.१३ | वीज कनेक्शन असल्यास कोणाच्या नावाने आहे? | १. कुटुंबाच्या नावावर<br>२. भाडयाने<br>३. इतर (नमूद करा) _______________ | |
| ३.१४ | तुमच्या घरात दिवसातून किती तास वीज असते? | १. चार तास<br>२. आठ तास<br>३. बारा तास<br>४. चोवीस तास<br>५. लागू नाही. (Not Applicable) | |
| ३.१५ | आपण स्वयंपाकासाठी इंधन कोणते वापरता ? | १. गॅस<br>२. रॉकेल<br>३. जळावू लाकुड<br>४. कोळसा<br>५. इतर (नमुद करावे)______________ | |
| ३.१६ | घरातील सदस्य शौचास कोठे जातात? | १. वैयक्तिक शौचालय<br>२. सार्वजनिक शौचालय<br>३. खुल्या जागेवर/ शेतात/ माळरानात | |
| ३.१७ | शौचालयात पाण्याची सोय आहे का? | १. होय<br>२. नाही | |
| ३.१८ | घरातील सांडपाणी कोठे जाते? | १. ड्रेनेजमध्ये<br>२. बंदगटार<br>३. उघडी गटारे/ नाला<br>४. इतर (नमूद करावे)_______________ | |
| ३.१९ | आपण घरातील केरकचरा कोठे टाकता ? | १. कचरा वेचका देतो<br>२. कचरापेटी / कचराकुंडी<br>३. कचरागाडी<br>४. खुल्याजागेवर<br>५. इतर (नमूद करावे)_______________ | |

**३. क) आपल्या कुटूंबाकडे असणारी वस्तुरूपी साधने:**

| अ.क्र | साधन | संख्या नमूद करावी | | अ.क्र. | साधन | संख्या नमूदकरावी |
|---|---|---|---|---|---|---|
| ३.२० | टी. व्ही. (TV) | | | ३.३० | मिक्सर | |
| ३.२१ | मोबाईल | | | ३.३१ | फूड प्रोसेसर | |
| ३.२२ | संगणक (डेस्कटॉप/ लॅपटॉप) | | | ३.३२ | फ्रीज | |
| ३.२३ | पंखा | | | ३.३३ | वाशिंग मशिन | |
| ३.२४ | कुलर | | | ३.३४ | लोखंडी कपाट | |
| ३.२५ | शिलाईमशिन | | | ३.३५ | सायकल | |
| ३.२६ | वॉटर फिल्टर | | | ३.३६ | दुचाकी | |
| ३.२७ | पाण्याची मोटर | | | ३.३७ | चारचाकी | |
| ३.२८ | सोफा सेट | | | ३.३८ | टेम्पो | |
| ३.२९ | मायक्रोवेव्ह | | | ३.३९ | ट्रॅक्टर | |

### ४. शासकीय योजना संदर्भात :

| प्र.क्र. | प्रश्न | **पर्याय** (योग्य पर्यायासमोर ✓ अशी खुण करावी) |
|---|---|---|
| ४.१ | अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या शासकीय योजनांबद्दल तुम्हाला माहिती आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ४.२ | नसल्यास कारणे सांगा | |
| ४.३ | तुम्ही योजनांचा लाभ घेतला आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ४.४ | होय असल्यास, कोणकोणत्या योजनेचा लाभ घेतला आहे? त्यांची नावे लिहा | |
| ४.५ | शासकीय योजनेंतर्गत आपल्याला कोणत्या प्रकारचा लाभ झाला? | १. शैक्षणिक – शालेय साहित्य / शिष्यवृत्ती / अधिछात्रवृती / वसतिगृह<br>२. रोजगार<br>३. आर्थिक सहाय्य – कर्ज सुविधा / सबसिडी<br>४. प्रशिक्षण/कौशल्य विकास प्रशिक्षण<br>५. घरकुल / जमीन /पाळीव प्राणी/ विहीर<br>६. कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही.<br>७. इतर (नमूद करावे)____________________<br>८. लागू नाही. |
| ४.६ | योजनेचा लाभ घेताना कोणकोणत्या अडचणी येतात? (पर्यायासमोर ✓ अशी खुण करावी) | १. योजनेची माहिती नाही.<br>२. कागदपत्राची पूर्तता करण्यास असमर्थता<br>३. जातीचा दाखला / जातपडताळणी प्रमाणपत्र नाही<br>४. अधिकाऱ्यांकडून उदासीनता<br>५. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम भरता न येणे.<br>६. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसणे.<br>७. योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई<br>८. इतर (नमूद करावे) ______________________<br>९. लागू नाही. |

### ५. आर्थिक माहिती संदर्भात: (रक्कम रुपयात नमूद करावे)

| अ.क्र. | प्रश्न | पर्याय / प्रतिसाद | निरीक्षण |
|---|---|---|---|
| ५.१ | आपल्या कुटूंबाचे एकुण मासिक उत्पन्न: | | |
| ५.२ | कुटुंबाचा एकूण मासिक खर्च: (सदरील खर्च खालील संपूर्ण खर्चाची बेरीज करून लिहावे) | ----------------------- | |
| ५.३ | घर- खर्च (धान्य, भाजीपाला,...) | | |
| ५.४ | घरभाडे + वीजबिल (मासिक खर्च) | | |
| ५.५ | आरोग्य (मासिक खर्च) | | |
| ५.६ | शिक्षण (मासिक खर्च) | | |
| ५.७ | प्रवासखर्च/ पेट्रोल खर्च (मासिक खर्च) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५.८ | इतर खर्च (मासिक खर्च) | | |
| ५.९ | आपण बचत करता का? | १. होय<br>२. नाही | |
| ५.१० | होय असल्यास कोणत्या स्वरुपात बचत करतात ? | १. रोख<br>२. दागिने<br>३. जमीन<br>४. इतर जंगम मालमत्ता | |
| ५.११ | रोख रकमेच्या स्वरुपात बचत करत असल्यास कोठे करता? | १. स्व:तकडे<br>२. बँकेत/ पतपेढी<br>३. विमा (LIC)<br>४. भिशी<br>५. बचत गट<br>६. इतर(नमूद करावे)__________ | |
| ५.१२ | आपण गुंतवणूक करता का? | १. होय<br>२. नाही | |
| ५.१३ | गुंतवणूक करत असल्यास कोणत्या स्वरुपात करता? | १. दागिने<br>२. जमीन<br>३. घर / फ्लॅट<br>४. इतर जंगम मालमत्ता<br>५. इतर (नमूद करावे)__________ | |
| ५.१४ | आपण मागील 5 वर्षात कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतले आहे का? | १. होय (होय असल्यास, खालील तक्ता भरावा)<br>२. नाही | |

| **अ.क्र** | **कर्ज घेण्याचे कारण?** | **कोणा कडुन घेतले?** | **तारण म्हणून काय ठेवले?** | **कर्जाचा व्याजदर** | **कर्जाची परतफेड केली का?** | **कर्ज न फेडण्याची करणे** |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५.१५ | ५.१६ | ५.१७ | ५.१८ | ५.१९ | ५.२० |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| | एकूण कर्जाचे तपशील | | | | | |

## ६. सामाजिक माहिती (जाती विषयक माहिती)

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **पर्याय / प्रतिसाद** |
|---|---|---|
| ६.१ | तुमच्या कुटुंबातील सदस्यांकडे मूळ जातीची नोंद असणारी कोणकोणती प्रमाणपत्रे आहेत? | १. जात प्रमाणपत्र<br>२. जात पडताळणी प्रमाणपत्र<br>३. शाळा सोडल्याचा दाखला<br>४. शासकीय नोकरीतील कागदपत्र<br>५. गाव 14 चा नमुना<br>६. 7/12 उतारा<br>७. निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा(शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद |

| | | |
|---|---|---|
| | | ८. इतर<br>९. कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. |
| ६.२ | तुमच्या  कुटुंबास सध्या लागलेली जात नमूद असणारी कोणकोणती प्रमाणपत्रे तुमच्याकडे आहेत? | १. जात प्रमाणपत्र<br>२. जात पडताळणी प्रमाणपत्र<br>३. शाळा सोडल्याचा दाखला<br>४. शासकीय नोकरीतील कागदपत्र<br>५. गाव 14 चा नमुना<br>६. 7/12 उतारा<br>७. निर्गम रजिस्टर नोंदणी पुरावा(शाळेत नाव टाकते वेळी केलेली नोंद<br>८. इतर<br>९. लागू नाही. (Not Applicable) |
| ६.३ | तुमच्या कुटुंबाची मूळ जात व सध्या तुमच्या कागदपत्रावरील नमूद जात यांचेमध्ये फरक असल्यास, कारण स्पष्ट करा. | |
| ६.४ | तुमच्या रक्त नाते संबंधातील नातेवाईक आणि तुमची जातीची नोंद यामध्ये फरक आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ६.५ | होय असल्यास तुमच्या रक्त नाते संबंधातील नातेवाईकांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ६.६ | होय असल्यास कोणत्या जातीचे | |
| ६.७ | तुमच्या कुटुंबाच्या मूळ जाती व्यातिरिक्त लागलेल्या जातीमुळे तुम्हाला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते? | १. जातीचे दाखले मिळत नाहीत.<br>२. जात पडताळणी दाखला मिळत नाही.<br>३. कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही.<br>४. समाजाची प्रगती खुंटते.<br>५. इतर (नमूद करावे)___________________ |
| ६.८ | जात पडताळणी प्रमाणपत्र  मिळण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात? | १. अशिक्षितपणा<br>२. जातीची चुकीची नोंद<br>३. 1950 च्या आधीचे पुरावे उपलब्ध नसणे.<br>४. वंशावळ मधील नमूद व्यक्तींचे जातीचे पुरावे नसणे<br>५. इतर (नमूद करावे) ____________________ |
| ६.९ | तुमच्याकडे 1950 पूर्वीचा मादगी जातीचा उल्लेख असलेला पुरावा आहे का? | १. होय<br>२. नाही |
| ६.१० | होय असल्यास कोणता पुरावा आहे. | |
| ६.११ | नाही असल्यास 1950 पूर्वीचा दाखला उपलब्ध नसल्याची कारणे सांगा. | |
| ६.१२ | मादगी आणि मादिगा या दोन जाती एकाच आहेत का? | १. होय<br>२. नाही |

| | | |
|---|---|---|
| ६.१३ | होय असल्यास त्या बाबत तुमचे मत सांगा. | |
| ६.१४ | नाही असल्यास त्या बाबत तुमचे मत सांगा. | |
| ६.१५ | तुम्हाला इतर समाजातील लोकांकडून कशी वागणूक मिळते ? | १. समानतेची<br>२. भेदभावाची |
| ६.१६ | शिक्षण घेत असताना तुम्हाला अस्पृश्यतेची वागणूक मिळाली का ? | १. होय<br>२. नाही |
| ६.१७ | होय असल्यास कोणत्या प्रकारची<br>(केस स्टडी घेण्यात यावी) | |
| ६.१८ | तुम्हाला अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक Atrocity Act) कायदा १९८९ या कायद्याबद्दल माहिती आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ६.१९ | होय असल्यास तुमच्या तक्रारीवर ॲट्रोसिटी गुन्हा दखल करण्यात आला का ? | १. होय<br>२. नाही |
| ६.२० | नसल्यास त्याचे कारण ? | |
| ६.२१ | कर्नाटक/आंध्रप्रदेश/ तेलंगणा राज्यामध्ये असणारा मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाजामध्ये समानता आहे का? | |
| ६.२२ | कर्नाटक/आंध्रप्रदेश / तेलंगणा राज्यामध्ये असणारा मादिगा समाज व महाराष्ट्रातील मादिगा समाजामध्ये समानता असल्यास कोणकोणत्या बाबतीत ते स्पष्ट करा. | |
| ६.२३ | कर्नाटक/आंध्रप्रदेश / तेलंगणामध्ये तुमचे रक्तसंबंधीय नातेवाईक आहेत का? | |
| ६.२४ | कर्नाटक /आंध्रप्रदेश / तेलंगणामध्ये तुमचे नातेवाईक आहेत का? | |
| ६.२५ | कर्नाटक /आंध्रप्रदेश / तेलंगणामधील मादिगा समाजाशी रोटी -बेटी व्यवहार होतात का? | |

## ७. महिलांची स्थिती (घरातील महिलेस सदर प्रश्न विचारावेत)

| अ.क्र. | प्रश्न | पर्याय / प्रतिसाद |
|---|---|---|
| ७.१ | घरातील महिला अर्थाजनासाठी काम करतात का ? | १. होय<br>२. नाही |
| ७.२ | कमविण्याचे कारण | १. कुटुंब प्रमुख असल्याने<br>२. घर खर्चास हातभार<br>३. आर्थिक परिस्थिती<br>४. शिक्षणासाठी<br>५. इतर (नमूद करावे)____________________ |
| ७.३ | घरातील महिलांच्या नावावर संपत्ती आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ७.४ | होय असल्यास कोणती संपत्ती नावावर आहे? | १. घर<br>२. जमीन<br>३. बँकेतील ठेवी<br>४. इतर (नमूद करावे)____________________ |
| ७.५ | बाळंतपण कुठे होतात? | १. सरकारी दवाखाना<br>२. खाजगी दवाखाना<br>३. घरी |
| ७.६ | मागील ५ वर्षात कुटुंबातील महिलेचा प्रसुतिदरम्यान मृत्यू झाला आहे काय? | १. होय<br>२. नाही |

| महिलेचे नाव ७.७ | पहिल्या प्रसुतीच्या वेळचे वय ७.८ | मृत्यू झालेल्या स्त्रीचे वय ७.९ | मृत्यू होण्या मागचे करणे ७.१० |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| ७.११ | घरातील विविध निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य घेतले जाते का?<br>(उदा.- मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासंदर्भात घेतले जाणारे निर्णय वगैरे) | १. होय<br>२. नाही |
| ७.१२ | कुटूंबामध्ये तुम्हाला कशा प्रकारे वागणुक दिली जाते | १. समान<br>२. दुय्यम |

## ८. अंधश्रध्दा:

| अ.क्र. | प्रश्न | पर्याय / प्रतिसाद |
|---|---|---|
| ८.१ | कुंडली पाहता का ? | १. होय<br>२. नाही |
| ८.२ | कुठल्या महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो का ? | १. होय<br>२. नाही |
| ८.३ | उपवास करत असल्यास का करता? | १. इच्छापूर्ती / नवस<br>२. निरोगी / बारीक राहण्यासाठी<br>३. श्रद्धा<br>४. घरातील इतर करतात म्हणून<br>५. इतर (नमूद करावे)___________________<br>६. उपवास करत नाही. |
| ८.४ | देव -देवतेला पशुबळी देता का ? | १. होय<br>२. नाही |
| ८.५ | नवस करता का? | १. होय<br>२. नाही |
| ८.६ | देवाला मानता का? पुजता का ? | १. होय<br>२. नाही |
| ८.७ | आपल्या घरात कोणी आजारी पडले, तर आपण काय करता? | १. घरगुती उपाय<br>२. औषधोपचार / डॉक्टरकडे जातो<br>३. साधूबुआ कडे जातो<br>४. यज्ञ- नवस करतो |
| ८.८ | देवदासी / मुरळी प्रथा आहे का? | १. होय<br>२. नाही |

## ९. मानववंश संदर्भातील माहिती

| अ.क्र. | प्रश्न | पर्याय / प्रतिसाद |
|---|---|---|
| ९.१ | तुमच्या कुटंबाचा पिढीजात (पारंपारिक) व्यवसाय कोणता ? | |
| ९.२ | तुमच्या पिढीजात (पारंपारिक) व्यवसायाचा दर्जा कसा आहे? | १. कमी<br>२. उच्च |
| ९.३ | तुमच्या जातीची सांकेतिक किंवा इतर बोली भाषा आहे का ? | १. होय<br>२. नाही |
| ९.४ | होय असल्यास कोणती ? | |
| ९.५ | तुमच्या जाती मधील प्रचलित आडनावे कोणती? | |
| ९.६ | तुमच्या जातीतील कुळ आणि गोत्र कोणती आहेत ? | अ) कुळ -<br><br>आ) गोत्र - |
| ९.७ | तुमच्या जातीत रोटी बेटी व्यवहार कोणकोणत्या आडनावात, कुळात, गोत्रात होतात ? | |

| | | |
|---|---|---|
| ९.८ | तुमचे कुलदैवत कोणते? | |
| ९.९ | तुम्ही कोणकोणत्या तीर्थस्थळाना भेटी देता ? | |
| ९.१० | तुम्ही कोणकोणत्या यात्रेला जाता ? | |
| ९.११ | तुमचे पारंपारिक खाद्यपदार्थ कोणते? | |
| ९.१२ | तुम्ही मांसाहार करता का ? | |
| ९.१३ | मांसाहार करत असल्यास कोणते मांस खाता ? योग्य पर्यायासमोर √ अशी खुण करा. | १. मटन (मेंढी, बकरी)<br>२. चिकन<br>३. डुक्करचे मांस<br>४. गाय,म्हैस,बैल यांचे मांस<br>५. इतर(नमूद करावे)__________________ |
| ९.१४ | तुमच्या जातीत पूर्वी जातपंचायत होती का? | १. होय<br>२. नाही |
| ९.१५ | तुमच्या जातीत सध्या जात पंचायत आहे का? | १. होय<br>२. नाही |
| ९.१६ | पूर्वी जात पंचायतमध्ये महिलांचा समावेश होता का? | १. होय<br>२. नाही |
| ९.१७ | होय, असल्यास जात पंचायतीकडून कोणत्या समस्या सोडवल्या जातात ? | १. कौटुंबिक तंटा<br>२. इतर तंटा निवारण<br>३. विवाह संबधित<br>४. स्त्रियांवरील अत्याचार<br>५. इतर (नमूद करा)________________ |
| ९.१८ | जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप काय असते? | १. वाळीत टाकणे<br>२. दंड<br>३. दंड व वाळीत टाकणे दोन्ही<br>४. शारीरिक शिक्षा<br>५. माहित नाही<br>६. समज देणे/समजावून सांगणे. |

अन्वेषकाचे निरीक्षण ......................................................................................................................................

.........................................................................................................................................................

.........................................................................................................................................................

.........................................................................................................................................................

उत्तरदात्याचे मत :.........................................................................................................................................

.........................................................................................................................................................

.........................................................................................................................................................

**उत्तरदात्याची नाव व सही** **अन्वेक्षकाचे नाव व सही**

मोबाईल नंबर:-